CMYK




सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, २८ मे २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक १९९ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# विदेशी नको, स्वदेशी वस्तू वापरा!

## पंतप्रधान मोदींचे 'ऑपरेशन सिंदूर'वर देशवासीयांना आवाहन

**गांधीनगर, २७ मे**

आपण कोणतीही परदेशी वस्तू खरेदी करणार नाही, केवळ स्वदेशी वस्तूंचाच वापर करणार अशी शपथ घ्या. श्रीगणेशाची मूर्तीदेखील परदेशातून येत आहे आणि आपण ती स्थापनेसाठी आणतो हे दुर्दैव आहे. तुम्ही तुमच्या घरी जा आणि या बाहेरच्या देशात बनलेल्या कोणत्या वस्तू वापरता, याची यादी बनवा. विदेशी वस्तू खरेदी करणार नाही अशी शपथ घ्या, तरच 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी होईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी जाहीर कार्यक्रमातून सांगितले. दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर असताना गांधीनगरमध्ये आयोजित एका कार्यक्रमात मोदी यांनी पाकिस्तानवर हल्लाबोल करत ऑपरेशन सिंदूरची माहिती दिली. ते म्हणाले, २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र करण्यासाठी जनतेने आता देशाच्या विकासात सहभागी व्हावे. भारताची अर्थव्यवस्था चौथ्या क्रमांकावरून तिसऱ्या क्रमांकावर न्यायची आहे, त्यासाठी



देशवासीयांनी परदेशी वस्तू वापरणार नाही, असा संकल्प घ्यावा. सर्जिकल स्ट्राईकनंतर अनेकांनी सरकारकडे पुराव्यांची मागणी केली होती. त्यामुळे यावेळी सगळ्या गोष्टी कॅमेरासमोरच केल्या. अवघ्या २२ मिनिटांत दहशतवाद्यांची ९ तळे उद्ध्वस्त करण्यात आली. नंतर कुणी पुरावे नाहीत, अशी बोंब करू नये, म्हणून यावेळी आधीच कॅमेऱ्यांची पूर्ण व्यवस्था केली होती. ६ मेची ती दृश्य बघितल्यावर कुणीही याला 'प्रॉक्सी वॉर' म्हणू शकत नाही. यावेळी आम्हाला पुरावे द्यावे लागले नाहीत. त्यांनी समोरूनच परिस्थिती दाखवली, असा टोला पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांना लगावला. जेव्हा पाकिस्तानशी युद्ध करायची वेळ आली, तेव्हा भारताच्या सैन्याने पाकिस्तानला पराभवाची धूळ चारली, असेही पंतप्रधान म्हणाले.

### ...तर पहलगाम हल्ला झालाच नसता

आपण अजून फारसे काही केलेले नाही, पण त्यांना आताच घाम फुटला आहे. सध्या आम्ही आमची धरणे स्वच्छ करत आहोत यामुळे तिकडे पूर येत आहे. फाळणीच्यावेळी भारत दोन भागांत विभागला. तेव्हा काश्मीरवर पहिला दहशतवादी हल्ला झाला होता. तेव्हाच या दहशतवाद्यांना संपविले असते तर आज पहलगाम घडले नसते. ७५ वर्षांचे हे दुःख टाळता आले असते, असे मोदी म्हणाले.

# शेती वाटप पत्राच्या दस्तावरील नोंदणी शुल्क माफ

## राज्य सरकारचा शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासादायक निर्णय

**मुंबई, २७ मे**

शेत जमिनीच्या वाटपपत्राच्या दस्तावर आकारण्यात येणारे नोंदणी शुल्क माफ करण्याचा शेतकऱ्यांच्या दृष्टीने मोठा दिलासादायक निर्णय आज मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.



महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ८५ नुसार शेत जमिनीचे वाटप करताना मोजणी करून वाटपाच्या दस्तास मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क द्यावे लागते. शेत जमिनीच्या वाटप पत्रास मुद्रांक शुल्काचा दर नाममात्र आहे. मात्र, नोंदणी शुल्काच्या बाबतीत सवलत नाही. मुद्रांक शुल्कापेक्षा नोंदणी शुल्क अधिक असल्याने अनेक शेतकरी दस्तांची नोंदणी करीत नाहीत. नोंदणी न केल्यामुळे भविष्यात शेत जमिनीवर वाद निर्माण झाल्यास त्याचा शेतकऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना नाहक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे अशा दस्तांना नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे शेतकऱ्यांना वाटप पत्राची नोंदणी सहजपणे करता येईल.

या निर्णयामुळे शासनाच्या महसुलात दरवर्षी ३५ ते ४० कोटी रुपयांची घट येऊ शकते. मात्र, शेतीच्या वाटप पत्राची नोंदणी न केल्यामुळे शेतकऱ्यांना होणाऱ्या त्रासातून सुटका करण्यासाठी नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. *(तभा वृत्तसेवा)*

### विधि व न्याय विभागात टंकलेखकांच्या ५ हजार २२३ नवीन पदांची निर्मिती

राज्यातील प्रत्येक न्यायिक अधिकाऱ्यासाठी एक टंकलेखक यानुसार ५ हजार २२३ टंकलेखकाची एकाकी पदे निर्माण करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.


राज्यात जिल्हा न्यायाधीश, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) या संवर्गातील अधिकाऱ्यांची नवीन २ हजार ८६३ नियमित पदे निर्माण करण्यात आली आहेत. तसेच यापूर्वीची २ हजार ३६० पदे मंजूर आहेत. त्यामुळे राज्यात सध्या न्यायिक अधिकाऱ्यांची ५ हजार २२३ पदे मंजूर आहेत. या सर्व अधिकाऱ्यांना वरील निर्णयानुसार एक टंकलेखक दिला जाईल. याबाबत शेट्टी आयोगाने न्यायिक अधिकाऱ्यांसाठी टंकलेखक दिला जावा अशी शिफारस केली आहे. या सर्व टंकलेखकांच्या वेतनापोटी येणाऱ्या १९७ कोटी ५५ लाख, ४७ हजार, पाचशे वीस रूपयांच्या वार्षिक खर्चासही आज मान्यता देण्यात आली.



### मंत्रिमंडळ निर्णय

- महाराष्ट्र वन विकास महामंडळाच्या १ हजार ३५१ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मंजुरी
- अंशकालीन निदेशकांच्या नियुक्तीचे सुधारित धोरण
- कृषी पर्यवेक्षक व कृषी सहायक यांच्या पदनामात बदल

### विचारपुष्प



संघाच्या महान जीवनकार्यावर आपली अढळ निष्ठा असू द्या. संघाचे ध्येय हृदयावर कोरून ठेवा. अखिल हिंदू समाजात आपल्याला नवचैतन्य आणि निर्भयता उत्पन्न करावयाची आहे. सामाजिक बल उत्पन्न करून समाजघटकांत स्वाभिमान आणि आत्मविश्वास जागवायचा आहे.

**- डॉ. केशव बळीराम हेडगेवार**
रा. स्व. संघाचे आद्य सरसंघचालक

### विनम्र अभिवादन



अनादि मी अनंत मी, अवध्य मी
भला मारिल रिपु जगतिं
असा कवण जन्मला ।
असे धीरोदात्त काव्य करणाऱ्या
स्वातंत्र्यवीर सावरकर यांची आज जयंती

# अभिनेते अशोक सराफ 'पद्मश्री'ने सन्मानित

**स्व. मनोहर जोशी, पालव, डॉ. डांगरे, शर्मा यांचाही समावेश**



**नवी दिल्ली, २७ मे**

या पुरस्कार समारंभात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी लोकसभा सभापती डॉ. मनोहर जोशी यांना सार्वजनिक क्षेत्रातील योगदानासाठी मरणोत्तर 'पद्मभूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला तसेच ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, अच्युत पालव, अश्विनी भिडे-देशपांडे यांना कला क्षेत्रातील अमूल्य योगदानासाठी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वैद्यकीय क्षेत्रातील उत्तम कार्यासाठी डॉ. विलास डांगरे तर कृषी क्षेत्रातील भरीव कामगिरीसाठी सुभाष शर्मा यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनात पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

विविध क्षेत्रांमध्ये अतुलनीय काम करणाऱ्या ६८ मान्यवरांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी एक असलेल्या 'पद्म' पुरस्काराने मंगळवारी सन्मानित करण्यात आले. यात डॉ. विलास डांगरे यांच्यासह महाराष्ट्रातील सहा मान्यवरांचा समावेश आहे. राष्ट्रपतींच्या हस्ते आज दुसऱ्या टप्प्यातील पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी उपराष्ट्रपती जगदीप धनकड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच अन्य केंद्रीय मंत्री उपस्थित होते. यंदाच्या पद्म पुरस्कार वितरणाची प्रक्रिया दोन टप्प्यांत झाली. पहिल्या टप्प्यात ७१ जणांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात ४ पद्मविभूषण, १० पद्मभूषण आणि ५७ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. आज अन्य ६८ पद्म पुरस्कारांचे वितरण केले.

### शाहबाज सरकारविरोधात रस्त्यावर उतरणार

**इस्लामाबाद, २७ मे**

भारताच्या ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तानच्या अडचणी वाढल्या असताना आता तुरुंगात असलेले पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या पक्षाने शाहबाज सरकारविरोधात देशव्यापी आंदोलनाचा इशारा दिला आहे. पाकिस्तान तहरीक-ए-इंसाफ अर्थात् पीटीआयच्या संस्थापक अध्यक्षा अलिमा खान यांनी सरकारविरोधात रस्त्यावर उतरणार असल्याचे जाहीर केले. इम्रान यांची तुरुंगात भेट घेतल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना अलिमा म्हणाल्या, आम्ही संपूर्ण पाकिस्तानमध्ये एक मोठे आंदोलन सुरू करणार आहोत. सरकारच्या धोरणामुळे जगभरात देशाची नाचक्की झाली आहे. जनतेला सरकारच्या चुका लक्षात आणून देण्यासाठी आम्ही रस्त्यावर उतरणार आहोत. इम्रान यांच्याबाबत न्यायालयाच्या आदेशांचे सातत्याने उल्लंघन केले जात आहे. आठ महिन्यांतून फक्त एकदाच त्यांच्या मुलांशी बोलण्याची परवानगी आहे. इम्रान यांच्या बहिणीला भेटू दिले जात नाही. आयुष्यभर तुरुंगात राहिलो तरी झुकणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

# शहर-जिल्ह्यात सरासरी १८३ मि.मी. पाऊस

## उजनी प्लसमध्ये तर इतर प्रकल्पांच्या पाणीसाठ्यात वाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

गेल्या ८ ते १० दिवसांपासून शहर आणि जिल्ह्यात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. यामुळे बहुतांश भागातील ओढे-नाले भरून वाहू लागले आहेत. इतकेच नाहीतर अनेक भागात धुवाँधार पाऊस पडल्याने उजनी धरणासह लहान-मोठ्या धरणाचा हळूहळू पाणीसाठा वाढू लागल्याची माहिती मिळाली. दरम्यान, आज (दि. २७) दिवसभर रिपरिप सुरूच असल्याने शहर-जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झाले. या रिपरिपीमुळे सोलापुरातील बाजारपेठेच्या उलाढालीवर परिणाम होत आहे.

सोलापूर जिल्ह्यात सोमवारपर्यंत सरासरी १७१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. यानंतर मंगळवारीही जोरदार पाऊस पडला आहे. मंगळवारी सायंकाळी ५.३० पर्यंत १२.४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.

यामुळे यामध्ये भर पडली आहे. आता लवकरच खरिपाच्या पेरणीलाही सुरुवात होणार आहे. सोलापूर शहरात मंगळवारी सायंकाळी ३ नंतर पडलेल्या पावसामुळे वाहनधारकांचे प्रचंड हाल झाले. या बदलत्या वातावरणामुळे तापमानाचा पारा २८ अंशांपर्यंत येवून पोहोचला आहे. यामुळे आता उकाडा गायबच झाला आहे. आजतागायत मे महिन्यात कधीही अशी संततधार, सर्वदूर आणि १७१ मिमी इतका पाऊस झाला नाही, अशी माहिती कृषी अधिकाऱ्यांसह जाणकार शेतकरी देत आहेत. यामुळे यंदाच्या पावसाळ्यात चांगला पाऊस पडण्याची शक्यताही ते वर्तवित आहेत.



### हिंदी महासागरात सापडले ९५०० वर्षे जुने शहर!

**नवी दिल्ली, २७ मे**

जगातील सर्वात प्राचीन संस्कृतींध्ये, हडप्पा म्हणजेच सिंधू संस्कृती आणि सुेरियन संस्कृतीची नावे समोर येतात. तथापि, यापेक्षाही जुनी संस्कृती पृथ्वीवर अस्तित्वात आहे. हिंदी महासागरातही असाच एक शोध लागला आहे. या महासागरात सिंधू आणि सुेरियन संस्कृतीपेक्षाही जुनी संस्कृती अस्तित्वात असल्याचा शोध लागला आहे. पश्चिम भारताच्या किनाऱ्याजवळ पाण्याखालील एक रहस्यमय स्थळ सापडले आहे. सुरे दोन दशकांपूर्वी खंभातच्या आखाताच्या खोलवर संशोधकांना हे ठिकाण सापडले. येथील सापडलेल्या रचना अत्यंत प्राचीन असल्याचे दिसून आले. सन २००० मध्ये २००० मध्ये राष्ट्रीय महासागर तंत्रज्ञान संस्थेने भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील खंभातच्या आखातात एक महत्त्वाचा शोध लावला. नियमित प्रदूषण सर्वेक्षणादरम्यान हा शोध लागला. सर्वेक्षणादरम्यान, सोनार तंत्रज्ञानाने समुद्राच्या तळाशी भौमितिक रचना दर्शविल्या.

### न्यू लक्ष्मी चाळीत एकाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. २७ मे-**

देगाव रस्त्यावरील न्यू लक्ष्मी चाळीत एकाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी रात्री ७:४५ च्या सुमारास उघडकीस आली. सचिन उत्तम कांबळे ( वय ४८)असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. मंगळवारी रात्री सात नंतर सचिन हा त्याच्या न्यू लक्ष्मी चाळीतील घरात होता. साधारण ७:४५ वाजता त्याने राहत्या घराच्या लाकडी वाशाला नायलॉन दोरीने गळफास घेतला. ही बाब लक्षात येताच नातेवाईकांनी फौजदार चावडी पोलिसांना संपर्क करून माहिती दिली. नातेवाईकांच्या मदतीने त्याला गळफासातून सोडवून पोलीस हवालदार रुपनर यांनी बेशुध्द अवस्थेत शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. परंतु प्रचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

# भाजपात 'इनकमिंग'ची संततधार!

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २७ मे:**

मुंबईचा राज्यभरात मान्सूनपूर्व पावसाने धुमाकूळ घातला असताना सत्ताधारी भाजपाकडे इनकमिंगची संततधार सुरू आहे. भाजपच्या प्रदेश कार्यालयात मंगळवारी शरद पवार व उद्धव ठाकरे गटाच्या अनेक नेते, पदाधिकाऱ्यांनी भाजपात प्रवेश केला.

भाजपा प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आदीच्या उपस्थिती हा कार्यक्रम झाला. पाचोरा-भडगाव मतदारसंघाचे माजी आमदार दिलीप वाघ यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाला सोडचिठ्ठी देत भाजपात प्रवेश केला. त्यांच्यासह माजी खासदार वसंतराव मोरे यांचे पुत्र पराग मोरे, रोहन मोरे, नाना महाजन, पारोळ्याचे माजी नगराध्यक्ष अशोक वाणी, पारोळा बाजार समितीचे संचालक नागराज पाटील, उबाठा गटाचे शहर प्रमुख सोमनाथ देशमुख यांनी प्रवेश केला.तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत नगर पंचायतीच्या राष्ट्रवादी शरद पवार गटातील आणि काँग्रेसच्या ११ नगरसेवकांनी भाजपात प्रवेश केला.

**कामगार कर्मचारी संघाच्या अध्यक्षपदी चव्हाण**

अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाच्या सदस्य कंपन्यांच्या शेकडो कर्मचाऱ्यांनी मंगळवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. यावेळी भाजपा प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाच्या अध्यक्षपदी निवड झाली. इंडिगो, स्पाइसजेट, बीडब्ल्यूएफएस तसेच एअर इंडिया च्या कर्मचारी संघटनांच्या सदस्यांनी उबाठा सेनेकडून झालेल्या अन्यायाला कंटाळून भाजपा प्रवेश केल्याचे नमूद केले.

# रूपाली चाकणकरांकडून माझ्या जीवाला धोका

**महिला आयोगाच्या अध्यक्षांविरोधातच महिला आयोगात तक्रार**

**सोबत ऑडिओ क्लिपही**

**मुंबई, २७ मे -**

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणानंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकरणानंतर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावर सडकून टीका होत असून त्यांच्या राजीनामा देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. अशातच संगीता भालेराव या महिलेने थेट राज्य महिला आयोगातच रूपाली चाकणकर यांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. विशेष म्हणजे, चाकणकरांकडून आपल्याला जीवाला धोका असल्याचा आरोप त्यांनी आपल्या तक्रारीत केला आहे.



दोन दिवसांपूर्वी रुपाली चाकणकर यांच्या समर्थक महिलेने संगीता भालेराव यांना फोन करुन धमकी दिल्याची ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनीही ही क्लिप सोशल मीडियावर शेअर करत रूपाली चाकणकरांवर निशाणा साधला होता. आता संगीता भालेराव यांनी या प्रकरणी रूपाली चाकणकरांविरोधात महिला आयोगात तक्रार दाखल केली आहे. हगवणे प्रकरणानंतर चाकणकर यांच्या विरोधात राजकीय पक्षाच्या महिलांनी मोर्चा उघडल्याने राष्ट्रवादी काँग्रेसची मोठी पंचायत झाली आहे.

# भारताशी शांतता चर्चा करण्यास तयार

## इराणमध्ये शाहबाज शरीफ यांची स्पष्टोक्ती

**तेहरान, २७ मे**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने राबविलेल्या ऑपरेशन सिंदूरनंतर भेदरलेल्या पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी भारताविरोधात अनेक वल्गना केल्या. मात्र आता त्यांनी भारताशी शांतता चर्चा करण्याची तयारी असल्याचे स्पष्ट केले आहे. काश्मीर, दहशतवाद, पाणी वाटप आणि व्यापार यासह प्रमुख द्विपक्षीय मुद्यांवर तोडगा काढण्यासाठी भारताशी आम्हाला चर्चा करायची असल्याचे ते इराणमध्ये म्हणाले.

इराणच्या दौऱ्यावर असलेले शरीफ प्रसार माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले, आम्ही काश्मीर आणि पाण्याच्या मुद्यावर भारतासोबत चर्चा करण्यास तयार आहेत. दहशतवाद आणि व्यापार या विषयांवरही चर्चा होऊ शकते. आम्हाला काश्मीर मुद्दा आणि पाणी प्रश्नासह सर्व वाद वाटाघाटीद्वारे सोडवायचे आहेत. *(वृत्तसंस्था)*

# सोलापूर-गोवा बुकींग सुरू; विमानसेवेला ९ जूनचा मुहूर्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

गेल्या अनेक वर्षांपासून शहर-जिल्ह्यातील नागरिकांच्या जिव्हाळ्याचा प्रलंबित असलेला विमानसेवेचा विषय मार्गी लागणार आहे. मंगळवार, २७ मेपासून सोलापूर-गोवा या विमान प्रवासासाठी तिकीटाची बुकींग सुरू झाली असून, सायंकाळी ६ वाजेपर्यंत ८० टक्के तिकीटे खपल्याची माहिती सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी यांनी दिली.

तर सोलापूर-गोवा विमानसेवेचा तिकीटदर बुकींगच्या सुरूवातीला ३४९१ होता तर सायंकाळी ६ वाजेच्या दरम्यान हा दर ४ हजार ८०० पर्यंत गेल्याचेही राठी यांनी सांगितले. तर प्लाय ९१ या कंपनीने विमानसेवा चालू करण्याचा निर्णय घेतल्याने सोलापूरच्या उद्योजकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. तसे तर गेल्या काही महिन्यापासून सोलापूरची विमानेसवा हा विषय अक्षरशः चेष्टेचाच विषय झाला होता. ही विमानसेवा सुरू करण्यासाठी डिजीसीएने दिलेल्या विविध सूचनांनुसार सोलापूर विमान व्यवस्थापक आणि जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी तब्बल ६० कोटी रूपये निधी खर्चून त्रुटी दूर केल्या. ९ महिन्यांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑनलाईन पध्दतीने या विमानतळाचे उद्घाटनही केले. विमानसेवा चालू होण्यासाठी केंद्रीय विमान उड्डयन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी खूप प्रयत्न केले होते. २६ मे रोजी विमानसेवा चालू करण्यासाठी प्लाय ९१ कंपनीचा एक मेलही आल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले होते. मात्र या कंपनीने वारंवार तारखा बदलल्याने ही विमानसेवा चालू होण्यासाठी सतत ब्रेक लागत होता. आता मात्र सोलापूर-गोवा या विमानसेवेसाठी कंपनीकडून गेल्या काही दिवसांपासून स्थानिक उद्योजकांना फोनही आले आणि मंगळवार, दि. २७ रोजी प्लाय ९१ ने बुकींग सुरू केली आहे. यामुळे आता सोलापूरकरांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. पण सोलापुरातून विमान उडेपर्यंत तरी सोलापूरकरांचा श्वास रोखलेलाच असणार आहे.

**सकाळी ८ वा. ५० मिनिटांनी सोलापूरहून उडणार विमान**

प्लाय ९१ ही कंपनी सोलापूर-गोवा अशी विमानसेवा देणार आहे. सकाळी ८ वाजून ५० मिनिटांनी सोलापूरहून हे विमान उडणार असून, ते विमान सकाळी १० वाजून ५ मिनिटांनी गोवा येथे पोहोचणार आहे. तिकीट बुकींक चालू झालेल्या एकाच दिवसात सायंकाळी ६ वाजेपर्यंत तिकीटाची बुकींग ८० टक्के झाली होती. अजून १२-१३ दिवस बाकी आहेत. यामुळे सोलापूर-गोवा ही विमानसेवा सुरळीत चालेल. यानंतर सोलापूर-मुंबई व इतर ठिकाणच्या मार्गावरही विमानसेवा सुरू होईल.

**-राजू राठी, अध्यक्ष, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...



### सोलंकरवाडीतील शेतकऱ्यांची नुकसान भरपाईची मागणी

**मोडनिंब, दि.२७ मे-**

मागील काही दिवसापासून सुरू असलेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यांनी पिकांचे अतोनात नुकसान झालेले आहे. यात रब्बी पिके, पालेभाज्या, फळबागाचे नुकसान प्रचंड प्रमाणात झाले आहे. काढणीस आलेला कांदा व मोडणीस आलेली मका व इतर सर्व पिकांना सतत च्या पावसामुळे फटका बसला आहे. या आसमानी आपत्तीतून शेतकऱ्यांची सोडवणूक करण्यासाठी राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या पिकाचे पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्यात यावी. यासंबंधीचे निवेदन सोलंकरवाडी येथील ग्रामस्थांनी आज कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना दिले. अधिकाऱ्याना पंचनाम्याचे आदेश देऊन शेतकऱ्यांना मदत करावी अशी विनंती निवेदनात केली आहे.



### भालगावच्या मेळाव्यात माहिलांना कृषी विभागाकडून मार्गदर्शन

**वैराग, दि.२७ मे-**

भालगाव (ता.बार्शी) येथील एकता महिला मंचच्या महिला मेळाव्यात तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन केले. यावेळी कोयले यांनी महिलांसाठी मिरची कांडप, पिठाची गिरणी, चिप्स तयार करणे, डाळ मिल प्रक्रिया, बेदाणे शेड, पशुखाद्य तयार करणे, फळ भाजीपाला प्रक्रिया, दूध प्रक्रिया, तेल घाणा, आईस्क्रीम, केक, गुळ पावडर, रसवंती गृह अशा अनेक अन्नप्रक्रिया योजनेमध्ये ३५ टक्के अनुदान असल्याचे सांगितले. यावेळी कृषी पर्यवेक्षक अमोल गायकवाड, संजय कराळे, उपसरपंच सचिन सोनवणे तसेच मंचचे प्रभाकर क्षीरसागर, शबनम सय्यद, नागर दराडे, उर्मिला दराडे, जयश्री तींडोरे, सारिका तींडोरे, उषा कराड, सविता घुगे, विमल घोळवे, लक्ष्मी सोनवणे, रोमाबाई सोनवणे, शिवशाला सोनवणे, मंदा दराडे, सुरेखा पाटील, दैवशाला वडणे, सविता मोहिते, छाया खाडे, सुभद्रा मुंडे, सविता भोसले, दुर्गा घोळवे, चंद्रकाला लाटे, छकुबाई दराडे, सुनीता सोनवणे, स्वाती दराडे, कांचन दराडे, प्रतिभा सरवदे, शोभा सरवदे, दैवशाला घोळवे, सविता पाटील, स्वाती ढवळे,पूजा दराडे आदिसह महिला व नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन उर्मिला दराडे यांनी केले तर आभार डॉ. भिकू अडसूळ यांनी मानले.

### पोक्सो गुन्ह्यातील फरार गुरुजींना पकडण्यात आधिकाऱ्याला अपयश

**मंगळवेढा, दि.२७ मे-**

एका १७ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीस तु माझ्या घरी ये मी दहावीच्या पेपरला मदत करतो अशी थाप मारुन घरी बोलावून तिचा विनयभंत केल्या प्रकरणातील आरोपी शिक्षक रमेश नागन्नाथ पाटील (रा.बोराळे) हा तब्बल एक महिन्याच्या कालावधीनंतरही पोलीसांना सापडत नसल्याने पोलीसांच्या कर्तव्यावरच नागरिकामधून संशय व्यक्त केला जात आहे. ग्रामीण भागातील एक १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी बोराळे येथील एका माध्यमिक शाळेत शिक्षण घेत होती. याच




शाळेत आरोपी शिक्षक रमेश पाटील हा अद्यापनाचे काम करीत होते. तिला तु माझ्या घरी ये मी दहावीचा पेपर सोडविण्यास मदत करतो,जेण करुन तुला जास्त मार्क पडतील व तुझा बोर्डात नंबर येईल अशी भुलथाप मारुन घरी बोलावून तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य सदर शिक्षकाने केल्यानंतर दि.२८ एप्रिल रोजी मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला होता. सदर घटनेला जवळपास एक महिना होत आला तरीही तपास अधिकार्याला साधा शिक्षकी पेशातला आरोपी पकडता न आल्यामुळे तपासावरच सुज्ञ नागरिक शंका व्यक्त करुन दरोड्यातील अट्टल गुन्हेगार या अधिकार्याला कसे काय सापडणार? असाही संतापजनक सवाल केला जात आहे. शिक्षक हा शिक्षण क्षेत्रातील साधा म्हणून ओळखला जातो मात्र तो पोलीसांना महिन्यानंतरही न सापडणे म्हणजे अजबच प्रकार म्हणावा लागत असल्याच्या तिखट प्रतिक्रीया व्यक्त होत आहेत. सदरचा आरोपी हा कर्नाटकामध्ये गेला असल्याची चर्चा आहे. आरोपीला शोधण्यासाठी पोलीस प्रशासनाकडे अनेक नवीन तंत्रज्ञान उपलब्ध असताना हे अधिकारी मात्र चिडीचूप कसेकाय आहेत असाही सवाल केला जात आहे. परिणामी सदर पिडीतेला न्याय कसा मिळणार? यावरही प्रश्नचिन्ह उभे असल्याने कोल्हापूर परिक्षेत्र विभागाचे कर्तव्यदक्ष अधिकारी पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांनी गांभीर्यपुर्वक लक्ष घालून सदर पिडीतेला न्याय मिळवून द्यावा अशी मागणी होत आहे.

### पंचाप्पा तोडकरी यांचे निधन

**अक्कलकोट, दि. २७ मे-**



अक्कलकोट येथील जेऊर रोड जवळील प्रियदर्शनी सोसायटी येथील माजी सैनिक कै. पंचाप्पा शिवराया तोडकरी यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसयी ते ७६ वर्षांचे होते. त्यांच्यावर सोमवार २६ मे रोजी अक्कलकोट विरक्त मठ येथे अंत्यविधी करण्यात आले. त्यांचे पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुलह, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# जिल्हा परिषद शिक्षकांच्या संवर्ग-२ च्या बदल्यात गैरप्रकार

## ● एकल शिक्षकांवर अन्याय

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२७ मे-**

जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्यांची चाहूल लागताच मनासारखी पदस्थापना घेण्यासाठी काही गुरुजी गैरमार्गाचा अवलंब करतात. त्यामुळे संवर्ग १ च्या बदल्या दरवर्षीच वादाच्या भोवऱ्यात असतात. परंतु संवर्ग-२ च्या बदल्यात देखील अनेक वर्षांपासून गैरप्रकार सुरु असल्याचा मुद्दा आता समोर आला आहे. यामुळे एकल शिक्षकांवर जास्त अन्याय होत असल्याची भावना तीव्र होत असून संवर्ग-२ च्या बदल्यात प्रशासनाने शासन निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी मागणी शिक्षकांमधून होत आहे.

जि.प. प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हा अंतर्गत बदल्यांसाठी शासनाने सुधारित धोरण राबवले आहे. बदल्यासाठी संवर्ग १ ते ४ अशी वर्गवारी केली आहे. शिक्षक पती-पत्नी एकत्रीकरणासाठी त्यांना विशेष संवर्ग-२ चा दर्जा प्राप्त झालेला आहे. उपरोक्तप्रमाणे पती-पत्नी एकत्रीकरण झाल्यावर संबंधित कर्मचाऱ्यांच्या बदलीसाठी शासन निर्णयात नमूद केलेल्या कार्यपद्धती लागू असणार आहेत. जर दोघे पती-पत्नी जिल्हा परिषदेमध्ये शिक्षक असतील तर एकत्रीकरण झाल्यानंतर त्या दोघांना एक एकक म्हणून विचारात घ्यावयाचे आहे. यापैकी





एकाचीही बदली पात्र सेवा झाल्यास, त्या दोघांनाही बदलीस पात्र धरण्यात येईल, असे शासन निर्णयात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. असे असताना देखील प्रशासनाने सदरील बाबीकडे दुर्लक्ष करत यापूर्वी संवर्ग-२ चा लाभ घेतलेल्या जोडीदारांपैकी ज्या जोडीदाराची बदलीस पात्र सेवा झाली नसली तरी जोडीदार बदली पात्र असल्याने तोही बदली पात्र होतो. अशा शिक्षकाचे नाव बदली पात्र यादीतून प्रशासनाने जाणीवपूर्वक वगळलेले आहे. सन २०१७ च्या शासन निर्णयानुसार २०१८ साली एकत्रीकरण झालेल्या जिल्हा परिषदेमधील पती-पत्नींनी एक एकक म्हणून दोघांची बदली करण्याऐवजी गैरवर्तणूक करत जोडीदारापैकी फक्त एकाचीच संवर्ग-४ मधून बदली सन २०१९ व सन २०२३ मध्ये करुन घेतली आहे. सदरील बाबीकडे प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले आहे. सन २०२५ च्या बदल्यात ते पुन्हा संवर्ग- २ चा लाभ घेण्यासाठी सज्ज झाले आहेत. त्याचबरोबर काही पती-पत्नींनी संवर्ग-२ मध्ये एकत्रीकरण करताना जोडीदाराच्या कार्यालयापासून ३० कि.मी. पर्यंत शाळेचा पसंती क्रम देणे आवश्यक असताना देखील गैरवर्तणूक करत ३० कि.मी. च्या बाहेरील शाळेचे पसंती क्रम देऊन पदस्थापना मिळवली आहे.

सन २०२५ च्या आता होवू घातलेल्या बदल्यात काही शिक्षक पुन्हा संवर्ग-२ चा लाभ घेण्यासाठी सज्ज झाले आहेत, अशी चर्चा आहे. यामुळे एकल शिक्षकावर जास्त अन्याय होत असून प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे व चुकीच्या पद्धतीने संवर्ग २ चा लाभ घेणाऱ्यांना आळा घालावा तसेच उपरोक्त शासन निर्णयानुसार संवर्ग - २ चा एकदा लाभ घेतलेल्या जि. प. सेवेत असलेल्या दोन्ही पती-पत्नीची नावे बदलीपात्र यादीत आणण्याची मागणी शिक्षकांमधून होत आहे.

> तालुकास्तरावर पडताळणीसाठी त्रिसदस्यीय समिती आहे. ते पडताळणी करतीलच, या उपरही कोणी चुकीच्या पद्धतीने लाभ घेतल्याचे भविष्यात निदर्शनास आले तर बदली तर रद्द होईलच, पण संबंधितांवर शिस्तभंगाची कठोर कारवाई देखील करण्यात येईल. सीईओ यांनी वेळोवेळी तशा लेखी सूचना देखील संबंधितांना दिल्या आहेत. त्यामुळे कोणीही चुकीच्या मार्गाला जावू नये.
>
> **- कादर शेख, शिक्षणाधिकारी, प्राथमिक, सोलापूर**

# यंदा जिल्ह्यात ५ लाख हेक्टरपर्यंत खरीप पेरणी

- **जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांचा अंदाज**
- **दीड लाख हेक्टरवर दिसणार सोयाबीन**
- **मे अखेरपर्यंत पाऊस होणार कमी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

खरिपात तूर, सोयाबीन, उडीद, तीळ, मूग, मका आदींची पेरणी मोठ्या प्रमाणात होत असते. गतवर्षीप्रमाणेच यंदाही खरिपाच्या पेरणीला पुरक पाऊस पडू लागल्याने पावसाने उघडीप देताच आपल्या जिल्ह्यातील बळीराजा तिफणीवर हात ठेवणार आहे. दरम्यान, यावर्षी या खरीप हंगामात ५ लाख हेक्टरपर्यंत खरिपाचा पेरा होण्याची शक्यता असून, यामध्ये दीड लाख हेक्टरपर्यंत सोयाबीनची पेरणी शेतकरी करतील अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी आज (दि. २७) दिली. दरम्यान, रोहिणी नक्षत्रातील सुरू असलेला पाऊस २९ मे नंतर कमी होणार असल्याचा अंदाजही त्यांनी बांधला आहे.

सध्या धोऽधो पाऊस पडत असल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. सध्या खते-बियाणे बाजारातून आणून शेतकऱ्यांनी घरात ठेवली आहेत. शेतकरी पाऊस उघडण्याची सध्या वाट पहात आहेत. आता मान्सुनही केरळात दाखल होत असल्याने पाऊस थांबतो



की नाही? अशीही भीती शेतकरी बांधव व्यक्त करीत आहेत. असा रोजच पाऊस चालू राहिला तर खरिपाची पेरणी लांबण्याची भीती व्यक्त होत आहे. मात्र येत्या मे अखेर पाऊस थांबेल, असा अंदाज कृषी अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. यामुळे जूनमध्ये पेरण्या वेगात होणार आहेत. सुरूवातीला मराठवाड्यात घेतले जाणारे सोयाबीन पीक या दोन-तीन वर्षात सोलापुरातील शेतकरीही दणकावून घेत आहेत. कमी वेळेत आणि नगदी पैसे या पिकाला मिळत असल्याने शेतकऱ्यांचा कल या पिकाकडेच सध्या आहे. गतवर्षी खरिपातील अर्ध्याच्यावर क्षेत्रावर सोयाबीन पेरणी झाल्याने यंदाही या क्षेत्राच्या टक्केवारीत वाढच होण्याचे संकेत येथील कृषी विभागाकडून मिळाले. दरम्यान, पेरणीची गडबड न करता कृषी विभागाच्या आवाहनानुसार ७ मे नंतरच पेरणी करावी, असे सांगण्यात आले आहे. कारण, मृगात पेरणी केलेल्या पिकांवर विघ्नांचे प्रमाण कमी असते; यामुळे सर्वच शेतकऱ्यांची पेरणीची घाई करू नये, असा सल्ला कृषी विभाग देत आहे. बियाणे-खते कोणाला नाही मिळाल्यास क्यु आर कोडवर तक्रार करण्याचे आवाहनही कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.




### लक्झरी बसमधून पडल्याने एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**मोहोळ, दि. २७ मे-**

लक्झरी बसच्या उघड्या दरवाजातून खाली पडल्यामुळे एका इसमाचा मृत्यू झाला. ही घटना सावळेश्वर (ता. मोहोळ) जवळ हायवेवर असणाऱ्या तुळजाई हॉटेल समोर घडली.

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि.१५ मे रोजी लक्झरी बस क्रमांक पी वाय ०५ / ए३०४३ही पुण्याकडून सोलापूरला जात होती.दरम्यान मोहोळ पासून पुढे गेल्यानंतर सावळेश्वरच्या अलीकडे हायवेवर असणाऱ्या हॉटेल तुळजाईच्या समोर ही गाडी आली. या लक्झरी बसचा दरवाजा उघडा होता.त्यामध्ये असणारा नागेश गिरीमल्लाप्पा परतकर (वय ३५) राहणार मडयाळ आळंद(कर्नाटक) हा लक्झरी बस उघड्या दारातून खाली पडला.त्यात तो गंभीर जखमी झाला. उपचार सुरू असताना तो मयत झाला याबाबतची फिर्याद मयताची आई कस्तुरीबाई गिरीमल्लाप्पा परतकर (रा. मडियाळ आळंद कर्नाटक सध्या पुणे ) यांनी दाखल केली आहे. अधिक तपास पो.हे.कॉ अतुल क्षीरसागर करत आहे.

# मंगळवेढ्यात रेशन कार्डासाठी आलेल्या महिलेस तिष्ठत ठेवल्याने आली चक्कर

### रेशन कार्ड धारकांची कामे वेळेत न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.२७ मे-**

मंगळवेढा तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात रेशनकार्ड संदर्भात आलेल्या एका ३५ वर्षीय महिलेला कामासाठी दिवसभर तिष्ठत बसावे लागल्याने दुपारी ३.२० वाजता सदर महिलेला चक्कर आल्याने ती चक्क रस्त्यावर पडल्याचा प्रकार दि.२६ मे रोजी घडला आहे. दरम्यान चक्कर येवून पडल्यानंतर मोठा समुदाय जमा होवून पुरवठा विभागातील कार्यालयात जावून तेथील अधिकाऱ्यांना याबाबतचा जाब विचारत कामकाजाबाबत संताप व्यक्त केला.

मंगळवेढा तहसील कार्यालयातील वरील मजल्यावर पुरवठा विभाग असून प्रत्येक कुटुंबाशी निगडीत रेशनकार्ड असल्यामुळे तालुक्याच्या कानाकोपर्यातून अनेक कार्डधारक नवीन रेशन कार्ड काढणे, कार्ड विभक्त करणे, विवाहितेचे नाव कमी करणे,नाव समाविष्ट करणे आदी कामासह ते अनेक कार्डधारकांच्या धान्य मिळत नसल्याने या कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत. सोमवार दि.२६ मे रोजी जयश्री बिराप्पा पडवळे (वय ३५,रा.शिवणगी) ही महिला ऑनलाईन रेशन कार्डासाठी आली होती. ही महिला सकाळी ९.३० वाजता तहसिल कार्यालयच्या पुरवठा विभागात आली. दुपारी ३ वाजे पर्यंत थांबूनही तिचे कुठलेच काम न झाल्यामुळे वरच्या मजल्यावरुन खाली रस्त्यावर आल्यानंतर ३.२० वाजता कार्यालयाच्या साईडच्या बाजूला चक्कर येवून रस्त्यावर पडली. या दरम्यान जाणार्या येणार्या लोकांनी तिला बॉटल मधील पाणी पाजून बसविल्यानंतर शुध्दीवर आली. तद्नंतर




शिवसेना गटाचे बोराळचे राजकुमार स्वामी व अन्य सामाजिक कार्यकर्ते सदर महिलेला घेवून पुरवठा कार्यालयात आले व त्यांनी घडलेला प्रकार हा केवळ पुरवठा विभागातील कर्मचारी नागरिकांची वेळेत कामे करत नसल्यामुळे महिलेला तिष्ठत थांबावे लागले व ती चक्कर येवून पडल्याचा आरोप स्वामी यांनी केला. यावेळी पुरवठा विभागाचा तात्पुरता कार्यभार असलेल्या निवडणूक विभागाच्या जयश्री स्वामी यांनी यापुढे आलेले सर्व अर्ज निकाली काढण्यात येतील असे सांगितले. या प्रसंगी उपस्थित नागिकांनी अनेक प्रश्नांचा अधिकार्यावर भडीमार केला. पुरवठा कार्यालयात कर्मचार्यांचा तुटवडा व वेबसाईड सतत बंद पडत असल्यामुळे कामे होत नसल्याचे सांगण्यात आले. धान्या मिळत नसलेबाबतचे गोरगरीबांचे गत जून महिन्यातील आर्ज आद्यापही निकाली काढण्यात आले नाहीत.यावेळी राजकुमार स्वामी यांनी रेशनकार्ड संदर्भातील अडचणी तात्काळ दुर कराव्यात या मागणीचे निवेदनही दिले. कागदपत्रे देवूनही वेळेत कामे पुर्ण होत नाहीत. सर्व्हर बंद असल्याचे कारण सांगून नागरिकांना त्रास दिला जात आहे. या निवेदनाची दखल घेवून आठ दिवसात सर्व पेंडींग अर्ज निकाली काढण्यात यावेत अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

## दक्षिण भारत जैन सभेच्या अध्यक्षपदी भालचंद्र पाटील

**जयसिंगपूर दि.२७ दि. मे-**

दक्षिण भारत जैन सभेच्या घटनेतील तरतुदीनुसार सभेच्या मध्यवर्ती कार्यकारी मंडळाच्या बैठकीत उद्योजक भालचंद्र विरेंद्र पाटील यांची अध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली. प्रारंभी सभेशी संबंधित विविध क्षेत्रातील मयत व्यक्तींना णमोकार मंत्राने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दक्षिण भारत जैन सभेच्या माजी अध्यक्ष शरयूताई दफ्तरी यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. दक्षिण भारत जैन सभा ही गेली १२५ वर्षे जैन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी कार्यरत आहे.या संस्थेच्या माध्यमातून स्व. रावसाहेब



आण्णासाहेब पाटील बोरगाव यांनी जैन समाजाच्या हितासाठी भरीव योगदान दिले आहे. स्व. रावसाहेब दादांच्या निधनानंतर दक्षिण भारत जैन सभेचे तत्कालीन केंद्रीय उपाध्यक्ष व रावसाहेब दादांच्या नेतृत्वाखाली सभेच्या कामात सक्रिय राहिलेले मा. भालचंद्र विरेंद्र पाटील यांची अध्यक्ष म्हणून गेल्या वर्षी निवड झाली होती. सन २०२५ ते २०२८ या कालावधीकरीता पुन्हा त्यांची अध्यक्ष म्हणून मध्यवर्ती कार्यकारी मंडळाने निवड केली आहे. मध्यवर्ती मंडळाच्या बैठकीत उपस्थित ७२ पैकी ६८ सदस्यांनी एकमुखी हात उंचावून या निर्णयाला मान्यता दिली.

# शनिरत्न पुरस्कार शनिदेवाचा आशिर्वाद म्हणून स्विकारला

- **गहिनीनाथ औसेकर महाराज यांचे प्रतिपादन**
- **शनिशिंगणापुरात शनिरत्न पुरस्काराचे वितरण**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ मे -**

शनिरत्न पुरस्कार शनिदेवाचा आशिर्वाद म्हणून स्विकारला आहे. पुरस्कार मिरविण्यात अहंकार वाढतो तर आशीर्वादाने पदरी पुण्य वाढते. लाखो, कोट्यावधी विठ्ठल भक्तांचा सेवेकरी म्हणून काम करण्यात आत्मिक समाधान आहे. पंढरपूरचे तिर्थक्षेत्राचे हाती घेतलेले सेवाकार्य निरंतर सुरु राहील असे प्रतिपादन विठ्ठल-रुक्मीणी संस्थान (पंढरपूर)चे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केले.




शनिशिंगणापुर येथील शनैश्वर देवस्थान ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष बाबूराव बानकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारा २१ वा शनिरत्न पुरस्कार औसेकर महाराज यांना देण्यात आला. अध्यक्षस्थानी पद्मश्री पोपटराव पवार होते. देवगड संस्थानचे प्रमुख महंत भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन औसेकर महाराजांचा सन्मान करण्यात आला. संत एकनाथ महाराजांचे वंशज प्रविण महाराज गोसावी, कारभारी महाराज झरेकर, संत ज्ञानेश्वर संस्थानचे विश्वस्त विश्वासराव गडाख, अतुल महाराज आदमाने, शहाजी जोशी, श्रीरंग महाराज औसेकर, कारभारी महाराज पंडित, देवस्थानचे अध्यक्ष भागवत बानकर,उपाध्यक्ष विकास बानकर, माजी उपाध्यक्ष सुरेश बानकर, सयाराम बानकर आदी उपस्थित होते.चिटणीस आप्पासाहेब शेटे यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्ष भागवत बानकर, उपाध्यक्ष बिनकर, कार्यकारी अधिकारी जी.के.दरंदले, सहायक कार्यकारी अधिकारी नितीन शेटे व सर्व विश्वस्तांनी उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार केला. लेखन कार्याबद्दल डॉ. बापूराव देसाई व विश्वस्त डॉ.शिवाजीराव दरंदले यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी स्व. बाबुराव बानकर यांच्या माहितीपर पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. सूत्रसंचालन गणेश हापसे यांनी केले. आभार शिवाजीराव दरंदले यांनी मानले.

# गाव खेड्यातील तरुण उद्योजक होईल : राजेंद्र पवार

## बार्शीतील उद्योगक्रांती अधिवेशनात प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२७ मे-**

गाव खेड्यातील शेतीवर अवलंबून असणाऱ्या प्रत्येक तरुणांनी व्यवसायाचा अभ्यास करावा. त्याचबरोबर यश अपयश याची कारणे शोधावीत. त्यानंतर त्या व्यवसायामध्ये पाऊल ठेवावे. तुम्हाला उंच शिखरापर्यंत जाण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. या उद्योगक्रांती अधिवेशनाच्या माध्यमातून गावखेड्यातील तरूण उद्योजक झाल्याशिवाय राहणार नाहीत असा विश्वास बारामती ॲग्रोचे चेअरमन राजेंद्र पवार यांनी आपले अध्यक्ष मनोगत व्यक्त करताना व्यक्त केला.

येथील यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक



सभागृहात रविवारी दि. २५ मे रोजी संभाजी ब्रिगेड तालुकाध्यक्ष आनंद काशीद यांच्या माध्यमातून उद्योगक्रांती अधिवेशन आयोजित केले होते. या अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते. छत्रपती संभाजी महाराज यांच्या मूर्तीच्या पूजनाने व दीपप्रज्वलनाने सुरूवात झाली. यावेळी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, नवनाथ कसोटी, राजाभाऊ देशमुख, शिवाजी कादे, मकरंद निंबाळकर, युवराज काटे, लक्ष्मण संकपाळ, विनोद वाणी, विक्रम सावळे, तालुकाध्यक्ष आनंद काशीद, जिल्हाध्यक्ष सचिन जगताप उपस्थित होते. या अधिवेशनाच्या पहिल्या सत्रामध्ये डॉ. संदीप तांबारे यांनी उद्योगांमध्ये पडल्यानंतर निर्व्यसनी होऊन व्यवसाय करण्याचे आवाहन केले. दुसऱ्या सत्राचे वक्ते उद्योग व सबसिडी कन्सल्टंट रवींद्र ढवळे यांनी शासनाच्या अनेक योजनांचा तसेच सबसिडीचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्राचे मार्गदर्शक प्रा. किरण आवटे यांनी शेती तोट्यात, नोकरी लागत नाही, त्यामुळे उद्योगाशिवाय पर्याय नसल्याचे सांगितले. उद्योगात पडा. त्यामुळे आपलं कुटुंब व आपला गाव, समाज सुधारल्याशिवाय राहणार नसल्याचे मत व्यक्त केले. चौथ्या सत्राचे वक्ते इम्पोर्ट एक्सपोर्ट उद्योजक किरण डोके यांनी सोलापूर व परिसरातील शेतमालास जागतिक स्तरावर खूप मागणी असल्याचे सांगून इम्पोर्ट एक्सपोर्ट करायला आम्ही आपल्या सोबत मदतीचा हात द्यायला तयार असल्याचे सांगितेले. राजशेखर पाटील, नवनाथ कसपटे यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन खंडू डोईफोडे यांनी केले. आनंद काशीद यांनी आभार मानले. शिवाजी गादे, विक्रम घाईतडक, पांडुरंग घोलप, अभिजीत मोरे, काशिनाथ शिंदे, बालाजी डोईफोडे, पंकज पिसाळ यांच्यासह संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित



# सोलापूरकरांना हवा 'विकास' पण विमान म्हणतयं 'गोव्या'ला चला


## ● विमानसेवा पाहिजे सोलापूर ते मुंबई आणि सोलापुरातून विमान उड्डाणाची वेळ हवी सकाळची; नाईट लँडिग गरजेचे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

नवीन उद्योग, आयटी कंपन्या नसल्याने सलग दोन जनगणना सोलापूर शहराची लोकसंख्या कमी होत आहे. सोलापुरातून सोलापूर-मुंबई-सोलपूर अशी दैनंदिन विमानसेवा सुरु करा, नाईट लँडिगची सुविधा करावी आणि सोलापुरातून विमान उडण्याची वेळ सकाळची असावी या मागण्या करत सोलापूरकर सोलापूरच्या विकासाची मागणी करीत असताना पालकमंत्री म्हणत आहेत अगोदर सोलापूर-गोवा विमानसेवा सुरु करू नंतर मुंबईची पण सुरु होईल. सरकारच्या या धोरणामुळे उद्योजक, व्यापाऱ्यांसह सोलापूरकर पण नाराज आहेत. विमानसेवेचे अनेक मुहुर्त टळल्यानंतर आता फ्लॉय ९१ कंपनीकडून सोलापूर-गोवा विमानसेवेची ९ जून ही नवीन तारीख घोषित झाली आहे. सोलापूरकर पावसाळ्यात गोव्याला जाण्यासाठी किती पसंती देणार हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

खूप वर्षापासून सोलापूरच्या होटगी रोड विमानतळावरून विमानसेवा सुरु होणार आणि सोलापूरचा विकास होणार अशा चर्चा होत्या. दरम्यान विमानतळालगतच्या साखर कारखान्याच्या चिमणीचा अडथळा असल्याने विमानसेवा सुरु होत नसल्याचे सांगण्यात आले. कारखान्याची अनधिकृत चिमणी पाडण्यासाठी सरकार आणि महापालिकेला तब्बल सात ते आठ वर्षे लागली. होटगी रोडवरील सुशोभित विमानसेचे उद्घाटन पंतप्रधान मोदींच्या हस्ते नऊ महिन्यापूर्वी झाले. केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सोलापुरात येवून विमानसेवा सुरु होत असल्याचे सांगत २३ डिसेंबर ही तारीख देखील घोषित केली. सोलापूर ते मुंबई विमानसेवेची मागणी असतानाही सोलापूर ते गोवा विमानसेवा सुरु करू आणि त्यानंतर सोलापूर ते मुंबई विमानसेवा देखील सुरु करू असे सांगण्यात आले. परंतु त्या विमानसेवेलाही चार महिन्यानंतर मुहूर्त लागला. सोलापूर मुंबई नाही पण सोलापूर-गोवा विमानसेवा मात्र सुरु होत आहे.

सोलापुरातील उच्चशिक्षित युवा-युवती रोजगारासाठी सोलापूर सोडून जात आहेत. मागील सलग दोन जनगणनेत सोलापूर शहराची लोकसंख्या वाढलेली दिसत नसून कमी होत चालल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झालेले आहे. केवळ सोलापुरात मोठे उद्योग नाहीत तर आजच्या युवकांना आवश्यक आयटी पार्कदेखील सोलापुरात होत नाही. सोलापुरात विमानसेवा नसल्याने उद्योग, आयटी पार्क होत नसल्याचे येथील उद्योजक, व्यापारी यांचे म्हणणे आहे. विविध संघटनांच्या माध्यमातून सोलापूरकर सातत्याने विमानसेवेची मागणी करीत आहेत. परंतु सोलापूरला सध्या सक्षम नेतृत्वच नसल्याने सोलापूकरांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत आहे. मागील काही वर्षांपासून सोलापूरला उपरा पालकमंत्री असल्याने ते केवळ शासकीय बैठकांसाठी सोलापूरचा धावता दौरा करतात. एक दिवसाच्या दौऱ्यात मॅरेथॉन प्रशासकीय बैठका घेतात अन् दौरा आटोपतो. त्यामुळे पालकमंत्री सोलापूरला आले कधी अन् गेले कधी हे देखील सोलापूरकरांना लवकर कळत नाही.



सोलापूर विकास मंचच्या वतीने विमानसेवेसह सोलापूरच्या इतरही रखडलेल्या विकासकामांसंदर्भात सातत्याने आवाज उठविला आहे. परंतु त्यांच्या आंदोलनांना देखील शासन-प्रशासनाकडून पाने पुसण्याचा प्रकार सुरु आहे. कारण मागणीनुसार मुंबईला विमानसेवा सुरु न करता गोव्यासाठी विमानसेवा सुरु होत आहे.

सोलापूर शहर-जिल्ह्यात सत्ताधारी भाजपाचे पाच आमदार आहेत, त्यांच्याकडून देखील सोलापूरच्या विकासाबाबत जुजबी प्रयत्न होताना दिसतात, पण त्यांना देखील सरकार दाद देत नसावे असेच जाणवत आहे, कारण वर्षेनुवर्षे सोलापूरच्या विकासाचे प्रश्नच सुटत नाहीत. वास्तविक पाहता भाजपाच्या पाच आमदारांनी एकत्र दबाव गट तयार करून शहर व जिल्ह्याच्या विकासकामांसाठी मंत्रालयीन स्तरावरून अथवा मुख्यमंत्र्यांकडे सातत्याने पाठपुरावा करण्याची गरज व्यक्त होत आहे. सोलापूरचे नेतृत्व कोण करावयाचे यापेक्षा सोलापूरचा धमाकेदार विकास तर सोडाच पण रखडलेली विकासकामे तरी पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची गरज आहे. सोलापूर शहर-जिल्ह्यात विरोधी पक्षाचे दोन खासदार आणि पाच ते सहा आमदार आहेत. त्यांच्याकडून जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत रखडलेल्या विकासकामांबाबत आवाज उठविला जातो पण बैठक संपताच सर्वकाही शांत होते. विरोधकांनीदेखील विरोधकांची भूमिका तीव्र आंदोलने उभी करून त्यात सातत्य ठेवण्याची गरज आहे. सत्ताधारी आणि विरोधकांनी सोलापूरच्या विकासासाठी का होईना सरकार दरबारी एकी दाखवून सोलापूरकरांची मने जिंकावीत अन्यथा सोलापूरकर नेहमीप्रमाणे राजकारण्यांच्या नावाने बोटे मोडणार हे मात्र नक्की. कारण दुहेरी जलवाहिनी पूर्णत्वास येण्यास सात वर्षे लागली तरी शहराला दिवसाआड पाणीपुरवठा होणार नाही. कारण शहरातील अंतर्गत पाणीपुरवठा वितरण प्रणाली सुधारित करण्यासाठीचा आठशे कोटींचा प्रस्ताव प्रलंबितच आहे. उड्डाणपूल बारा वर्षांपासून रखडलेले आहेत. जिल्ह्यातील सिंचन योजना अर्धवट आहेत. उजनी धरणावर पर्यटन होत नाही. नमामी चंद्रभागा कागदावर आहे. धार्मिक पर्यटनाला चालना मिळत नाही. स्मार्ट सिटीची कामे दर्जाहिन आहेत. महापालिका व नगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे प्रचंड वाढलेली आहेत.

गेल्या तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नसल्याने प्रशासन आणि नागरिक यांच्यामध्ये सध्या कोणताही दुआ नाही. त्यामुळे अनेक नागरी व प्रशासकीय समस्या कोणापुढे मांडायच्या असा नागरिकांसमोर प्रश्न आहे. येत्या तीन महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजेल आणि रणधुमाळी सुरु होईल. लोकसभेला वेगळे आणि विधानसभेला वेगळे मतदान करणाऱ्या सोलापूरकरांकडून स्थानिक संस्था निवडणुकांसाठी वेगळेच मतदान झाल्यास आश्चर्य वाटायला नको. कारण मते मागायला जाताना मतदारांकडून सोलापूरच्या विकासाचे काय झाले असे, प्रश्न येणार हेदेखील निश्चित आहे. बाकी सोलापूरकर नेहमीप्रमाणे रामभरोसेच असल्याची शोकांतिका कायम आहे.

**प्रशांत माने**
**मो. ९८८११९१४४३**

### 'वेळेची सोय पाहिल्यास विमानापेक्षा सिध्देश्वरची बरी'

सोलापूरच्या व्यापारी, उद्योजकांसाठी सोलापूर-मुंबई सिध्देश्वर एक्सप्रेस ही रेल्वे खूपच सोयीची आहे. कारण ही रेल्वे सोलापुरातून रात्री साडेदहा वाजता सुटते आणि मुंबईला पहाटे सहा वाजता पोहचते. दिवसभर व्यापारी, उद्योजक आपले मुंबईतील काम पार पाडतात आणि रात्रीच्या सिध्देश्वरने सोलापूरला परत येतात. दोन रात्रीचा रेल्वे प्रवास आणि दिवसभर मुंबईतील कामे आटोपने हे व्यापारी, उद्योजकांना सोयीचे जाते. पण सोलापुरातून विमानसेवेची मुंबईला जाण्याची वेळ दुपारची असल्यास आणि लगेच काही तासातच मुंबईहून सोलापूरला येण्यासाठी विमानाची वेळ असेल तर मात्र सोलापुरातील व्यापारी, उद्योजकांसाठी विमानाची ही वेळ गैरसोयीची ठरते. सोलापुरातून सकाळी लवकर मुंबईसाठी आणि नाईट लँडिग नसल्याने मुंबईतून पाच वाजता विमान सुटल्यास सोलापूरकरांना ते सोयीचे होणार आहे.

---

# छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणागीत पुरस्कार अमित शाह यांच्या हस्ते प्रदान

### स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानने स्वीकारला पुरस्कार

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२७ मे :**



छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने राज्य शासनाकडून स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर लिखित अनादि मी.. अनंत मी... या गीताला राज्य प्रेरणागीत पुरस्कार केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत वर्षा'' या शासकीय निवासस्थानी प्रदान करण्यात आला. स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर लिखित अनादि मी.. अनंत मी... या गीताला राज्य शासनाचा छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणागीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्याकरिता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानचे रणजित सावरकर, श्रीमती अशीलता राजे, स्वप्निल सावरकर, मंजिरी मराठे, अविनाश धर्माधिकारी आदी उपस्थित होते. यावेळी केंद्रीय गृहमंत्री शाह आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या राष्ट्रीय स्मारकासाठी २ लाख रुपयांचा धनादेश स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपुर्द करण्यात आला. यावेळी. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे 'अनादि मी, अनंत मी..' प्रचंड आत्मबळ असलेले गीत त्यांनी लिहिले आणि रचले आहे.

---

# जैन अल्पसंख्याक महामंडळाला राज्य शासनाकडून १०० कोटी मंजूर

### जैन अल्पसंख्याक महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

जैन समाज बांधवांच्या कल्याणासाठी ४ ऑक्टोंबर २४ मध्ये जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना राज्य सरकारने केली असून, या महामंडळाद्वारे तळागाळातील जैन बांधवांचा आर्थिक आलेख वाढविण्यासाठी सर्व शासकीय योजना मिळणार आहेत. या महामंडळाचा उद्देश आणि या समाजासाठी होणारे फायदे सांगावेत आणि जैन समाज बांधवांना शासकीय योजनांचा लाभ घेता यावा म्हणून राज्यभर संवाद यात्रा सुरू केल्याचे जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

यावेळी जैन अल्पसंख्याक महामंडळाला १०० कोटी शासनस्तरावरून मंजूर झाले. या पत्रकार परिषदेला केतन शहांसह इतर पदाधिकारी उपस्थित होते. गांधी म्हणाले की, मी आज जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. शासकीय यंत्रणांनी अल्पसंख्याक समुदायासाठी योजनांची अंलबजावणी करत असताना जैन समाजातील नागरिकांनाही त्यांच्यासाठी असलेल्या योजनांची माहिती द्यावी. शालेय शिक्षण, शालेय पोषण आहार, वस्तीगृह योजना, घरकुल योजना, बँकांकडून कर्जावरील व्याज सवलत योजना आदीबाबत समाजाला जागृत करावे व त्यांना त्या योजनेचा लाभ देण्यासाठी शासकीय यंत्रणांनी काटेकोरपणे नियोजन करावे. ३० टक्के समाज मागास आहे.



प्रधानमंत्री आवास योजना शहरी अंतर्गत सोलापूर शहरात जैन समाजातील सुमारे दीडशे कुटुंबासाठी एक एकर जागा प्रशासनाने उपलब्ध करून द्यावी. समाजातील साधू संत पायी प्रवास करतात त्यांना विश्रामासाठी प्रत्येक शासकीय शाळेमध्ये शासनाच्या वतीने सभागृह निर्माण करावे. महापालिकेने शहरात वालचंद हिराचंद यांचे स्मारक व पुतळा उभारण्यासाठी जागा द्यावी, होटगी रोड येथील विमानतळाला वालचंद हिराचंद यांचे नाव देण्याचा प्रस्ताव पाठवावा, अशा सूचना प्रशासनाला केल्याचे त्यांनी सांगितले. मी जैन समाजातील बचत गटातील महिला भगिनी आणि दारिद्र्य रेषेत जीवन जगत असलेल्या नागरिकांचा आर्थिक आलेख उंचावण्यासाठी कायम प्रयत्न करणार आहे. यासाठी आजतागायत २१ जिल्ह्यात फिरलो असून, तब्बल ३६ जिल्ह्यात मी जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात महामंडळाचे एक कार्यालय काढणार असून, या कार्यालयाद्वारे सर्वांच्या अडचणी सोडविल्या जाणार आहेत.

---



# नाना पाटेकर स्वतःच दुसऱ्या स्वच्छ नानाचा सत्कार करतो तेंव्हा..

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २७ मे-**

मकरंद अनासपुरे यांच्या संगतीने नाम फाउंडेशनने देशापुढे जलसंवर्धन आणि ग्रामविकासाचा आदर्श ठेवणारा आणि बॉलीवूडमध्ये नाना नावाचा मराठी दबदबा निर्माण करणारा नाना पाटेकर! हाच नाना आपला मान समाजसेवा आणि प्रशासकीय सेवेत इतिहास घडवित असलेल्या दुसऱ्या स्वच्छ नानाला देवून त्याचा सन्मान करतो आणि टाळ्यांच्या कडकडाटाने बालगंधर्व रंगमंदिर दुमदुमून जाते!

महाराष्ट्रापुढे एक समाजसेवेचा नवा पॅटर्न ठरलेल्या बार्शी तालुका कृषी पदवीधर संघटना आणि मातृभूमी प्रतिष्ठान सारख्या संस्था उभारण्याची संकल्पना मांडून ती साकार करण्यात सिंहाचा वाटा उचलणारे स्वच्छ नाना.. सुपर क्लास वन अधिकारी.. गेल्या २५ वर्षांत लातूर, सांगली पासून मुंबईपर्यंतची सर्वोच्च पदे, अनेक वर्षे अनेक कॅबिनेट मंत्र्याचे खाजगी सचिव राहिलेले आणि सध्या कृषीमंत्री मंत्री माणिकराव कोकाटे यांचे खाजगी सचिव असलेले महाराष्ट्राच्या सहकार विभागाचे सहसचिव स्वच्छ नाना..अर्थात संतोष पाटी इर्लेकर!शंभर वर्षाचा समृद्ध इतिहास असलेली बंद पडलेली जिल्हा बँक जिवंत करणे असो, राज्याच्या सहकार कायद्याचा ड्राफ्ट बनविणे असो, शेतकऱ्यांची कर्जमुक्ती प्रक्रिया असो वा कृषी धोरण असो त्यात महत्वाची भूमिका बजावणारे संतोषनाना राज्यात एक स्वच्छ, साधे, चारित्र्यसंपन्न आणि भ्रष्टाचारमुक्त अधिकारी म्हणून लोकप्रिय आहेत. अशा नानाचा सन्मान नाना पाटेकर यांनी स्वतःचा मान त्यांना देऊन केली. पुणे येथे समाजसेवी निवृत्त अधिकारी चंद्रकांत दळवी यांनी कष्टाने घडविलेल्या सातारा जिल्ह्यातील निढळ आदर्श गावाच्या माहितीपट टिझरचे प्रकाशन सुप्रसिद्ध अभिनेते पाटेकर यांच्या हस्ते ठरले होते. पण पाटेकर यांनी महितीपटाच्या टीझरचे प्रकाशन स्वतः न करता हा मान संतोष पाटील यांना दिला आणि दुसऱ्या स्वच्छ नानाचा गौरव केला! संतोष पाटीलही काही क्षण भांबावले पण त्यांच्या आनंदालाही पारावर राहिला नाही.

---

# पंढरपूर कॉरिडॉर सर्व्हेक्षणाला सहकार्य न केल्यास रेडीरेकनर दरानुसारच भरपाई

### ● जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचा गंभीर इशारा

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२७ मे -**

**पंढरपूर कॉरिडॉरच्या सर्व्हेक्षणाला सहकार्य न केल्यास रेडीरेकनर दरा नुसारच भरपाई देण्यात येईल असा गंभीर इशारा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिला आहे. कॉरिडॉरबाबतचा अंतिम आराखड्यावर काम सुरु असून येत्या आषाढी यात्रे नंतर ते पुर्ण होवून तो जनते समोर ठेवला जाईल अशी देखील जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिली.**



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीमप्रोजक्ट म्हणून पंढरपूर कॉरिडॉर कडे पाहिले जाते आहे. पंतप्रधानाचा हा महत्वकांशी प्रकल्प असल्याचे देशाच्या अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी मुंबई येथे सूतोवाच केल्या पासून रेंगाळलेल्या पंढरपूर कॉरिडॉरच्या विषयाला पुन्हा गती मिळाली. त्यामुळे हा प्रकल्प राबविण्याची जबाबदारी सहाजिकच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे व अजित पवार या उपमुख्यमंत्र्यांवर आलेली आहे.

दरम्यान मध्यंतरी राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी पंढरपूरात येवून प्रशासनाने तयार केलेला कॉरिडॉरच्या आराखड्याची माहिती घेतली. माहिती घेऊन प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी प्रशासनाला गो अहेड असे देखील सांगितल्याचे जाहीर केले. या बरोबरच कोणत्याही प्रकल्पाला आत्ता पर्यंत दिला गेला नाही असा मोबदला देखील या प्रकल्पा मध्ये बाधित होणाऱ्या मंडळींना दिला जाणार असल्याचे देखील मुख्यमंत्र्यांनी सांगितले.मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्या नंतर जिल्हा प्रशासन देखील अँक्टीवमोडवर आले. सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी १ आणि २ मे रोजी कॉरिडॉरमध्ये बाधित होणाऱ्या संभाव्य बाधितांशी येथील केबीपी महाविद्यालया मध्ये संवाद साधला. यावेळी बाधितांचे म्हणणे देखील त्यांनी ऐकुन घेतले. पंढरपूरकरांना विश्वासात घेतल्या शिवाय कॉरिडॉर प्रकल्प राबविला जाणार नाही. कोणाचेही नुकसान या प्रकल्पामुळे होणार नाही. कमी जागा घेऊन जास्तीत जास्त मोबदला देखील देण्यास शासन तयार आहे. या बरोबरच त्यांनी केबीपी महाविद्यालया मधील विद्यार्थ्यांकडून बाधितांची माहिती संकलित करण्यासाठी खास सर्व्हेची देखील व्यवस्था केली. नगरपालिका कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती मध्ये महाविद्यालयीन तरुणांनी बाधित मंडळींच्या सर्व्हेचे काम देखील सुरु केले. मात्र बऱ्याच संभाव्य बाधित मंडळींनी सर्व्हेला उत्तम प्रतिसाद दिला तर काहींनी सर्व्हेच्या वेळी विद्यार्थ्यांना माहितीच दिली नाही.

दरम्यान आठ दिवसांखाली माहिती न दिलेल्या मंडळींनी आपली माहिती द्यावी म्हणून येथील प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी आपल्या प्रांतकार्यालयात माहिती न दिलेल्या बाधित मंडळींच्या बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी माहिती न दिलेल्या बाधित मंडळींना नोटीस काढून त्यांनी बैठकीला येवून माहिती देण्याचे आवाहन केले होते. त्यावेळी देखील राहिलेल्या मंडळींपैकी बऱ्याच मंडळींनी काँरिडोरला विरोध असल्याचे लेखी देत सर्व्हे मधील माहिती भरुन दिली. तरी सुध्दा अजून काही बाधित मंडळी माहिती न देण्यावर आडून बसलेली आहेत. त्यामुळे सर्वांची माहिती एकत्रित केल्यावरच एक चांगले पँकेज तयार करुन त्याचा अहवाल शासनापुढे ठेवण्यात येईल असे जिल्हाधिकारी वारंवार सांगत आहेत. तरी सुध्दा काही मंडळींकडून सर्व्हे मधील माहिती देण्या बद्दल अजून देखील कानाडोळा केला जात असल्याची ओरड जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आली आहे.दरम्यान आषाढी यात्रे मधील मानाच्या पालखी प्रमुखांच्या बैठकीसाठी जिल्हाधिकारी सोमवारी (ता.२६) येथे आलेले होते. त्यावेळी त्यांनी आपणाला जर बाधित मंडळींनी माहितीच दिली नाही तर आपण चांगले पँकेज तयार करु शकत नाही. तसेच पँकेज संदर्भातील अहवाल शासनापुढे ठेवू शकत नाही. त्यामुळे माहिती न दिल्यास शासनाकडून रेडिरेकनर प्रमाणे बाधितांना मोबदला देवून काँरिडोरतर शासनाकडून राबविले जाईल असा गंभीर इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी माहिती न देणाऱ्या काँरिडोर बाधित मंडळींना दिला आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या या गंभीर इशाऱ्यानंतर काँरिडोर बाधित माहिती न दिलेल्या मंडळींच्या भूमिकेकडे आता पंढरपूरवासियां बरोबरच जिल्हा प्रशासनाचे देखील लक्ष लागलेले आहे.

माहिती देण्यासाठी आपण कोणतीही अंतिम तारीख देत नाही आहोत. माहिती द्यावी यासाठी आपण वारंवार प्रयत्न करु. पण शासकीय प्रकल्प असल्यामुळे आम्हाला देखील एका डेडलाईन मध्ये प्रत्येक गोष्टी पुर्ण कराव्या लागत आहेत. आम्ही प्रयत्न करुन देखील शेवटी बाधित मंडळींनी आपली माहिती दिली नाही तर सर्व बाधित मंडळींचा डाटा आमच्याकडे उपलब्ध होणार नाही. त्यामुळे आमच्याकडे रेडीरेकनर दरानुसार मोबदला देण्या शिवाय पर्याय नसणार आहे. त्यामुळे चांगले पँकेज मिळावे यासाठी माहिती न दिलेल्या संभाव्य बाधित मंडळींनी आपली माहिती प्रशासनाकडे जरुर द्यावी ही आपली नागरिकांना कळकळीची विनंती राहिल.

**- कुमार आशीर्वाद (जिल्हाधिकारी, सोलापूर)**

### ६४२ मालमत्ताधारक होणार बाधित

पंढरपूर काँरिडोर मध्ये ६४२च्या आसपास मालमत्ताधारक बाधित होणार आहेत. या बाधित लोकांची माहिती संकलित करण्यासाठी ८ मे ते ११ मे या कालावधीत सर्व्हेक्षण करण्यात आले. या सर्व्हे दरम्यान ५१० लोकांनी माहिती दिली तर १३२ लोकांनी माहिती दिली नव्हती. दरम्यान पुन्हा यातील १९ लोकांनी येवून माहिती दिली होती.

### भाडेकरुंची देखील माहिती घेण्यासाठी प्रशासनाला विंनती

येथील अहिल्यादेवी होळकर वाडा आणि शिंदेसरकार वाडा या ठिकाणी असलेल्या भाडेकरु व अन्य ठिकाणचे भाडेकरु असे ३० ते ४० लोकांनी प्रांताधिकारी सचिन इथापे यांची भेट घेऊन आपले देखील अर्ज भरुन घ्यावेत अशी विनंती केली होती.

### माहिती न देणाऱ्या मंडळींचे प्रांताधिकाऱ्यांकडून समपुदेशन

सर्व्हे दरम्यान माहिती न देणाऱ्या ११३ लोकांचे समुदेश करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी सोमवारी बैठक बोलाविली होती. या वेळी ४३ लोकांनी बैठकीस दांडी मारली. या बैठकीस उपस्थित असलेल्या ७० लोकांचे प्रांताधिकारी इथापे यांनी समुदेशन केले. या नंतर काही लोकांनी लगेचच जागेवर आपले माहितीचे फाँर्म भरुन दिले. तर काहींनी दुपारनंतर आपले फाँर्म भरुन दिले. साधारण या समुदेशन बैठकी नंतर ८० बाधित मंडळींनी अर्ज भरुन दिल्याची माहिती प्रांताधिकाऱ्यांकडून देण्यात आली. त्यामुळे आता फक्त ३३ लोकांचीच प्रशासनाकडे माहिती येणे बाकी आहे.

## अग्रलेख...

# चीनच्या नकाराधिकाराचा अन्वयार्थ

पुलवामा हल्ल्याच्या पृष्ठभूमीवर पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबा आणि त्याचे खतरनाक पिल्लू-दि रजिस्टन्स फ्रंट (टीआरआफ) तसेच जैश-ए-मोहम्मद यांच्यासह पाच संघटनांना ‘जागतिक दहशतवादी’ घोषित करावे, हा भारताचा प्रस्ताव रोखण्यासाठी चीनने संयुक्त राष्ट्रांच्या (युनायटेड नेशन्स-यूएन) सुरक्षा परिषदेत नकाराधिकाराचा (व्हेटो) वापर केल्याचे वृत्त हा केवळ तात्कालिक चिंतेचा विषय नाही; तो एकूण जगाच्या भविष्याबद्दल चिंता निर्माण करणारा आणि यूएनच्या रचनेतील गंभीर दोष दाखविणारा मुद्दा आहे. भारतासारख्या खंडप्राय देशाने आपल्या रक्षणार्थ जागतिक व्यासपीठावर मांडलेले सत्य नाकारण्यासाठी केवळ असूयेपोटी ‘व्हेटो’ वापरला जात असेल तर यूएन हे पाच स्थायी सदस्यांच्या हातचे बाहुले बनले आहे, असाच निष्कर्ष काढावा लागतो. यूएनने गतकाळात बरीच चांगली कामे केली असली, तरी ही जागतिक संघटना आजही फक्त पाच देशांच्या नियंत्रणात आहे आणि त्यात चीन आहे. सुरक्षा परिषद ही यूएनची सर्वोच्च यंत्रणा. तीत अमेरिका, ब्रिटन, रशिया, फ्रान्स आणि चीन असे फक्त पाच स्थायी सदस्य. म्हणायला जगातील जवळजवळ सर्व प्रमुख राष्ट्रे यूएनचे सदस्य. पण, सुरक्षा परिषदेतील एकाही स्थायी सदस्य राष्ट्राने नकाराधिकाराचा वापर केला तर कोणत्याही मुद्यावरील कोणताही प्रस्ताव रोखला जाऊ शकतो. चीनने भारताच्या प्रस्तावाच्या संदर्भात तेच केले. याची पुनरावृत्ती होता कामा नये.

यूएनमध्ये असे का घडते, हे समजून घेण्यासाठी थोडे मागे जावे लागते. पहिल्या महायुद्धाचा जगावर सामाजिक, आर्थिक, राजकीय परिणाम झाला. लाखो जीव गेले. मानसिक आजार बळावले. जगात युद्धविरोधी मानसिकता जन्माला आली. भविष्यातील युद्धे व संघर्ष रोखण्यासाठी जागतिक स्तरावर लीग ऑफ नेशन्ससारखी यंत्रणा असावी, असा विचार झाला आणि तो प्रत्यक्षातही आला. तरीही फार चांगले घडले नाही. लीग हा जागतिक पातळीवर राष्ट्रांच्या परस्पर सहकार्याचा पहिला औपचारिक प्रयोग होता. मात्र, तिला दुसरे महायुद्ध रोखण्यात यश आले नाही. पुढे लीगमधूनच संयुक्त यूएनचे स्वरूप आकाराला आले. मात्र, त्यावरदेखील लीगच्या धर्तीवर महासत्तांचेच आधिपत्य कायम राहिले. छोटे-मोठे संघर्ष घडले, पण महायुद्ध म्हणावे, असे काही यूएन अस्तित्वात आल्यानंतर घडले नाही हे खरे. मात्र, या संघर्षांमध्ये यूएनला प्रभावी हस्तक्षेप करणे जमले नाही. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि पूर्वाश्रमीचे सोव्हिएत युनियन या दोन महासत्तांनी, ते दोघेही यूएनमध्ये सर्वसत्ताधीश असलेल्या सुरक्षा परिषदेचे सदस्य असताना जगात ठिकठिकाणी कुरघोड्या आणि अप्रत्यक्ष युद्धखोरी केलीच. यूएन बघत राहिली. सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्य असलेले पाच देश हे यूएनचे म्होरके. त्यांच्यात आर्थिक, भौगोलिक वर्चस्वाचे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर केल्या जात असलेल्या हस्तक्षेपांसाठीचे संघर्ष आहेत आणि त्यामुळे सुरक्षा परिषदेचे सदस्य असूनही त्यांच्याकडून जागतिक समुदायाच्या शांततेचा विचार होत नाही. त्यामुळे भारताच्या प्रस्तावाचा विचार झाला नाही, हे तसे अपेक्षितच म्हटले पाहिजे. पुलवामामध्ये ज्या दहशतवादी संघटनेने हल्ला केला आणि ज्या संघटना भारताविरुद्ध सातत्याने कारवाया करीत आहेत, त्यांच्या संबंधीचा प्रस्ताव मान्य झाला असता तर जगाचे भलेच झाले असते. पण, भारताचे भले चीनला कधीही पाहवत नाही. यासंदर्भात संयुक्त राष्ट्रांचे विद्यमान प्रशासकीय प्रमुख म्हणजे महासचिव अँटोनियो गुटारेस यांनी एकदा काय म्हटले होते ते लक्षात घेतले पाहिजे. ते म्हणाले होते की, “सुरक्षा परिषद सध्याच्या जगाशी सुसंगत नाही. सदस्य राष्ट्रांना मी सतत परिषदेच्या विस्तारावर चर्चा करण्यासाठी विनंती करीत असतो. या विषयाची चर्चा महासभेत (जनरल असेंब्ली) व्हावी, अशी माझी इच्छा आहे. पण, परिषदेचे स्थायी सदस्य या गोष्टीसाठी सहमत होत नाहीत...” याची कारणे सुरक्षा परिषदेच्या पाच राष्ट्रांना असलेल्या नकाराधिकारात दडलेली आहेत, हे त्यांनी म्हटले नाही. पण, वास्तव तेच आहे. सुरक्षा परिषदेच्या रचनेतच प्रादेशिक असंतुलन आहे. आशियासारख्या सर्वांत मोठ्या खंडातून फक्त चीन स्थायी सदस्य. युरोप आणि आशिया खंडाला जोडलेला रशिया स्थायी सदस्य. आकाराने दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या आफ्रिका खंडातून कोणत्याही देशाला सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्यत्व नाही. तिसऱ्या क्रमांकाचा खंड उत्तर अमेरिका. त्यात फक्त युनायटेड स्टेट्स किंवा आपण अमेरिका म्हणून ओळखतो, तो एकमेव देश. चौथ्या क्रमांकावरील दक्षिण अमेरिका कुठेही नाही. फ्रान्स आणि युनायटेड किंगडम (ग्रेट ब्रिटन) ही युरोपातली दोन राष्ट्रे सुरक्षा परिषदेची स्थायी सदस्य आहेत. त्या दोघांची मिळून लोकसंख्या जेमतेम महाराष्ट्राएवढी असेल.

भारतासारखा जगातील सर्वांत मोठा लोकशाहीवादी देश सुरक्षा परिषदेत नाही. ऑस्ट्रेलिया खंडातील देश नाहीत. संयुक्त राष्ट्रांवर हुकूमत असलेल्या सुरक्षा परिषदेची रचना इतकी असंतुलित असेल तर तिच्याकडून न्यायाची अपेक्षा करणे चूक आहे, हे पुन्हा एकदा चीनच्या वर्तनावरून स्पष्ट झाले आहे. दुसऱ्या महायुद्धातील विजेत्या आणि त्यामुळेच संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्य बनलेल्या पी-५ (पी-फाईव्ह) राष्ट्रांचा गट आजही दादागिरी करतो. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, चीन आणि रशिया ही दुसऱ्या महायुद्धातील मित्र राष्ट्रे व जेती राष्ट्रे. या स्थायी सदस्यांपैकी एकानेही ठरवले तरी यूएनमधील कोणत्याही यंत्रणेचा कोणताही निर्णय रोखता येऊ शकतो. एकप्रकारे सुरक्षा परिषद ही जगावर सत्ता गाजवू पाहणाऱ्यांची परिषद आहे. आंतरराष्ट्रीय शांततेला बाधा आणणाऱ्या कोणत्याही घटनेचे विश्लेषण करणे व शांततेसाठी उपाय सुचवणे, ही सुरक्षा परिषदेची जबाबदारी असल्याचे यूएनची सनद (चार्टर) म्हणते. परिषदेच्या रचनेत कोणतीही सुधारणा करायची असेल तर यूएनच्या दोन तृतीयांश सदस्यांनी महासभेत सहमती दर्शविणे आवश्यक आहे. याशिवाय, नकाराधिकार असलेल्या पाचही स्थायी सुरक्षा परिषद सदस्यांची मंजुरीही आवश्यक आहे. ती कधीच मिळत नाही. भारताला सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्यत्व मिळावे, यासाठी अनेक देशांचा आग्रह आहे. २००५ मध्ये कोफी अन्नान यूएनचे महासचिव असताना त्यांनी सुरक्षा परिषदेची सदस्य संख्या २४ वर नेण्याची योजना मांडली होती. त्या योजनेला बासनात बांधले गेले. स्थायी सदस्यांची संख्या ५ वरच कायम ठेवून अस्थायी सदस्यांची संख्या २० वर नेण्याची सूचना करण्यात आली. विषय भलतीकडेच गेला. महासचिव राहिलेले बान की मून हे देखील सुरक्षा परिषदेच्या विस्ताराच्या बाजूने होते.

गेल्या ५०-६० वर्षांत भारतातील लाखो जवानांनी शांतता मिशनवर काम केले. या पृष्ठभूमीवर विद्यमान पाच स्थायी सदस्यांपैकी चार (चीन वगळता) देशांनी भारताच्या स्थायी सदस्यत्वाच्या मुद्याला पाठिंबा दिलेला आहे. चीन स्पष्ट विरोध कधीही करीत नाही. पण, ते घडूही देत नाही. परिषदेच्या पुनर्रचनेचा मुद्दा फक्त भारतापुरता मर्यादित नाही. परिषदेचा विस्तार सर्व खंडांना प्रतिनिधित्व देण्यासाठी आणि विकसनशील आणि तिसऱ्या जगातील देशांचा विचार करण्यासाठी होण्याची गरज आहे. भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी, संयुक्त राष्ट्रांमध्ये ‘डेमोक्रसी डेफिसिट’ आहे अर्थात अपेक्षेएवढे लोकतंत्र नाही, असे मत मांडले होते. विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही सुरक्षा परिषदेसह संयुक्त राष्ट्रसंघाच्या एकूणच पुनर्रचनेवर भर देणारे वक्तव्य महासभेच्या एका बैठकीत केले होते. आता पुन्हा एकवार सुरक्षा परिषदेच्या निर्णयांना महासभेने दोन तृतीयांश बहुमताने मंजुरी दिली पाहिजे आणि त्यात नकाराधिकाराचा विचार करू नये, अशी आग्रही मागणी लावून धरण्याची आवश्यकता आहे. महासभा आणि सुरक्षा परिषद यांच्यातील सध्याचे नाते सून आणि सासूचे आहे. सुरक्षा परिषद ही सासू आहे. ते उलटे होणे ही जगाची व काळाची गरज आहे. जगातील सर्व प्रकारचा दहशतवाद रोखण्यासाठीही ते आवश्यक आहे. ▮

## विशेष

# भारताच्या शस्त्रास्त्रांची जगाला दिसली ताकद

**प्रा. सुखदेव बखळे**

भारताने ७ मे २०२५ रोजी दहशतवादाविरुद्ध ‘ऑपरेशन सिंदूर’च्या रूपात एक मजबूत आणि अचूक लष्करी कारवाई केली. या निमित्ताने भारताने प्रथमच युद्धात ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रुझ क्षेपणास्त्राचा वापर केला. भारताने नूरखान येथील पाकिस्तानी हवाई तळावर ब्रह्मोस क्षेपणास्त्राने हल्ला केला होता. पाकिस्तानचे अणू कमांड सेंटरदेखील याच ठिकाणी आहे. या हल्ल्यानंतर पाकिस्तान हादरला. ब्रह्मोस क्षेपणास्त्र भारत आणि रशियाने संयुक्तपणे विकसित केले आहे असून उच्च गती, अचूकता आणि ‘फायर-अ‍ॅण्ड-फर्गेट’ वैशिष्ट्यासाठी ओळखले जाते. ‘ब्रह्मोस’ने पाकिस्तानमधील दहशतवादी अड्ड्यांवर, विशेषतः बहावलपूरमधील ‘जैश-ए-मोहम्मद’च्या मुख्यालयावर हल्ला केला. शत्रूच्या संरक्षण यंत्रणेला चकवा देऊन त्याने मोठे नुकसान केले आणि दहशतवादाविरुद्ध भारताचा दृढनिश्चय दर्शवला. ब्रह्मोस भारताच्या ‘डीआरडीओ’ने एका रशियन कंपनीसह संयुक्तपणे विकसित केले आहे. त्याचे नाव भारतातील ब्रह्मपुत्रा नदी आणि रशियातील मोस्कवा नदीपासून बनले आहे. हे क्षेपणास्त्र भारताच्या ‘मेक इन इंडिया’ कार्यक्रमाचे एक उत्तम उदाहरण आहे. भारत आणि रशियाने यामध्ये त्यांच्या तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. आता भारत या क्षेपणास्त्रात स्वतः बनवलेले घटकदेखील जोडत आहे. त्यात एक नवीन इंजिन आणि नेव्हिगेशन चिप जोडली आहे. ब्रह्मोस जगातील सर्वांत वेगवान क्षेपणास्त्रांपैकी एक आहे. ते आवाजापेक्षा तिप्पट वेगाने फिरते. ते थांबवणे खूप कठीण आहे. ते समुद्रावरून फक्त तीन ते दहा मीटर उंचीवर उडते. ते वाटेत अचानक दिशा बदलू शकते. त्यामुळे शत्रूला ते पकडणे आणखी कठीण होते. ब्रह्मोस अनेक प्रकारे लाँच करता येते. जमिनीवरून ते ट्रकमधून सोडले जाते, जे कुठेही वाहून नेले जाऊ शकते. हे नौदलाच्या जहाजांमधूनही सोडले जाते. हवाईमार्गे हे सुखोई-३० विमानातून सोडले जाते. पाणबुडीतून ते पाण्याखालीही सोडता येते. एकदा प्रक्षेपित झाल्यानंतर हे क्षेपणास्त्र स्वतःहून काम करते. ब्रह्मोस हा भारतीय सैन्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. याचा वापर लष्कर, नौदल आणि हवाई दल करतात. लष्कराकडे ब्रह्मोसच्या चार तुकड्या आहेत. हे क्षेपणास्त्र डोंगरातूनही सोडता येऊ शकते. भारतीय नौदलाच्या अनेक जहाजांवर ब्रह्मोस बसवलेले आहे. ते समुद्रात शत्रूच्या जहाजांना लक्ष्य करते. भारतीय हवाई दलाच्या सुखोई-३० विमानांमध्ये ब्रह्मोस आहे. ते हवेतून शत्रूवर हल्ला करू शकते. भारताने या क्षेपणास्त्राची अनेक वेळा चाचणी केली आहे. ते खूप दूरपर्यंत अचूक मारा करू शकते.



ब्रह्मोस आता इतर देशांमध्येही विकले जात आहे. भारतासाठी ही खूप मोठी गोष्ट आहे. पूर्वी त्याची रेंज २९० किलोमीटर होती; पण २०१६ मध्ये भारत एका विशेष गटाचा (एमटीसीआर) सदस्य झाला. यानंतर, ब्रह्मोसची श्रेणी ४००-९०० किलोमीटरपर्यंत वाढवण्यात आली. तथापि सध्या फक्त २९० किलोमीटरचा पल्ला असलेली क्षेपणास्त्रेच इतर देशांना विकली जाऊ शकतात. ब्रह्मोस खरेदी करणारा फिलिपिन्स हा पहिला देश. त्याने ३७५ दशलक्ष डॉलर किमतीचा करार केला. हे क्षेपणास्त्र समुद्र किनाऱ्यावरून शत्रूच्या जहाजांवर हल्ला करू शकते. फिलिपिन्सला तीन बॅटरी देण्यात आल्या आहेत. प्रत्येक बॅटरीमध्ये तीन क्षेपणास्त्रे असतात. या करारामुळे फिलिपिन्सची सागरी सुरक्षा मजबूत होईल. इतर अनेक देश ब्रह्मोस खरेदी करू इच्छितात. यामध्ये व्हिएतनाम, इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड आणि ब्रुनेईसारख्या देशांचा समावेश असू शकतो. हे देश दक्षिण चीन समुद्रातील चीनच्या कारवायांबद्दल चिंतेत आहेत. व्हिएतनाम आणि इंडोनेशिया लवकरच ब्रह्मोस खरेदी करू शकतात. याशिवाय ब्राझील, चिली, ओमान, सौदी अरेबिया, इजिप्त आणि दक्षिण आफ्रिकादेखील या क्षेपणास्त्रात रस दाखवत आहेत. रशियालाही ते आपल्या विमानांसाठी खरेदी करायचे आहे. ब्रह्मोसमध्ये आणखी सुधारणा करण्याचे काम सुरू आहे. दोन नवी क्षेपणास्त्रे विकसित केली जात आहेत. ब्रह्मोस-एनजी हे एक लहान आणि हलके क्षेपणास्त्र असेल. ते विमान आणि पाणबुडीतून सोडता येते. त्याची चाचणी या वर्षी केली जाईल. वर्षाच्या अखेरीस ते तयार होऊ शकेल. ब्रह्मोस-२ हे एक हायपरसोनिक क्षेपणास्त्र असेल, जे सहा ते आठपट वेगाने उड्डाण करेल. त्याची मारक क्षमता १५०० किलोमीटरपर्यंत असू शकते. या नवीन क्षेपणास्त्रांमुळे भारताची ताकद आणखी वाढणार आहे. ब्रह्मोसच्या विक्रीमुळे जगात भारताची शक्ती वाढत आहे. हे क्षेपणास्त्र भारताच्या मित्रांना, विशेषतः आग्नेय आशियातील लोकांना मदत करत आहे; पण चीनला हे आवडत नाही. चीनच्या मते हे क्षेपणास्त्र त्याच्या प्रदेशात हस्तक्षेप करत आहे. भारत आपल्या मित्रांच्या सुरक्षेसाठी हे पाऊल उचलत आहे. आता उत्तर प्रदेशात ब्रह्मोस्त्र अस्त्राची निर्मिती केली जात आहे. हे उत्पादन युनिट अवकाश आणि संरक्षण क्षेत्रासाठी उच्च दर्जाचे साहित्य तयार करेल. ते चांद्रयान मोहिमेत आणि लढाऊ विमानांमध्ये वापरले जाईल.

पाकिस्तानने पाठवलेले सहाशेहून अधिक ड्रोन रोखण्यात आणि नष्ट करण्यात भारतीय लष्कराला यश आले. हे ड्रोन पश्चिम सीमा, नियंत्रण रेषा (एलओसी) आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर पाठवण्यात आले. हवाई संरक्षण प्रणाली हे एक लष्करी तंत्रज्ञान आहे, जे हवेतून निर्माण होणारे धोके रोखण्यासाठी डिझाईन केले आहे. हे धोके ड्रोन, हेलिकॉप्टर, विमाने किंवा क्षेपणास्त्रांमधून उद्भवू शकतात. या धोक्यांचा शोध घेणे, त्यांचे निरीक्षण करून नाश करणे हे त्याचे मुख्य काम आहे. ही प्रणाली एकत्रितपणे काम करणाऱ्या अनेक यंत्रांचा आणि तंत्रज्ञानाचा समूह आहे. हवाई संरक्षण प्रणालीमध्ये अनेक भाग असतात. ते हवाई धोके रोखण्यासाठी एकत्रितपणे काम करतात. प्रथम रडार आणि सेन्सर्स आकाश स्कॅन करतात आणि कोणतीही अज्ञात वस्तू दिसली, तर ताबडतोब कमांड सेंटरला माहिती पाठवतात. हे रडार दिवसरात्र सर्व हवामानात काम करते. धोका आढळतो तेव्हा रडार संबंधित आपत्तीचा वेग, दिशा आणि उंची याबद्दल माहिती गोळा करतो. ड्रोन, क्षेपणास्त्र किंवा विमानासारख्या धोक्याची व्याख्या केली जाते. एकदा धोका ओळखला की तो कसा थांबवायचा हे कमांड सेंटर ठरवते. यासाठी, जमिनीवरून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र सोडले जाते. ही क्षेपणास्त्रे धोक्याच्या दिशेने खूप वेगाने जातात आणि नष्ट करतात. अनेक हवाई संरक्षण प्रणाली गतिमान असतात, म्हणजेच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहज हलवता येतात. यामुळे गरज पडल्यास त्यांना लवकर तैनात करता येते.

पाकिस्तानमधून पाठवलेले ड्रोन पश्चिम सीमा, नियंत्रण रेषा (एलओसी) आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर पाठवण्यात आले. तेव्हा भारतीय सैन्याने हवाई संरक्षण युनिट्सचा वापर केला. त्यामध्ये विविध शस्त्रे होती. एल-७० तोफा, झू-२३ मिमी तोफा, शिल्का प्रणाली आणि विशेष ड्रोनविरोधी तंत्रज्ञानाचा यात समावेश होता. ही शस्त्रे उद्यमपूर, सांबा, जम्मू, अखनूर, नगरोटा आणि पठाणकोटसारख्या भागात तैनात करण्यात आली होती. भारतीय सैन्याच्या वेग आणि अचूकतेमुळे हे धोके पूर्णपणे दूर झाले. भारताकडे इग्ला-१एम, ओएसए-एकेएम, पेचोरा क्षेपणास्त्रे आणि अपग्रेडेड एल-७० तोफादेखील आहेत. भारताची अद्ययावत आणि सुसज्ज शस्त्रप्रणाली आता जगातील अनेक देशांना स्वसंरक्षणप्रणाली विश्वासार्ह वाटायला लागली आहे. त्यामुळे या शस्त्रास्त्रांची निर्यात वाढून भारतीय संरक्षण विभागाची बाजारपेठ वाढू शकेल. ▮

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# गरज दृष्टिकोन बदलाची!

आम्ही कायम शासकीय योजनांच्या अपयशाच्या गाथा गातो, वाचतो आणि ऐकवितोही! शेवटी यंत्रणेचा दोष असा निष्कर्ष काढला जातो आणि अपयशाचे खापर यंत्रणेवर फोडून मोकळे होतो. याचा अर्थ यंत्रणा चुकत नाही असे नाही, पण आम्ही कधी आपल्या जबाबदारीचा विचार करतो का? जिथे नातंही आपलेपणाचा भाव असल्याशिवाय टिकत नाही, तिथे तर या शासकीय योजना? त्यांच्याकडे आपण आपलं म्हणून पाहू तरच हेतू साध्य होईल, नाहीतर पैशाचा अपव्यय आणि खानापूर्ती यापेक्षा वेगळं काही नसेल!

शासनाच्या योजना म्हणजे पांढरे कागदं काळे करण्याचा धंदा असाच काहीसा भाव आमचा झाला आहे. योजना आली की ती संबंधित यंत्रणेने राबवावयाची! थेट लाभाच्या योजना असतील तर त्यासाठी तुटून पडायचं, पण जिथे आपले योगदान देण्याचा विषय येतो, तेव्हा ते काम शासकीय यंत्रणेचे म्हणून नामानिराळे व्हायचे, हीच रीत सध्या पाहायला मिळते. योजना शासनाची आहे ना? मग ती यशस्वी व्हावी, याची जबाबदारीही त्यांचीच ही मानसिकता आज चांगले उपक्रम मातीत घालत आहे. शासन जे काही करते, ते आपल्यासाठी याची पुरपूरे जाणीव ठेवून वागणारे आम्ही मात्र ते करताना त्यातही आपला सहभाग असावा, हा विचार जेव्हा करीत नाही, तेव्हा योजनांचा बट्ट्याबोळ होतो.

शासन योजना राबविते. कोट्यवधी रुपये खर्ची घालते. तो पैसा माझा नाही, हा विचार फोफावल्याने योजनांचे अपयश वाढले. पण हा पैसा आपण जे विविध कर भरतो, त्यातून खर्च होतो हे जेव्हा समजेल, तेव्हा आपणही योजनांच्या यशात स्वतःचे योगदान द्यावे, असा विचार नक्की येईल. आम्ही आमच्या खिशातून गेलेल्या एकेका पैशासाठी हळहळतो, तीच हळहळ योजनांच्या अपयशानंतर जेव्हा सामान्यांना वाटू लागेल, तेव्हा मात्र कोणत्याही योजना फसणार नाहीत. हे एवढ्यासाठीच कारण घनकचरा व्यवस्थापन, रोपवन या शासनाच्या लोकांच्याच हिताच्या योजना आज फसल्यागत आहेत. योजना अयशस्वी झाल्या, पैसा खर्च झाला म्हणून बोंबलणारे आम्ही या अपयशात आपले योगदान आहे की नाही, याचा विचार कधी करणार आहोत. गावाशेजारी जंगल या संकल्पनेतून सामाजिक न्याय विभाग आणि वन विभागाने रोपवनाची कल्पना पुढे आणली. पाच ते दहा एकरांमध्ये गावाच्या, शहराच्या शेजारी वन लावण्याचा खटाटोप झाला. यंत्रणेने आपले काम केले. झाडे लावली, कुंपण केले. भविष्यात तयार होणाऱ्या या वनांचा फायदाही लोकांनाच झाला असता, पण हे माझं काम नाही म्हणून दुर्लक्ष करण्याच्या वृत्तीमुळे रोपवनांची वाट लागली. रोपवनात गुरे चरण्यासाठी सोडली गेली. कुंपणाचे तार कापून विकले गेले आणि वनांची दुरवस्था झाली. लावलेली झाडे मोठी होण्याआधीच संपली आणि योजना फसली. आता यात दोष कुणाचा ते शोधायला हवे. यात कोट्यवधींचा निधी खर्च होतो आणि हाती काहीच लागत नाही, त्याचे काय? घनकचरा व्यवस्थापनाची अवस्थाही वेगळी नाही. ग्रामपंचायतींच्या माध्यमातून कचरा व्यवस्थापन करण्यासाठी टाके बांधले गेले. कचऱ्याचे वर्गीकरण, त्याची विल्हेवाट या विषयाचा गंध नसल्याने त्या टाक्यांमध्ये झाडे उगवली आणि हेतू असफल झाला. जिल्ह्यातील ५०० हून अधिक ग्रामपंचायतींमध्ये या टाक्यांमध्ये कचऱ्याचे व्यवस्थापन होण्याऐवजी निधीचे व्यवस्थापन झाले आणि चांगली योजना कचऱ्यात गेली. ही अवस्था केवळ जिल्ह्यात नव्हे, तर राज्यात सगळीकडेच असेल. पण आम्ही दोष यंत्रणेला देऊन मोकळे होतो. गावाशेजारी लावलेले वन जगावे, असे आम्हाला का वाटत नाही. आम्ही त्यासाठी काय योगदान देतो? याचा विचार कधी झाला आहे का? गावातील कचऱ्याची योग्य विल्हेवाट लागल्याने आमचे आणि गावाचे आरोग्य चांगले राहील, ही भावना मनात न आल्याने कचरा व्यवस्थापनाची अव्यवस्था झाली, याची जाणीव झाल्याशिवाय कधीच कोणत्या योजना यशस्वी होऊ शकत नाही. लोकांसाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांमध्ये जोपर्यंत लोकसहभागाचा भाव येत नाही, तोपर्यंत कल्याणकारी योजनांचे असेच ‘कल्याण’ होत राहणार आहे, हे नक्की! आज आम्हाला मानसिकता बदलावी लागणार आहे. केवळ यंत्रणांना दोष देत त्यांच्या माथी अपयशाचे खापर फोडून पराक्रम केल्याचा आव आणत बसण्यापेक्षा आपल्यासाठीच्या या योजना आपल्या सहभागातून पूर्ण व्हाव्यात असा भाव जोपर्यंत मनात येणार नाही, तोपर्यंत कितीही झाडे लावा, त्याचे ‘वन’ तयार होणार नाही किंवा कचऱ्याचे व्यवस्थापन होऊ शकणार नाही, हे तेवढेच खरे! ▮



९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# समर्थ रामदास स्वामींचे अमराठी वाङ्मय

**प्रा. दिलीप जोशी**

समर्थ रामदास स्वामींचा ‘दासबोध’ नावाचा मराठी ग्रंथ सर्वश्रुत असून रामदासी संप्रदायातील तो पंचम वेद आहे. समर्थांचे इतरही मराठी वाङ्मय बहुतेकांना माहीत आहेत. पण त्यांचे मराठी भाषेव्यतिरिक्त अमराठी वाङ्मय आहे, हे बहुतेकांना माहीत नाही. डोंबिवलीला मी व्याख्यानासाठी गेलो असता संघ स्वयंसेवक दीपक कुलकर्णी यांनी मला मनीषा बाठे यांचे समर्थ रामदास कृत अमराठी पदावल्यांचे पुस्तक भेट दिले. ते वाचल्यावर लक्षात आले की, समर्थांच्या अमराठी पदावल्या खूपच प्रेरक, सकारात्मक, परिवर्तक आणि राष्ट्रहितैषी आहेत. राष्ट्रप्रेरक आणि अध्यात्म विज्ञान असलेले अमराठी वाङ्मय बहुतेकांना माहीत नाही. त्याबाबत थोडी माहिती घेऊ.

समर्थांनी रचलेली पदे विविध भाषांत उपलब्ध आहेत. ढोबळमानाने समर्थांनी रचलेले वाङ्मय दखनी भाषा प्रभावित आहे. ज्या भाषेवर मराठीसह गुजराथी, पंजाबी, कानडी, तेलगू, राजस्थानी, संस्कृत, फारशी, अरबी आणि उर्दू यासह एकूण १८ बोलीभाषांचा प्रभाव असलेली भाषा म्हणजे दखनी भाषा होय. काहींच्या मते व्रज, अवधी, बुंदेली, भोजपुरी, मैथिली, मालवी, पहाडी, मारवाडी, गौडी, हैदराबादी अशा बोलीभाषांच्या शब्दांचा यादृच्छिक वापर असलेली भाषा म्हणजे दखनी भाषा. दक्खन प्रांताची भाषा म्हणूनही दखनी भाषा ज्यात फारसी, अरबी, उर्दू शब्दांचा अग्रक्रमाने प्रभाव आहे. ही भाषा कच्छ ते कर्नाटक या भूप्रदेशात मुख्यतः वापरली गेली. समर्थांचे अमराठी वाङ्मय भारतातील बहुतेक सर्व भाषांचे संमिश्रण असलेल्या भाषाशैलीत उपलब्ध आहे.

समर्थांचा कालावधी इ. स. १६०८ ते इ. स. १६८१ असा एकूण ७४ वर्षांचा आहे. त्यातील बालपण आणि तपश्चर्या कालावधी इ. स. १९३१ म्हणजे वयाच्या २४ वर्षांपर्यंत आहे. त्यानंतर देशातील सुलतानी संकटाने समर्थ अस्वस्थ झाले आणि त्यांनी मराठी युवकांमध्ये जागोजागी मारुती मंदिरे, आखाडे याद्वारे बलोपासनेने स्फुलिंग जागरणाचा प्रयत्न सुरू केलेलाच होता. तो प्रयत्न संपूर्ण हिंदुस्थानात करावा म्हणून ते इ. स. १६३२ साली पर्यटनाला निघाले. हा महाराष्ट्राबाहेरील त्यांचा प्रवास इ. स. १६३२ ते इ. स. १६४४ पर्यंत होता. इ. स. १६४५ ला ते पुन्हा महाराष्ट्रात आले. म्हणजे त्यांनी वयाची २५ ते ३८ अशी १२ वर्षे देशाटन केले. त्या त्या प्रदेशात तरुणाई एकत्र करून समर्थांनी ऊर्जा जागरण केले. अभंग, अष्टके, श्लोक यातून राष्ट्रजागृती आणि आखाडे स्थापून बलोपासना शिकविली. या माध्यमातून देव, देश आणि धर्मजागरण केले.

पर्यटन कालावधीत समर्थ अयोध्या, काशी, पंजाबात आनंदपूर ते अफगाणिस्तानपर्यंत गेले. आनंदपुरात ते शीख धर्मगुरू हरगोविंदजी यांनाही भेटल्याचा उल्लेख आहे. तेथून ते दक्षिण भारतात गोकर्ण क्षेत्र, श्रवणबेळगोल, म्हैसूर, श्रीरंगपट्टणम्, बंगळुरू, मद्रास, तंजावर, हैदराबाद ते थेट श्रीलंकेपर्यंत विविध ठिकाणी गेले. त्या काळातील उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, बंगाल, गुजराथ, आंध्र, गोवा, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, महाराष्ट्र, पंजाब अशा विविध राज्यांत जाऊन एकूण ४७ मठपती आणि त्यांच्या अखत्यारीत असलेले ११०० मठांची स्थापना केली. त्या मठांची यादी उपलब्ध आहे. त्यातील महाराष्ट्राबाहेरील १८ आणि महाराष्ट्रातील ९२ असे एकूण ११० मठ आजही अस्तित्वात आहेत. देशभर पर्यटन करून त्या त्या प्रदेशातील बोलीभाषा वापरून सर्वांना समजेल अशा भाषेतून श्रीरामनाम माहात्म्य, भवसागर पार करण्यासाठीची तत्त्वे, आदर्श आचारविचार, राष्ट्राप्रतीची कर्तव्ये आपल्या वाङ्मयातून समर्थांनी मांडली. समर्थांच्या अमराठी वाङ्मयाच्या काही पदावल्यांतून आपल्या हे लक्षात येईल. संपूर्ण पदावली घेणे शक्य नसले, तरी त्यातील काही पदभाग पाहिल्यावर त्यातील अध्यात्म विज्ञान आपल्या लक्षात येईल.

रामदास कहे एक रामबिन। कोन पार उतारे॥
ऐसी जानी के सुचित रही। रोसन करी ये दुनिया रे॥

यात समर्थ सांगतात, हा तुझा भवसागर एका श्रीराम भगवंताशिवाय कोणीही पार करणार नाही. ही बाब चित्तात पक्की धारण कर आणि ते लक्षात ठेवून तुझे हे विश्व देदीप्यमान कर!

अजून एक श्लोक पाहू.

मोहन तन मन ले गयो री। भली न सूचे बुरी न सुचे।
मैं तो भया बाउरो॥ अंतरज्यामी अंतर ज्याने।
रामदास देखत मोहन री॥

या मोहनाने तनमन हरविले. चांगलेही आणि वाईटही सुचत नाही. तो अंतर्यामी माझे अंतरंग जाणतो म्हणूनच हा रामदास त्या मोहनकृष्णाला पाहू शकतो. मारवाडी, गुजराथी मिश्रित असलेली ही पदावली आहे.

समर्थांना विनाकारण पिंजऱ्यात उभे करणाऱ्यांनी चौफेर साहित्य वाचल्यास त्यांच्या सकारात्मक कार्याचा परिचय होण्यास मदत होईल असे वाटते. समर्थांनी भगवान श्रीकृष्ण वर्णन व्रज भाषेत, संपूर्ण रामायण विशेषतः जनजागरणासाठी युद्धकांड अवधी आणि भोजपुरीतून, नवनाथ कथा खडीबोली भाषेतून, भगवान महादेव चरित्र पहाडी भाषेतून, स्फुट रचना उर्दू, अरबी, फारशी शब्द प्रभाव असलेल्या भाषेत रचलेले आहेत. समर्थांनी श्रीराम कार्य आणि देशकार्य यांची गुंफण घालत राष्ट्रजागरण केले.

आग्र्याहून सुटल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांना सुखरूप पोहोचण्यासाठी विविध ठिकाणी असलेल्या समर्थांच्या अमराठी मठांचे सहकार्य झाल्याचे काहींचे मत आहे. मोगली सत्ता नष्ट होऊन संपूर्ण हिंदुस्थानात हिंदवी स्वराज्य शीघ्रातिशीघ्र स्थापन व्हावे, ही त्यांची आंतरिक इच्छा असल्याचे त्यांच्या साहित्यातून लक्षात येते. शिव छत्रपतींचे स्वराज्य शीघ्र वाढावे यासाठी समर्थांनी तुळजाभवानीला मागितलेले मागणे सारे काही स्पष्ट करते.

‘मागणे एकची आता, द्यावे ते मजकारणे।
तुझा तू वाढवी राजा, शीघ्र आम्हाची देखतां!
मर्द संहारिले मागे, ऐसे उदंड एकतो।
परंतु आता काही, रोकडे मुळ सामर्थ्य दाखवी।
दास म्हणे माझे, सर्व आतुर बोलणे।
क्षमावे तुळजा माते, इच्छा ते पूर्णची करी॥’

थोडक्यात समर्थांचे मराठी आणि अमराठी वाङ्मय ‘ततो राष्ट्रम् बलमोजश्च जातम्’ म्हणजे हे राष्ट्र बलसंपन्न होऊन परम् वैभवाला जावे, हे त्यांचे स्वप्न होते. त्यांचे साहित्य हिंदुस्थान मोगली सुलतानी संकटातून सुटून आसेतुहिमाचल रामराज्य आणि शिवराज्य व्हावे यासाठीची प्रेरणा देणारे आहे. समर्थांचे अमराठी वाङ्मय वाचण्याची इच्छा सर्वांना व्हावी हा या लेखाचा प्रांजळ हेतू. तस्मात् असा प्रयत्न अभ्यासकांनी करावा, ही विनंती! ▮

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### वाहनाचा वेग आवरायला हवा

आजच्या धावपळीच्या युगात वाहनावरील वेगावर नियंत्रण ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. वेगावर योग्य नियंत्रण असणे आपली सुरक्षितता वाढवते, अपघातांची शक्यता कमी करते आणि इतर प्रवाशांची तसेच पादचाऱ्यांची सुरक्षा सुनिश्चित करते. वेगमर्यादा पाळणे, वाहतूक नियमांचे पालन करणे आणि सावधगिरीने वाहन चालवणे या गोष्टींचे पालन करणे आवश्यक आहे. यामुळे आपली आणि इतरांची सुरक्षितता राखली जाते आणि रस्त्यावरील जीवन अधिक सुरक्षित होते.

आजकाल अनेकांना घाई असते, पण त्यामुळे वाहन चालवताना वेग वाढवणे हा उपाय नाही. जास्त वेगात वाहन चालवल्याने अपघातांचे प्रमाण वाढते. रस्त्यावर फक्त आपण नसतो. पादचारी, सायकलस्वार, दुसरी वाहने सगळ्यांचे रक्षण ही आपलीही जबाबदारी असते. नियोजनबद्ध प्रवास करा. वेळेआधी निघा. वेगमर्यादेचे पालन करा. जीवन सुंदर आहे, ते जपायलाच हवं. वाहन चालवताना सावधगिरीबरोबरच नियमांचे पालन करणे आणि इतरांची काळजी घेणे आवश्यक आहे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### विद्यार्थ्यांनी उन्हाळी सुट्यांचा सदुपयोग करावा

उन्हाळी सुट्या म्हणजे केवळ विश्रांती नाही, तर स्वतःचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याची सुवर्णसंधीसुद्धा होय. वर्षभर अभ्यास, परीक्षा आणि शालेय उपक्रमांमुळे व्यस्त असलेल्या विद्यार्थ्यांना या सुट्यांमध्ये आपल्या आवडीनिवडी जोपासण्यास, नवीन कौशल्ये आत्मसात करण्यास आणि आत्मपरीक्षण करण्यास वेळ मिळतो. मोबाईल स्क्रीनचा वेळ कमीत कमी करून उन्हाळी सुट्यांचा सदुपयोग विद्यार्थी पुढील मार्गाने करू शकतात. वाचनाची सवय लावणे : चांगली पुस्तके वाचल्याने ज्ञान वाढते, विचारसरणी प्रगल्भ होते आणि कल्पनाशक्तीला चालना मिळते. नवीन कौशल्ये शिकणे : संगीत, चित्रकला, नृत्य, पाककला, संगणक वापर किंवा एखादी नवीन भाषा शिकणे हे सर्व कौशल्ये भविष्यात उपयोगी ठरतात. शारीरिक व्यायाम व खेळ : आरोग्य टिकवण्यासाठी दररोज थोडा वेळ मैदानी खेळ किंवा योगासाठी द्यावा. स्वयंशिस्त व जबाबदारी : घरच्या छोट्या छोट्या जबाबदाऱ्या पार पाडत संयम, स्वावलंबन व कुटुंबीयांसोबतचे नाते दृढ करता येते. समाजोपयोगी कार्यात सहभाग : वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, वाचनालयात मदत यासारख्या कार्यांमुळे सामाजिक भान विकसित होते.

उन्हाळी सुटी ही आळस करण्याची वेळ नसून स्वतःला घडवण्याची, नवीन गोष्टी शिकण्याची आणि आयुष्य समजून घेण्याची संधी आहे. योग्य नियोजन आणि सकारात्मक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांनी या सुट्यांचा सदुपयोग केला पाहिजे.

**सुमेघ रामचंद्र वानरे**/९१३००२१३८७

### मन:शांतीसाठी प्रार्थना

प्रार्थना म्हणजे परमेश्वराची कळकळीची विनवणी किंवा आळवणी होय. प्रार्थना या शब्दातील ‘प्र’ म्हणजे प्रकर्ष तर अर्थ म्हणजे याचना करणे. प्रार्थना म्हणजे स्तुतिवजा याचना होय. हिंदू धर्मात प्रत्येक देवासाठी आरती आहे. ती एक प्रकारची त्या देवाची स्तुती आहे. प्रार्थना म्हणजे ईश्वराशी संवाद. यामुळे ईश्वर आणि मनुष्य यांच्यातील निकट संबंध स्पष्ट होतो. आपल्या धर्मग्रंथांनी, संतांनी प्रार्थनेवर जोर दिला आहे. प्रार्थनेच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. प्रार्थनेत परमेश्वराची स्तुती, गुणगाण, कृतज्ञता, मदतीची अपेक्षा, कर्तेपणा, देवाला देण्याची इच्छा, मार्गदर्शनाची अपेक्षा, दुसऱ्यांच्या हिताचे चिंतन आधी समाविष्ट असते. प्रार्थना एकट्याने किंवा सामूहिक करता येते. कोणतेही साधन नसताना प्रार्थना करता येते. प्रार्थनेत भक्त ईश्वरासमोर आपली सगळी स्थिती स्पष्ट करतो. प्रार्थनेत जितका खरेपणा, तन्मयता, समर्पणाची भावना असेल तेवढी ती तत्परतेने ईश्वरापर्यंत पोहोचते. प्रार्थना सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत प्रत्येक कृतीसाठी करू शकतो. विद्यार्थ्यांनी अभ्यासाला बसण्यापूर्वी प्रार्थना करावी. प्रार्थनेने आत्मविश्वास वाढतो आणि कर्तेपण देवाला दिल्यामुळे अहं कमी होतो. आपल्या संस्कृतीत वसुधैव कुटुंबकम म्हणजे हे विश्वच माझं कुटुंब ही भावना, हा विचार आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदान रचले. ती विश्वाच्या कल्याणासाठी ईश्वराजवळ केलेली प्रार्थना आहे, याचना आहे. सार्वजनिक प्रार्थनेतून बंधुभाव, राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम विकसित होतं.

**माधवी पत्की**/नागपूर

### मनपाची युद्धपातळीवर नद्या स्वच्छता

मनपाकडून दरवर्षी पावसाळा सुरू होण्यापूर्वी किंवा त्याच्या तोंडावर नदी व नाल्यांची स्वच्छता केली जाते. या सफाई अंतर्गत नाग, पोहरा आणि पिवळी या नद्यांच्या सफाईचे अभियान सुरू झाले. युद्धपातळीवर (?) सुरू झालेल्या या नद्या सफाई अभियानाची आकडेवारीही देण्यात आली आहे ती अशी- ३९.०४ कि. मी. सफाई, ३० हजार क्यूबिक मीटर गाळ उपसला मनपा आयुक्त व प्रशासक डॉ. अभिजित चौधरी यांच्या निर्देशानुसार नदी स्वच्छता अभियान सुरू करण्यात आले. दरवर्षी नद्या, नाले सफाईचे काम केले जाते. दोन वर्षांपूर्वी २२ सप्टेंबरला नागपूरकरांनी जलशिवार योजनेचा अनुभव घेतला. अभियानांतर्गत तुम्ही सफाई करत पाण्याच्या प्रवाहाने वाहून आलेला कचरा नाल्यांच्या कडेलाच काढून ठेवला आणि परत पुढच्या वर्षीचे अभियान येतपर्यंत तो त्या पात्राच्या कडेनेच साचलेला असतो. त्यातला बराच पाण्याच्या प्रवाहात वाहून जातो. मग कसली सफाई न कसले काय? ▮

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# अवकाळी पावसाने केली महापालिकेची पोलखोल

## महत्वाचे...



### शिवसेना शहरप्रमुख संपर्क कार्यालयाला मोरे यांची भेट

**सोलापूर, दि. २७ मे ..**

शिवसेना शहरप्रमुख सचिन चव्हाण यांच्या संपर्क कार्यालयाला शिवसेनेचे सचिव संजय मोरे यानी भेट देऊन मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा प्रमुख अमोल बापू शिंदे, माजी जिल्हा परीषद सदस्य अमर पाटील, शिवसेना प्रवक्त्या ज्योती वाघमारे, समन्वय अनिता माळगे, जिल्हा उपप्रमुख आणप्पा सतुबर, मिथुन राठोड यांच्यासह शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सचिन चव्हाण यांच्या हस्ते मोरे यांचा सत्कार करण्यात आला.

### प्रमाणित बियाणे वितरणाकरीता महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करा

**सोलापूर दि.२७ मे-**

राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया या नवीन अभियानांतर्गत सोयाबीन, करडई, सुर्यफुल या पिकांसाठी सोलापूर जिल्ह्याची निवड करण्यात आलेली आहे. या कार्यक्रमांतर्गत खरीप हंगामामध्ये सोयाबिन व सुर्यफुल पिकाचे प्रमाणित बियाणे तसेच रब्बी हंगामा करीता करडई पिकाचे प्रमाणित बियाणे १०० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना वितरीत करण्यात येणार आहे. यामध्ये ०.२० हेक्टर ते जास्तीत जास्त १ हेक्टर मर्यादेत बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या करीता लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या ऑनलाईन अर्जातून ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहे. .तरी जिल्ह्यातील सर्वसाधारण, अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती प्रवर्गातील सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की, वरील घटकाचा लाभ घेण्यासाठी अधिकाधिक लाभार्थीनी महाडीबीटी पोर्टलवर https://mahadbtmahait.gov.in farmer या संकेतस्थळावर अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.



## मान्सूनपूर्व कामाकडे दुर्लक्ष ; शहरातील रस्त्यांची लागली वाट

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.२७ मे-**

मान्सून अगदी काही दिवसांवर येऊन ठेपला असताना सोलापूर शहरातील अनेक भागांमध्ये मान्सूनपूर्व कामे अपुरी राहिल्याने यंदाच्या ऐन पावसाळ्यात सोलापूरकरांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे. शहरातील नाले सफाई, रस्त्यांची दुरुस्ती आणि ड्रेनेजची कामे अजूनही रखडल्याने नागरिकांना पावसाळ्यात खड्ड्यांमुळे मोठ मोठे धक्के सहन करावी लागणार आहेत.

अनेक भागांतील रस्त्यांची दुरावस्था कायम आहे. खड्डे बुजवले गेलेले नाहीत आणि काही ठिकाणी रस्त्यांच्या कडेला मातीचा ढिगारा साचलेला आहे. यामुळे पावसाळ्यात वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन अपघातांची शक्यता वाढली आहे. शहरातील काही प्रमुख मार्ग सोडले की अनेक रस्त्यावर सध्या खड्डे पडले आहेत. पावसाळ्यापूर्वी हे खड्डे बुजविले पाहिजेत. मान्सूनपूर्व कामे लवकर पूर्ण करण्याचे आदेश सर्व विभागांना दिले होते. परंतु, याचा त्यांच्यावर कोणताही परिणाम झाल्याचे दिसत नाही. रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याच्या कामाकडे केलेल्या दुर्लक्षामुळे अवकाळी पावसात खराब रस्त्यांची आणखी वाताहात झाली आहे.पोलीस मुख्यालय समोर मोठमोठे खड्डे पडले आहेत. येथे मोठ्या प्रमाणात पाणी साचते.

पावसाचे पाणी योग्य पद्धतीने निचरा होत नाही. त्यामुळे नागरिकांच्या घरात पाणी शिरते. दरवर्षी येथे ही समस्या कायम असते. मात्र याकडे प्रशासनाचे हेतू पुरस्कार दुर्लक्ष होताना दिसत आहे. गुरुनानक चौक ते कुमठा नाका या दरम्यानचा सततच्या पावसात रस्ता अक्षरशः धुवून गेला आहे. येथील खड्डे बुजवावेत, अशी मागणी नागरिकांनी केली होती. त्याकडे महापालिका अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे. पावसाळ्यात रस्त्यांवर खड्डे पडले की प्रिमिक्स टाकून त्याची दुरुस्ती करता येत नाही. त्यामुळे माती टाकून लोकांच्या तक्रारीची दखल घेतल्याचा दिखावा केला जातो. त्यामुळे समस्या कमी होण्याऐवजी त्याचा लोकांना अधिकच त्रास होतो. त्यामुळे मान्सूनचा पाऊस सुरू होण्याच्या अगोदर महापालिकेने शहरातील रस्त्यांवर पडलेले खड्डे दुरुस्त करण्याची मागणी होत आहे.



### अनेक नाल्यांमध्ये अजूनही मोठ्या प्रमाणावर गाळ साचलेला

शहरातून वाहणाऱ्या अनेक नाल्यांमध्ये अजूनही मोठ्या प्रमाणावर गाळ साचलेला आहे. ही नालेसफाईची कामे वेळेत पूर्ण न झाल्यास पावसाचे पाणी तुंबून सखल भागांमध्ये पाणी शिरण्याची शक्यता आहे. यामुळे रोगराई पसरण्याचा धोकाही वाढणार आहे. शहरात झालेल्या व होत असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी नाल्याचे पाणी बाहेर पडल्याच्या तक्रारी आहेत. अवंतीनगर भागातील हांडे प्लॉटमधील अनेकांच्या घरात पावसाचे पाणी शिरल्याने प्रापंचिक साहित्याचे नुकसान झाले. नाल्यात जाणाऱ्या पाण्याचे मार्ग अनेक ठिकाणी बंद झाल्याने पावसाचे पाणी दुसऱ्या दिवसापर्यंत रस्त्यावर साचले होते. मार्गात माती साचल्याने पाणी रस्त्यावर पसरल्याचे दिसून आले. ही कामे लवकर करण्याची मागणी आहे.

### प्रशासनाची भूमिका काय?

रस्त्यांवरील खड्यांच्या या गंभीर परिस्थितीकडे म हानगरपालिकेने तातडीने लक्ष देण्याची मागणी जोर धरत आहे. अपुऱ्या कामांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर प्रशासनाने त्वरित उपाययोजना न केल्यास यंदाचा पावसाळा सोलापूरकरांसाठी एक मोठी डोकेदुखी ठरू शकतो. प्रशासन यावर काय भूमिका घेते आणि उर्वरित कामे किती लवकर पूर्ण होतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### काही ठिकाणी ड्रेनेजची कामे अजूनही अपूर्ण

काही ठिकाणी ड्रेनेजची कामे अजूनही अपूर्ण आहेत, यामुळे सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित होणार नाही आणि दुर्गंधी तसेच डासांचा प्रादुर्भाव वाढू शकतो. ड्रेनेजसाठी खोदलेले रस्ते दुरुस्त न केल्याने पावसाळ्यात नागरिकांना त्रास होणार आहे. या अपुऱ्या काम ांमुळे सोलापूरकरांमधून संताप व्यक्त होत आहे. दरवषी मान्सूनपूर्वी ही कामे पूर्ण करण्याचे आश्वासन दिले जाते, परंतु प्रत्यक्षात ती वेळेत पूर्ण होत नाहीत, अशी नागरिकांची तक्रार आहे.

# अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरळीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. २७ मे-**

सुरवातीला तांत्रिक अडचणींमुळे खोळंबलेली इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रीया, नवीन वेळापत्रकानुसार सोमवार २६ मे पासून सुरु झाली. सकाळपासून कनिष्ठ महाविद्यालयांसह, नेट कॅफेत अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांची वर्दळ दिसून आली. यंदापासून राज्यभरात सर्व ठिकाणी अकरावीची प्रवेश प्रक्रिया केंद्रिय पद्धतीने राबवण्यात येत आहे. सुरुवातीला शिक्षण संस्थांची नोंदणी प्रक्रिया करण्यात आली. प्रत्यक्ष नोंदणी २२ मे पासून सुरु होणार होती. पण, त्या पहिल्याच दिवशी संकेतस्थळावर अडचणी निर्माण झाल्या. वेबसाईट डाऊन झाल्याने विद्यार्थी पालकांना नोंदणीच करता आली नाही नव्हती. त्यामुळे राज्य शिक्षण संचालनालयाने सोमवार २६ मे पासून प्रत्यक्ष अर्ज प्रक्रियेला सुरुवात होणार असल्याचे जाहीर केले होते.

२६ मे ते ३ जून अर्ज नोंदणी करण्याबरोबरच एक ते दहा महाविद्यालयांचा पसंती क्रम देता येईल. प्रत्येक फेरीपूर्वी विद्यार्थ्यांनी संमती नोंदवणे आवश्यक आहे. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना गुणपत्रकांचे वितरण सोमवार पासून शाळांमधून सुरु झाले. जिल्ह्यातील काही महाविद्यालयात वेगाने तर काही ठिकाणी संथगतीने विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी झाली आहे. मात्र, या नोंदणीची माहिती - माध्यमिक शिक्षण विभागाकडे उपलब्ध नसल्याने किती विद्यार्थ्यांनी अकरावी प्रवेशासाठी नोंदणी केली. याची माहिती मिळाली नाही. दहावीच्या परीक्षेचा निकाल लागल्यानंतर अकरावी प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. त्यामुळे ऑनलाईन प्रवेशप्रक्रियेकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागून राहीले आहे.

### अद्यापर्यंत तांत्रिक अडचणी नाहीत

नवीन वेळापत्रकानुसार सोमवारपासून इयत्ता अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया सुरु झाली. अध्यापर्यंत शहर व जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालय, विद्यार्थ्यांचा तांत्रिक अडचणींबाबत एकही फोन आलेला नाही. प्रवेश प्रक्रीया सुरळीत सुरु असल्याची माहिती शिक्षण विभागाकडे आलेली आहे.

**- सचिन जगताप, माध्यमिक शिक्षणाधिकारी, जि.प.**

REQUIRED
4 - Civil Engineer
is Required who has must 5 years of experience for railways bridge & civil works.he will have to work outside in Solapur.
Salary + PF fixed as per caliber.
Mob: 9881942790 / 7385702848

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**NOTICE INVITING TENDER CPD/49 -2025-26**

Tenders are invited through e-Tendering in SRM Two Bid system from the registered vendors for Supply of following:

| Tender No. & Description of Material | Estimated Amount (in Rs. in Lakh) / Tender Fee (in Rs.) | Due Date & Time (Hrs.) Submission & Opening of Tender |
|---|---|---|
| **SP/T-12/0525_TKC1 [7th Call] (RFX.No. 700036492)** for Augmentation of substation by providing additional 50MVA, 132/33kV Power Transformer along with HV & LV bays with 33kV Bus extension at 132kV Mohol S/S under EHV O&M Dn. Solapur under Pune Zone (Transformer will be supplied by MSETCL) | 206.88<br>5,000.00 | 03.06.2025 16:00<br>03.06.2025 16:05 |

Contact Person: Office of the Executive Engineer (Gr-P&C) Tel. No. 022-69852720/022-69852717
Cell.No. 09619469933
Email:1) C.E. (CPA) 2) E.E. (Group-TKC1), CPA, C.O. MSETCL, 1st Floor, Prakashgad Building, Bandra (E), Mumbai Email id: cecpa@mahatransco.in, eetkc1@mahatransco.in,
For further details visit our website http://www.srmetender.mahatransco.in
Any further amendments will be published on the MSETCL website www.mahatransco.in. So bidders are requested to check the website.

**Sd/-**
**Executive Engineer (P&C)**

## दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि; पंढरपूर

### नोटीस

आमचे बँकेचे मयत सभासद, ठेवीदार व कर्जदार दगडू केरबा जाधव राहणार पंढरपूर यांचे नावावर सेव्हिंग खाते असून सदर खात्याला वारस हक्काने नांव दाखल करणेबद्दल मयताचे वारसा पैकी त्यांचा अर्जदार - लक्ष्मी दगडु जाधव - पत्नी यांनी बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. या विनंती अर्जाप्रमाणे अर्जदाराचे नांव वारस हक्काने दाखल करणेस अन्य वारसांनी लेखी संमत्या दिलेल्या आहेत. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले. व्यतिरिक्त अन्य कोणी वारस हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द केले तारखेपासून सात दिवसाचे आत बँकेकडे लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी नाहीत असे समजून मयताचे नावावरील वर नमुद केलेल्या सेव्हिंग खाते खात्यास

अर्जदार लक्ष्मी दगडु जाधव यांचे नांव वारसहक्काने दाखल करणेत येईल. मागाहून कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. कळावे !

पंढरपूर
तारीख - २६/०५/२०२५

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**दि पंढरपूर अर्बन को-ऑप बँक लि. पंढरपूर**

### सभा नोटीस

बोंडले विविध कार्यकारी विकास सेवा, सहकारी संस्था मर्या, बोंडले ता. माळशिरस जि. सोलापूर या संस्थेच्या संचालक मंडळींची सभा बुधवार दि. ४/६/२०२५ रोजी दुपारी ठिक ५ वा. संस्थेच्या कार्यालयात बंडगर बी. एस. मुख्य लिपिक यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केलेली आहे. तरी सर्व संचालकांनी या सभेस वेळेवर उपस्थित रहावे.

**-: सभेपुढील विषय :-**

१) सर्वसाधारण प्रवर्ग मतदार संघातील रिक्त भरणेबाबत.

**सही/-**
**सचिव**
बोंडले वि.का.व.सेवा सह. संस्था. मर्या,
बोंडले, ता. माळशिरस, जि. सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ४/२०२५
नि.नं. ५

### बार्शी येथील मा. अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात

**चि. रुतेश उर्फ रितेश राजेश घळके,**
वय- १६ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. कव्हे, ता. बार्शी
अ.पा.क. आई सौ. रोहिणी राजेश घळके -- अर्जदार
वय- ३७ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**विरूध्द**

**महाराष्ट्र शासन** -- सा.वाला

**अर्ज - गार्डीयनशिप ॲक्ट १९५६ व कलम २९**
**गाडर्डीयन्स ॲण्ड वॉर्डस ॲक्ट प्रमाणे**

ज्या अर्थी, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी मौजे कव्हे हद्दीतील मिळकत गट नं. ५६४ यापैकी पूर्व बाजूची जमीन क्षेत्र ०० हे. ८० आर, आकार ०१ रु. २४ पैसे तसेच गट नं. ५६४ यापैकी पश्चिम बाजूची जमीन क्षेत्र ०० हे. ७६ आर, आकार ०१ रु. १७ पैसे येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक जमीन आतील झाड झुडूप, दगडमाती वगैरे सर्व तदंगभूत वस्तुहक्कासह संपूर्ण जमीन. येणेप्रमाणे जमीनी या अज्ञान अर्जदार मालकी व कब्जेवहिवाटीच्या असून रेकॉर्डला मालकी हक्कात नोंद आहे. यातील अर्जदार अज्ञान असून त्यांचे तर्फे अ.पा.क म्हणून आई सौ. रोहिणी राजेश घळके यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. अज्ञान अर्जदार याचे पुढील उच्च शिक्षणासाठी व घरगुती अडचणी, कपडालत्ता, औषधपाणी यासाठी अज्ञानाचे पालन करणार आई सौ. रोहिणी राजेश घळके करणार आहे. अज्ञान अर्जदार हा अत्यंत हुशार असून त्याची पुढे उच्च शिक्षण घेण्याची इच्छा आहे व त्याचे शैक्षणिक भवितव्य उज्वल होण्यासाठी रक्कमेची अत्यंत गरज असल्यामुळे वर नमूद केल्याप्रमाणे मिळकत विक्री करणे जरूरीचे झाले आहे, अशा परीस्थितीत गट नं. ५६४ यापैकी पूर्व बाजूची जमीन क्षेत्र ०० हे. ८० आर, आकार ०१ रु. २४ पैसे ही जमीन खंडू भिमराव खाडे यांना व गट नं. ५६४ यापैकी पश्चिम बाजूची जमीन क्षेत्र ०० हे. ७६ आर, आकार ०१ रु. १७ पैसे ही जमीन राहुल रावसाहेब शिंदे यांना अगर ते सांगतील त्या व्यक्तीचे नांवे विक्री करणेस मे. कोर्टाची परवानगी मिळणे जरूरीचे आहे त्यासाठी या मे. कोर्टाची परवानगी मिळणेसाठी वरील नंबरने अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी, वरील मिळकतीचे अर्जदाराचे मालकी हक्काबाबत अगर विक्री हस्तांतरण करणेचे व्यवहारास कोणाची काहीही हरकत अडथळा असल्यास त्यांनी सदर प्रसिध्दीकरणापासून ३० दिवसाचे आत किंवा पुढील नेमली ता. १६/६/२०२५ रोजी सदर अर्जाचे कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वाजता स्वतः अगर त्यांचे तर्फे मुखत्यार, वकील यांनी हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. मुदतीत कोणाची हरकत अडथळा न आल्यास कोणाचे काहीही म्हणणे नाही असे समजून अर्जाप्रमाणे अर्जदाराची मागणी मंजूर करणेत येईल. कळावे हे प्रसिध्दीकरण दिले. ता. २६/५/२०२५

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. अप्पर जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**

## जाहीर समन्स

**मा. उपनिबंधक सहकारी संस्था, शहर सोलापूर, सोलापूर यांचे समोर**
सोलापूर जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी पतसंस्था, नियमित सोलापूर
सिटी सर्व्हे नं. ८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर, ४१३००३

**आर्यनंदी नागरी सहकारी पतसंस्था, मार्यादित, सोलापूर** - **अर्जदार**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - **जाब देणार**

| अ. क्र. | दावा क्रमांक | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ५२०/२०२५ | १३,४८,२९९/- | २ | **श्री. व्यवहारे अनंत भानुदास** रा. ३९ गडदर्शन दमाणी नगर, सोलापूर, जि. सोलापूर |
| २ | ५२९/२०२५ | २८,३०,०८८/- | १<br>२ | **श्री. शेळके शहाजी संभाजी** रा. ११४ सिध्देश्वर पेठ, स्टेट बँकेच्यावर सोलापूर, जि. सोलापूर<br>**श्री. शिंदे प्रदीप अंगद** रा. सी १५ बॉम्बे पार्क जुळे सोलापूर, जि. सोलापूर |
| ३ | ५२५/२०२५ | १९,२२,२४८/- | ३ | **श्री. भिमदे राजेंद्र रेवणसिध्द** रा. भिमदे वस्ती, एसआरपी कॅम्प सोरेगाव नगर, सोलापूर, जि. सोलापूर |
| ४ | ५२४/२०२५ | ७,४९,७८८/- | २<br>३ | **श्री. भोसले पांडुरंग रावसाहेब** रा. ६७ गुळवंची पो. कारंबा, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर<br>**श्री. भोसले संतोष उत्तम** रा. ६८ जगताप चाळ गुळवंची पो. कारंबा, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर |
| ५ | ५१७/२०२५ | १८,०१,९८८/- | ३<br>४ | **श्री. गवंडी विजयकुमार पांडुरंग** रा. ५८, भारतमाता नगर, मजरेवाडी, सोलापूर, जि. सोलापूर<br>**श्री. बिराजदार मारुती यशवंत** रा. आलहळ्ळी (अ) पिठाची गिरणी जवळ, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर |
| ६ | ५१३/२०२५ | ९,३३,२३३/- | ४ | **श्री. घाडगे सदाशिव नागनाथ** रा. संभाजी नगर, मोडनिंब गणपती मंदिरजवळ, ता. माढा. जि. सोलापूर |
| ७ | ५२६/२०२५ | ६,९२,०९७.४२/- | १<br>२ | **श्री. हेमन जगन्नाथ चितप्पा** सहकर्जदार वनस्कर शंकर यमनप्पा रा. ७, मार्कंडेय नगर, बालाजी मंदिरजवळ २४.३४२, जोडभावी पेठ, कुमठा नाका, सोलापूर<br>**श्री. लोंढे विजयकुमार विठ्ठलराव** रा. ८ पहिला मजला रोटे कॉम्प्लेक्स वाडीया हॉस्पिटल शेजारी |
| ८ | ५२८/२०२५ | ३०,२३,०६८/- | १<br>२ | **श्री. शिंदे प्रदीप अंगद** रा. सी.१५ बॉम्बे पार्क आयएमएस शाळेजवळ, जुळे सोलापूर<br>**श्री. नाईक प्रकाश अर्जुन** रा. एफ ६, अर्जुन टॉवर कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| ९ | ५३०/२०२५ | १७,६९,३८६/- | २<br>३ | **श्री. लोमटे अंबादास नरसिंग** रा. ३३३, न्यु सुनिल नगर, एमआयडीसी रोड महात्मा विद्यामंदीर शाळेच्या मागे सोलापूर सोलापूर, जि. सोलापूर<br>**श्री. धारा राकेश विजयकुमार** रा. २७ पी गवळी वस्ती एमआयडीसी रोड सोलापूर, जि. सोलापूर |
| १० | ५१९/२०२५ | ६२,५१,७८०/- | १<br>२<br>३ | **श्री. राठोड सतीश रेवणसिध्द** रा. २०.३९ वसंतराव नाईक नगर, जागृती विद्यामंदिर शाळेशेजारी विजापूर रोड, सोलापूर<br>**श्री. राठोड शांता रेवणसिध्द** रा. २०.३९ वसंतराव नाईक नगर, जागृती विद्यामंदिर शाळेशेजारी विजापूर रोड, सोलापूर<br>**श्री. राठोड सचिन रेवणसिध्द** रा. २०.३९ वसंतराव नाईक नगर, जागृती विद्यामंदिर शाळेशेजारी विजापूर रोड, सोलापूर |
| ११ | ५१८/२०२५ | २१,९५,९७४/- | २ | **श्री. बिराजदार अजित जेटप्पा** रा. बिराजदार वस्ती टाकळी विज, मु.पो. टाकळी, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे / पत्त्यावर आढळून येत नसल्याने / अपुरा पत्ता असलयाने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे.

**प्रतिवादी यांना जाहीर समन्साद्वारे कळविण्यात येते की, उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने अथवा वकिलामार्फत दिनांक १०/०६/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.

आज दि. २७/०५/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**स्थळ - सोलापूर**
**दि. २६/०५/२०२५**

शिक्का

**सही/-**
**(डॉ. पी.ए. बागल)**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर**

## जाहीर समन्स

**मा. उपनिबंधक सहकारी संस्था, परसेवा**
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि. सोलापूर
११३-अ, सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखे शेजारी, सोलापूर

**दि. पंढरपूर अर्बन को-ऑप, बँक लि. पंढरपूर** - **अर्जदार**
**४१३६ ब, प्रशासकीय भवन, नवी पेठ, पंढरपूर**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार / कर्जदार) - **जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार | जाब देणारेचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १६७६/२०२४-२५ | ५१,५३०/- | १<br>२<br>३<br>४ | **सविता संतोष ओव्हाळ** रा. सिध्दार्थ नगर, जुना कराड नाका, पंढरपूर<br>**सुरेखा शितल ओव्हाळ** रा. सिध्दार्थ नगर, जुना कराड नाका, पंढरपूर<br>**चांदणी नागेश ओव्हाळ** रा. सिध्दार्थ नगर, जुना कराड नाका, पंढरपूर<br>**सविता नंदकुमार देशपांडे** रा. वृंदावन नगर, जुना कराड नाका, पंढरपूर |
| २ | १६७७/२०२४-२५ | २६,१८९/- | २<br>३<br>४ | **शहनाज महमदहुसेन बागवान** रा. देवकते मळा, एमएसईबी पाठीमागे, पंढरपूर<br>**बिलकीस बशीर बागवान** रा. देवकते मळा, एमएसईबी, पाठीमागे, पंढरपूर<br>**करीश्मा बशीर बागवान** रा. देवकते मळा, एमएसईबी, पाठीमागे, पंढरपूर |
| ३ | १६७८/२०२४-२५ | २१,६९४/- | ३ | **सारीका शंकर वाघमारे** रा. शाळा नं.२, संत पेठ, महापूर चाळ, पंढरपूर |
| ४ | १६७९/२०२४-२५ | ४०,२४६/- | १<br>२<br>३<br>४<br>५ | **पवित्राबाई सयाप्पा गायकवाड** रा. खर्डी, ता. पंढरपूर<br>**शकीला पापामियाँ पठाण** रा. खर्डी, ता. पंढरपूर<br>**मुमताज राजमहमद मुलाणी** रा. खर्डी, ता. पंढरपूर<br>**मनोहर तुकाराम नरुटे** रा. खर्डी, ता. पंढरपूर<br>**शमा तैय्यब पठाण** रा. खडृी, ता. पंढरपूर |
| ५ | १६८०/२०२४-२५ | ३९,००६/- | १ | **सुनिता चंद्रकांत चव्हाण** रा. भाई-भाई चौक, पंढरपूर |
| ६ | १६८२/२०२४-२५ | २४,९९२/- | १<br>२<br>३<br>४ | **नेहा सुरींदर वाघमारे** रा. संतपेठ, महापूर चाळ, सांगोला रोड, पंढरपूर<br>**सुनिता रविकांत समाळ** रा. संतपेठ, महापूर चाळ, सांगोला रोड, पंढरपूर<br>**मालन अजिज शेख** रा. संतपेठ, महापूर चाळ, सांगोला रोड, पंढरपूर<br>**भावना अजय चव्हाण** रा. संतपेठ, महापूर चाळ, सांगोला रोड, पंढरपूर |
| ७ | १६८३/२०२४-२५ | ३२,६५०/- | १<br>३ | **संगिता अशोक पवार** रा. लक्ष्मी नगर, गजानन महाराज मठामागे, पंढरपूर<br>**लक्ष्मी मुरलीधर डावरे** रा. १६/अ, बडवे चर झोपडपट्टी, पंढरपूर |
| ८ | १६८४/२०२४-२५ | ३९,४५७/- | १<br>३ | **लक्ष्मी मुरलीधर डावरे** रा. संतपेठ, सर्व्हे नं. १६, बडवे चर झोपडपट्टी, पंढरपूर<br>**संगिता अशोक पवार** रा. लक्ष्मी नगर, गजानन महाराज मठामागे, पंढरपूर |
| ९ | १६८५/२०२४-२५ | ४१,२०४/- | १<br>४ | **फातिमा सुलेमान तांबोळी** रा. आंबेडकर नगर, पांढरा डोला, पंढरपूर<br>**रुबिना शब्बीर शेख** रा. सम्राट चौक, आंबेडकर नगर, पंढरपूर |
| १० | १६८६/२०२४-२५ | ४५,७२८/- | १<br>३<br>४ | **बेगम रशीद मुजावर** रा. आंबेडकर नगर, सम्राट चौक, पंढरपूर<br>**शकीलाबानो नियाज सव्वालाखे** रा. आंबेडकर नगर, सम्राट चौक, पंढरपूर<br>**रुबिना शब्बीर शेख** रा. आंबेडकर नगर, सम्राट चौक, पंढरपूर |
| ११ | १६८७/२०२४-२५ | ४०,०९३/- | १<br>२<br>३ | **अमिना कय्युम सव्वालाखे** रा. आंबेडकर नगर, सम्राट चौक, पंढरपूर<br>**गौरी फारुक शेख** रा. आंबेडकर नगर, सम्राट चौक, पंढरपूर<br>**रुबीना शब्बीर शेख** रा. आंबेडकर नगर, सम्राट चौक, पंढरपूर |
| १२ | १६८८/२०२४-२५ | २९,५३०/- | ३ | **मंजु प्रकाश जाधव** रा. ३६५४, भाई-भाई चौक, पंढरपूर |
| १३ | १६८९/२०२४-२५ | २६,१७०/- | २ | **सुनिता चंद्रकांत चव्हाण** रा. भाई-भाई चौक, पंढरपूर |
| १४ | १६९०/२०२४-२५ | १२,५०५/- | १<br>२<br>३<br>४ | **संपता जीवन माने** रा. जगदंबा नगर, टाकळी रोड, पंढरपूर<br>**रुपाली दिपक गाढवे** रा. जगदंबा नगर, टाकळी रोड, पंढरपूर<br>**शोभा संजय सुरवसे** रा. जगदंबा नगर, टाकळी रोड, पंढरपूर<br>**लता राजू वेताळ** रा. जगदंबा नगर, टाकळी रोड, पंढरपूर |
| १५ | १६९१/२०२४-२५ | ३२,६८०/- | १<br>२<br>३<br>४ | **हनिफा रज्जा शेख** रा. संतपेठ, महापूर चाळ, पंढरपूर<br>**प्रियांका दिपक वाघमारे** रा. संतपेठ, महापूर चाळ, पंढरपूर<br>**शब्बीर अल्लामिन बागवान** रा. कालिका देवी चौक, पंढरपूर<br>**प्रियांका प्रदीप रणदिवे** रा. संतपेठ, महापूर चाळ, पंढरपूर |
| १६ | १६९२/२०२४-२५ | १२,४९१/- | ४ | **रुबीना शब्बीर शेख** रा. आंबेडकर नगर, सम्राट चौक, पंढरपूर |

याकामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार - शुक्रवार, दिनांक १३/०६/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेत हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी देण्यात येईल व निर्णय घेण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. २७/०५/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**(उपनिबंधक)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स, असोसिएशन लि., सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

**भारत हे महान सुधारक, स्वातंत्र्यसैनिक, राज्यकर्ते आणि ऋषींचे घर आहे ज्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी आणि आपल्या भव्य राष्ट्राचे अत्याचार, शोषण आणि सांस्कृतिक अधोगतीपासून संरक्षण करण्यासाठी मोठे त्याग केले आहेत. या वीर शक्तींनी भारताचे अनेक आक्रमणांपासून तसेच अंतर्गत शत्रूंपासून रक्षण केले. त्यांनी इतर गोष्टींबरोबरच विध्वंसक वृत्तीचे उच्चाटन करून आणि वेगवेगळ्या व्यक्तींचे राष्ट्रीय चारित्र्य विकसित करून समाजाला जोडण्याचा प्रयत्न केला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर हे असेच एक बहुआयामी व्यक्तिमत्व होते ज्यांनी महान भारतासाठी अनेक आघाड्यांवर काम केले, एकतेला प्राधान्य दिले, वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगला आणि राष्ट्र प्रथम वृत्ती राखली.**

# वीर सावरकर : विज्ञान, वेद आणि डॉ. आंबेडकर यांच्याशी त्यांचे नाते

कम्युनिस्ट, राहुल गांधींसह अनेक राजकीय व्यक्तींचा अनेक महान स्वातंत्र्यसैनिक, संरक्षण दल आणि ऋषींनी देशासाठी केलेल्या समर्पणावर प्रश्नचिन्ह उभे करण्याचा इतिहास आहे. वीर सावरकर हे उच्च जातीचे असल्याने त्यांच्याबद्दल सतत खोटे विमर्श उभे करून लक्ष केले गेले. अशीच एक खोटी कहाणी अशी होती की त्यांनी केवळ उच्च जातीच्या हिंदूंसाठी काम केले.

**चला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी त्यांचे नाते जाणून घेऊया.**

डॉ. भीमराव आंबेडकर आणि स्वतंत्रवीर सावरकर हे दोघेही भारतीय समाजसुधारक होते ज्यांनी समाजातील असमानता आणि अन्यायाविरुद्धच्या लढाईत महत्त्वपूर्ण योगदान दिले. जरी त्यांचे विचार आणि दृष्टिकोन काहीसे वेगळे असले तरी, दोघांनीही सामाजिक परिवर्तनात महत्त्वपूर्ण योगदान दिले. सावरकरांच्या पुढाकाराने, २३ जानेवारी १९२४ रोजी हिंदू महासभेची स्थापना झाली आणि तीन ठराव पारित करण्यात आले, त्यापैकी एक अस्पृश्यतेला बेकायदेशीर ठरवण्याच्या प्रयत्नांना संबोधित करत होता. स्वतःच्या पुढाकाराने, सावरकरांनी रत्नागिरीमध्ये सामूहिक भजन, सामायिक जेवणाचे कार्यक्रम आणि मंदिर प्रवेश यासह अनेक कार्यक्रमांचे नियोजन केले, ज्यांचे उद्दिष्ट हे लोकचळवळ बनवणे होते.

**वीर सावरकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील तुलना**

स्वातंत्रवीर सावरकर

१. जातिव्यवस्थेविरुद्ध लढा

- सावरकरांनी जातिव्यवस्थेला विरोध केला आणि सर्व हिंदू समान आहेत ही कल्पना मांडली.
- त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध आवाज उठवला आणि मंदिर प्रवेश आंदोलने केली.
- साम्य: दोन्ही नेत्यांनी जातिव्यवस्थेचा विरोध केला आणि समाजातील असमानता दूर करण्यासाठी काम केले.
- विविधता: सावरकरांनी हिंदुत्व आणि राष्ट्रीय एकात्मतेवर अधिक जोर दिला, तर आंबेडकरांनी दलितांच्या अधिकारांवर आणि सामाजिक न्यायावर अधिक लक्ष केंद्रित केले.

४ एप्रिल १९४२ रोजी सावरकरांनी आंबेडकरांना पाठवलेला शुभेच्छा संदेश त्यांच्या परस्पर सन्मान आणि सामाजिक सुधारणा चळवळीतील सहकार्याचे एक उदाहरण आहे. हा संदेश त्यांच्या द्वारे एकमेकांना दिलेल्या आदराचे प्रतिक आहे आणि समाज सुधारण्यासाठी त्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे प्रतिबिंब आहे.संदेशाचा नेमका मजकूर असा आहे:

प्रिय डॉ. आंबेडकर,

तुमच्या देशसेवेसाठी केलेल्या महान कार्याबद्दल मी तुम्हाला हार्दिक शुभेच्छा देतो. तुमच्या अथक परिश्रमाने आणि दृढनिश्चयाने दलित समाजातील लोकांना नव्या दिशेने प्रेरणा दिली आहे. तुम्ही केलेल्या समाजसुधारणांच्या कार्यामुळे भारताच्या भविष्याकडे सकारात्मक दृष्टिकोनाने पाहता येते.तुम्ही जातिव्यवस्थेच्या विरोधात उभे राहून जो संघर्ष केला आहे, तो अत्यंत महत्त्वाचा आणि प्रेरणादायी आहे. तुमच्या नेतृत्वाखाली समाजात मोठे बदल झाले आहेत आणि अजूनही होत राहतील. या कार्यात तुम्हाला यश मिळावे, अशी मी शुभेच्छा देतो.

**तुमचा,**
**वीर सावरकर**

(संदर्भ: सावरकर चरित्र, लेखक धनंजय कीर)

सावरकरांनी अशा गैरसमजुतींवर जोरदार टीका केली: स्पर्श झाल्याने विटाळ होतो, धर्म लयास जातो, अमक्याने तमक्याला स्पर्श करू नये, एखाद्याची सावली पडली, तर बाटले जाऊ, यांसारख्या भ्रामक कल्पनांवर सावरकरांनी सडेतोड टीका केली. सावरकर म्हणतात,जर त्यांच्या स्पर्शाने तुम्ही बाटले जात असाल, तर तुम्हाला आणि त्यांना बनवणारा तुमचा देव हा आधीच बाटला गेला आहे. जरी आंबेडकर रत्नागिरीत सावरकरांचे कार्य पाहण्यासाठी येऊ शकले नाहीत, तरी आंबेडकरांनी सावरकरांना लिहिलेल्या पुढील पत्रात त्यांच्या कार्याचे महत्त्व व्यक्त केले आहे.

**डॉ. आंबेडकरांनी सावरकरांना लिहिलेले पत्र**

आपण समाज सुधारणेच्या क्षेत्रायचे काम करीत आहात त्याविषयी अनुकूल अभिप्राय देण्याची ही सधी मी घेत आहे. जर अस्पृश्य वर्ग हिंदुसमाजाचा अभिन्न भाग व्हायचा अभेल तर नुसती अस्पृश्यता जाऊन भागणार नाही.चातुवर्ण्याचे उच्चाटन झाले पाहिजे, ज्या घोष्या लोकांना ह्याची आवश्यकता पटली आहे, त्यापैकी आपण एक आहात हे सांगावयास मला आनंद वाटतो. (धनंजय कीर लिखित डॉ.आंबेडकर चरित्र, पृष्ठ २३९ सहावी आवृत्ती)

**वेदोक्तबंदीविरुद्ध त्यांचे विचार आणि कृती**

वेदोक्तबंदी - ज्या हिंदूला वेदाध्ययनाची इच्छा असेल, त्यास ते करता आले पाहिजे, मग तो कुठल्याही जातीचा असो. धर्माच्या नावावर होणारे अनिष्ट कर्मकांड आणि स्पृश्यांची पूर्वस्पृश्यांवर (सावरकर 'अस्पृश्य'ऐवजी 'पूर्वास्पृश्य' म्हणत) होणारी दंडबाजी बंद झाली पाहिजे. खरा वैदिक धर्म सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. फक्त या गोष्टी केवळ बोलून न दाखवता त्यांनी कृतीदेखील केली. सावरकरांच्या अध्यक्षतेखाली मालवण येथे दि. १९ मे, १९२९ रोजी भरलेल्या पूर्वस्पृश्य परिषदेत पूर्वस्पृश्यांना वेदाध्ययनाचा अधिकार दिला आणि यज्ञोपवित (जानवे) यांचेदेखील वाटप केले.

काही राजकीय नेत्यांचा असा दावा आहे की ते ब्रिटिश सरकारचे कठपुतळी होते; जर असे असेल तर सरकारने त्यांच्या साहित्यावर बंदी का आणली?



त्यांच्या प्रकाशनांना सार्वजनिक क्षेत्रात येऊ न देणे हे ब्रिटिशांच्या भीतीचे स्पष्ट संकेत आहे आणि आजही अनेक राजकीय नेते ब्रिटिश वारशाचे पालन करतात.

**ब्रिटिशांनी सावरकरांच्या खालील पुस्तकांवर बंदी घातली:**

१) मॅझिनीचे चरित्र (मराठी) - १९०८.

२) १८५७ चे स्वातंत्र्यसमर (Indian War of Independence) इंग्रजी - १९०९.

३) C:emn - नाटक - १९२७.

४) डॉ. नारायणराव सावरकर यांनी चालवलेले ' श्रद्धानंद ' हे साप्ताहिक ब्रिटिशांनी १० मे १९३० रोजी बंद केले. या साप्ताहिकात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे अनेक लेख प्रकाशित होत असत.

५) जुलै १९३१ मध्ये पंजाब सरकारने सावरकरांच्या उर्दूतील चरित्रावर बंदी घातली. त्यानंतर तमीळ, कन्नड आणि मराठीतील चरित्रांवरही बंदी घालण्यात आली.

६) ' माझी जन्मठेप ' या मराठी पुस्तकावर १९३४ मध्ये बंदी घालण्यात आली. २४ ऑक्टोबर, १९४० रोजी त्यांच्या तमिळ भाषेतील चरित्रावर बंदी घालण्यात आली.

७) नोव्हेंबर १९४१ मध्ये ग.पां. परचुरे यांनी लिहिलेल्या संक्षिप्त सावरकर-चरित्रावर बंदी घालण्यात आली.

८) नोव्हेंबर १९४३ मध्ये शि.ल. करंदीकर यांनी मराठीतून लिहिलेल्या सावरकर चरित्रावर बंदी घालण्यात आली.

वीर सावरकरांनी सनातन धर्म आणि विज्ञान कसे जोडले

**विज्ञानाचे कट्टर पुरस्कर्ते सावरकर**

हिंदुत्वाचा प्रखर प्रचार व मांडणी करणारे स्वातंत्र्यवीर सावरकर यांची विज्ञाननिष्ठा हा एक वैशिष्ट्यपूर्ण पैलू आहे. 'विज्ञाननिष्ठा वाढविणे हे बुद्धिवाद्यांचे कर्तव्य व धर्म आहे,' असे सांगताना सावरकर म्हणतात, 'ज्या अर्थी आम्हा सुधारकांना हे कळून चुकले आहे, की आमच्या हिंदूराष्ट्राच्या गळ्यासच तात देणाऱ्या या पोथीजात जातभेदांचा नि:पात केल्यावाचून हिंदूराष्ट्राचा अभ्युदय होणे असंभाव्य आहे, त्या अर्थी आम्ही बुद्धिवादी, विज्ञानवादी सुधारकांनी सर्व प्रकारचा धार्मिक भाबडेपणा, लुच्चेगिरी, मग ती वैदिक असो, वा बायबली असो वा कुराणीय असो वा पुराणीय असो -तिच्या कचाट्यातून मानवी बुद्धीला मुक्त करणे हेच पवित्र धर्मकृत्य आहे व त्यातच मनुष्यजातीचे कल्याण आहे. अशा शब्दात आपली विज्ञाननिष्ठा स्वातंत्र्यवीर सावरकरांनी प्रकट केली आहे. असे कठोर मत प्रकट करत असतानाच ते आपल्या सनातन धर्माचेही प्रकटीकरण तितक्याच प्रखर शब्दात करतात. ते म्हणतात, 'असतो मा सद्गमय। तमसो मा ज्योतिर्गमय। मृत्योर्मामृतं गमय । तसेच, 'ॐ सहनाववतु सहनौभुनक्तु सहवीर्यं करवावहै' किंवा 'सत्यमेव जयते' वा 'दीपज्योतिर्नमोस्तुते' असं म्हणणारा आपला धर्म विज्ञानाच्या विरोधात जातच नाही. तो विज्ञानाला पूरकच आहे. आपण त्या सावरकरांचे अनुयायी बाळ जेरे म्हणतात, स्वा. सावरकर हे विज्ञानवादी विचारांचे होते. अध्यात्मिकता ही त्यांची वैयक्तिक आवड होती. पण समाजाचे नियम हे आध्यात्मिकतेवर आधारित असू नयेत असे त्याचे मत होते. सावरकर म्हणतात, 'जे जे सृष्टीनियम आणि जी जी वैज्ञानिक सत्ये आज मनुष्याच्या ज्ञानाच्या आटोक्यात आलेली आहेत, त्यास आम्ही सनातन धर्म म्हणतो. प्रकाश, उष्णता, गती, गणित, ध्वनी, विद्युत, चुंबक, रेडियम, शरीरवैद्यक, यंत्र, शिल्प यांचे जे नियम आज ज्ञात आहेत, तो खरा सनातन धर्म होय.. 'प्रश्न उरला मनुष्यामनुष्यामधील शिष्टाचाराचा. परिस्थितीभेद झाला की हे निर्बंध बदलणेच इष्ट आहे. यामुळे मनुष्याचे झाडून सारे ऐहिक व्यवहार, नीति, रीती, निर्बंध हे त्यास या जगात हितप्रद आहेत की नाहीत याच कसोटीने ठरविले पाहिजेत, पाळले पाहिजेत. परिस्थितीनुसार परिवर्तिले पाहिजेत. असे मानवी व्यवहार सनातन असणेच शक्य नाही.' (किर्लोस्कर: १९३४ ते १९३७, सावरकरांचे सामाजिक विचार: पृष्ठ ४१ ते ५२)

भारतीय दंड संहितेच्या कलम ५१अ मध्ये वैज्ञानिक मानसिकता, मानवता, जिज्ञासा आणि सुधार हे नागरिकाच्या मूलभूत कर्तव्याचा पाया आहे, असे अधोरेखित केले आहे. सावरकरांचे विज्ञानवादी विचार हे संविधानानी स्वीकारल्याचे यातून दिसून येते.

जरी अनेक राजकीय व्यक्ती आणि कम्युनिस्ट वीर सावरकरांचा तिरस्कार करतात, तरी स्वातंत्र्याच्या लढाईतील त्यांची कामगिरी, हिंदूंना एकत्र आणण्याची त्यांची क्षमता, जातीव्यवस्थेविरुद्ध लढा आणि त्यांच्या बहुआयामी चारित्र्याने त्यांना राष्ट्रीय नायक बनवले आहे. या महान व्यक्तिमत्वाला कोटी कोटी प्रणाम.

**- पंकज जयस्वाल**
७८७५२१२१६१

**दि. २८ मे हा स्वातंत्र्य वीरांचा जन्म दिनांक. भारताच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार सावरकरांनी केला. भगूरला कुलदैवतसमोर त्यांनी भारत मातेला स्वतंत्र्य करण्यासाठी, ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त करण्याची ११व्या वर्षी शपथ घेतली व आयुष्यभर भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत घेतलेल्या शपथेचे निष्ठेने पालन केले.**

# स्वातंत्र्य वीर वि.दा. सावरकर

'तुजसाठी मरण ते जनन, तुजवीण जनन ते मरण' अशी प्रखर राष्ट्र भक्तीपर कवन त्यांनी केले. त्यांच्या मनात जाज्वल्य मातृभक्ती होती. लंडनच्या ब्रायटनच्या किनाऱ्यावर समुद्राकाठी तळमळीने 'सागरा प्राण तळमळला ने मजसि ने परत मातृभूमीला' अशी आर्त साद सागरास घातली.

बॅरेस्टर होण्यासाठी ते लंडनला गेले होते. त्यावेळी त्यांचे वास्तव्य इतर भारतीय विद्यार्थ्यां समवेत 'इंडिया हाऊस' येथे होते. तेथे त्या विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्या प्रखर व वक्तृत्वाने भारत मातेस स्वतंत्र करण्यासाठी सशस्त्र क्रांती करण्यास त्यांना उद्युक्त करत मदनलाला धिंग्रा याने यातूननच प्रेरणा घेवून कलेक्टर जॅक्सनचा वध केला. लंडनहून सावरकरांनी पिस्तुले भारतात पाठविली होती. पुस्तकाची पाने कोरून त्यात पिस्तुल लपवनू भारतात पाठवले. याचा संशय तसेच धिंग्रास कलेक्टर जॅक्सनचा खुन करण्यास सावरकरांनी उद्युक्त केले. याचा संशय सावरकर यांच्यावर होताच. सावरकर पॅलेसहून परत आल्या बरोबर रेल्वे स्टेशनवरच सावरकरांना अटक केली. त्यांचा खटला भारतात चलविण्यासाठी बोटीतून भारतात आणताना सावरकरांनी शौचकुपाच्या पोर्ट होलमधून फ्रान्सच्या किनाऱ्यावर (ती जगप्रसिद्ध) उडी घेतली. परंतु त्यांचे हे प्रयत्न निष्फळ झाले. व त्यांना मुंबईस आणून त्यांच्यावर खटला चालविला गेला. त्यांना काळ्या पानाच्या दोन शिक्षा ठोठावून मुंबई हून अंदमान आणले. तेथील सेल्युलर जेलच्या कोठडीत बंदिस्त केले. त्यावेळी जेलर वारी त्यांना म्हणाला, 'सावरकर आता तुम्ही ५० वर्षांनी सुटणार' त्यावेळी सावरकर ताडकन् उद्गारले, 'तुमचे राज्य तोपर्यंत भारतावर राहील काय?' केवढा हा हजरजबाबीपणा व धाडस.

जेलमध्ये कठीण शिक्षा होत असताना जी हिंदू दैनिक शिक्षा सौम्य करण्याच्या 'वार्डन'च्या आमिषाला बळी पडू मुस्लिम धर्मात गेले होते. त्यांचे मतपरिवर्तन करुन त्यांना हिंदू करुन घेतले. व हिंदू कैद्यांची संघटना बनविली.

अंदमानमधील दहा, अकरा वर्षांची शिक्षा भोगल्यावर पाच वर्ष राजकारणात भाग घ्यायचा नाही या अटीवर त्यांना रत्नागिरीमध्ये स्थानबद्ध केले. तेथे त्यांनी अस्पृश्य उद्धाराचे कार्य सुरु केले. पत्नीच्या माध्यमातून अस्पृश्यासह सर्व जातीच्या महिलांसाठी हळदी-कुंकू व सहभोजनाचे कार्यक्रम घडवून आणले. रत्नागिरीत पतितपावन मंदिर बांधले. त्याचे अनावरण एका भंगी जातीच्या व्यक्तीकडून केले. त्यांचे अस्पृश्य उद्धाराचे कार्य दिखावू नव्हते. मनापासून होते. या त्यांच्या महत्वाच्या कार्यास प्रसिद्धी मिळाली नाही.

स्थानबद्धतेचा कालावधी संपल्यावर त्यांनी हिंदू महासभेत प्रवेश केला. नंतर ते हिंदू महासभेचे अध्यक्ष झाले. भारतभर दौरे करुन हिंदू महासभा गाजविण्याचा प्रयत्न केला. १९५४ साली मे महिन्यामध्ये सावरकरांचे पुण्याच्या सदाशिव पेठेतील शिवाजी मंदिराच्या प्रांगणात भाषण झाले. त्यावेळी त्यांचे भाषण ऐकण्याचा व त्यांना जवळून पाहण्याचा योग मला आला. त्या भाषणात त्यांनी हात उंच करुन व मूठ आवळून म्हटले होते की, 'आज भारताकडे एक कोटी खडे सैन्य असले पाहिजे, आपण कोणावर हल्ला करणार नाही पण इतर देशांनी भारताकडे वाकड्या नजरेने पाहू नये यासाठी भारताने शस्त्र सज्ज असले पाहिजे. बलशाल्याची अंहिसा शोभून दिसते. नेभळटाच्या अंहिसेला जग किंमत देत नाही' आज इतक्या वर्षानी त्याची प्रचिती आली आहे. विद्यमान पंतप्रधान मोदी यांच्यामुळे भारत बलशाली झाला आहे. साने गुरुजींनी त्यांच्या कवनात म्हटल्या प्रमाणे 'बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो' याची प्रचिती येत आहे.


सावरकरांच्या जन्मगाव व जन्मठिकाणापासून त्यांचे जेथे जेथे वास्तव्य झाले त्या भगूर गावापासून ते मुंबईच्या दादरमध्ये असलेल्या सावरकर सदनापर्यंत प्रत्यक्ष जावून पाहण्याचा योग मला आला. लंडन मधील त्यांचे वास्तव्य असलेले 'इंडिया हाऊस' ही पाहण्याचा योग आला. फक्त ब्रायटनचा किनारा जेथे त्यांनी 'सागरा प्राण तळमळला' हे विरह गीत लिहले ते ठिकाण व बोटीतून समुद्रात उडी घेतली, ते ठिकाण सोडून सावरकरांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सर्व स्थळांना भेट देण्याचा योग मला आला. हे माझे महद्भाग्य. स्वतंत्र्यवीरांच्या जन्मदिनानिमित्त त्यांना विनम्र शब्दांजली.

**- सु.स. देशमुख**
९८२२०४३९४९

# थोर क्रांतिकारक सावरकरांचा शोध

**जयांचे कर राष्ट्राला सावरतात।**
**तयांना सावरकर म्हणतात।**
**आहे त्यांचे आयुष्य स्वातंत्र्यसमर ।**
**असीम त्यागाचा होम केला।।**
**बुद्धीप्रामाण्यवादी राजकारणी ।**
**लोकोत्तर त्यागाचा मेरुमणी ।**
**तो हा राष्ट्रवादाचा स्वामी।**
**पुण्यभूमी वंद्य देशाभिमानी ।।**
**जे जे उत्तम उदात्त गुण ।**
**ते ते सावरकर कुटुंबात जाण।**
**माझा धावून गेला भगूरला प्राण।**
**शिरसाष्टांग प्रणिपात करावया ।।**

थोर क्रांतिकारक समाज सुधारक ।बहुत तळमळीचा साहित्यिक । संदेश दिला साहित्य संमेलनात। परवशतेच्या गडद काळोखात।। पाहता पाहता पाहिली ।ज्वाला की हो उफाळली ।महाकाव्ये की हो निर्मिली । ४१ ग्रंथ निर्मिले ।।कमला गोमांतक महाकाव्ये ।सहा सोनेरी पाने। भरून आली आमची मने। विनायका चरित्र तुमचे गावया।। मज महासागर की हो दिसला ।देव देश आणि धर्म हा असला। होमात समिधा सगळ्यांना अर्पिल्या । पोहोचले स्मशानी पिंडदान सेवाया ।।देशासाठी स्मशानात भूक भागविली ।इतके सारे करुनी क्रूर उपेक्षा तव झाली ।तदनंतर अपेक्षा पूर्ण झाली।टीका निंदेला सामोरे जावे लागले।।सावरकर निर्भय दृष्टे। हिंदू राष्ट्राच्या कल्पनेचे कर्ते ।सर्वसमावेशक हिंदुत्वाचे पुरस्कर्ते ।लष्करी प्रशिक्षणाचे उद्गाते ।।राजकीय डावपेचाचा भाग ।म्हणून प्राशिली दयायाचिका ही आग ।नंतर देशाला आली जाग। स्वातंत्र्य ही मिळाले।। सावरकरांची झाली सुटका ।परी प्रायोपवेशनाची घटिका। मरणाने केली सुटका। गांधीहत्येनंतर छळवादाचा झटका ।।सावरकर उडीने त्रिखंडात गाजले ।साऱ्या जगाचे लक्ष वेधले ।कैक क्रांतीकारकांना प्रेरणा दिधले। इतिहास की हो निर्माण केला।। सावरकर म्हणाले होते ।रणावीण स्वातंत्र्य न मिळते। अपरिहार्य बंड कोणा न कळते। भारतीयांचे अंतर सारे जळते।। सावरकर दृष्टे बहुत ।इतिहास लिहिला त्वरित ।मूलगामी मीमांसा करीत ।वर्तमान सांगितले ।।बुद्धिवादी समाज सुधारक ।पतीत पावन मंदिर प्रवेश देख ।विज्ञानाचा पुजारी एक ।विवेकमूलक श्रद्धा सांगितली ।।सावरकर साहित्यिक श्रेष्ठ ।भाषा शुद्धी विवेक देख ।वाङ्मयाचे प्रकार अनेक ।मराठीत हाताळले।। नवनीत कुसुम कोमल वाणी। छत्रपती शिवरायांची गौरव गाणी ।संस्कृत प्रचुर देववाणी। प्रगट केली समाजाच्या उद्धरणी।।देव देश धर्मासाठी ।पतित पावन मंदिरासाठी ।अस्पृश्यता निर्मूलनासाठी। आयुष्य की हो दिला।।रणावीण स्वातंत्र्य न मिळाले।भिक्षेने स्वातंत्र्य न मिळाले ।अहिंसेने स्वातंत्र्य मिळाले।भारताला ।। घ्यावे लष्कर प्रशिक्षण।प्रत्येक भारतीयांचा हाआग्रह जाण।मरण येईपर्यंत



रक्षण ।देश स्वातंत्र्य टिकवाया ।। आपले सर्व काही ।समर्पिले हिंदुस्थानासाठी। देशासाठी खड्ग काही ।परजुनी ठेवावे।। साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष आसनी।प्रगटली वीर रसपूर्ण विनायक वाणी ।आता लेखण्या मोडाव्यात साहित्यिकांनी। बंदुका हाती घ्याव्या पारतंत्र्य विमोचनी ।।सावरकरीय कर्तृत्व। सावरकरीय वक्तृत्व।सावरकरीय दातृत्व। जणू गंगौघाचे पाणी सर्वत्र।। शूरांचे समर्थन ।शत्रूंचे निर्दालन। शक्तीचे पूजन । भारतीयां साठी।।देवी समोर उभे ठाकले ।अष्टभुजा देवीचे दर्शन घेतले ।मारिता मारिता शपथ घेतले । स्वातंत्र्यासाठी।। जयाच्या अंगी बळ ।तो राही सुरक्षित अनंतकाळ ।म्हणून शक्तीचा जाळ ।वन्ही चेतवीत जावा।। छत्रपती शिवरायांचा आदर्श। मॅझिनीचा परामर्श ।देश प्रेमाचा उत्कर्ष ।सावरकरांच्या अंगी।। त्यांचा तो अपार त्याग ।शब्दांचा घेतो माग।

परी आकाशाचा भाग ।कवी कल्पनेत मावेना।। वास्तववादी विचारवंता ।हिंदुत्वाच्या भगवंता। जहाल मत वाद्यांचा नियंता ।जहाल मवाळ मत मतांतरा ।।महाकवी सावरकर। नाटककार बहु थोर। इतिहासकार शूर ।वर्णिता पडती शब्द थिटे।। क्रांतिकारकांचा शिरोमणी ।गावी वीर रसपूर्ण गाणी। शक्तीच्या पूजनी ।शरीर तो हा अर्पावा ।।होते सबळांची पूजा। दुर्बलांना मिळती सजा। शूरवीरांचा गाजा वाजा ।सर्वत्र होईल ।।क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान ।हिंदुत्वाचे उद्गायन। बुद्धिवादी श्रेष्ठ जाण ।तयांची कीर्ती काय वर्णू ।।भारतात वेगवेगळे विचार। एकच देश सेवेचा आचार ।सर्व प्रकारचा अपप्रचार ।त्यागून सोडावा ।।सावरकरांचे राष्ट्रीय भाकीत ।भविष्यात होतील सत्य सत्य ।लक्षात राहू द्या एक मात ।सावरकरीय तर्क भाष्य।। भारतीयांचे सर्वसमावेशक हिंदुत्व ।असंख्य जाती पंथ बहुत ।सगळ्यांना त्वरित ।राष्ट्रीय प्रवाहात आणावे ।। सावरकरांची करू नका कदापि निंदा ।स्वतंत्रतेचे स्तोत्र वंदा। डेंजरस कैदी क्रमांक ३२७७८ जिंदा ।मना मनात ।।पन्नास वर्षांचे अंदमानाचे काळे पाणी। ओठांवरती अहर्निश हिंदमातेची गौरव गाणी ।सक्त मजुरीचा एकमेव स्वातंत्र्य सेनानी।

अखंड भारतात ।। स्वतंत्रतेची आरती । रोमारोमात देशभक्ती। दुरावली प्रिय पत्नी ।यमुना ती।। बाळ बाबाराव आणि प्रभाकर । कुटुंब सावरकर धगधगते यज्ञकुंड।सावरकर फसाळते साहित्य समुद्र। सावरकर उत्कटतेचे शिखर। हिमालयाचे । एक दिवस असा येईल ।सावरकरांचे थोरपण देश गाईल ।सर्व विसंवाद लयाला जाईल। जन्माला येईल धगधगते देश प्रेम। सावरकर म्हणजे ब्राईटन किनारी देशासाठी धाय मोकलून रडणारा देशभक्त ।

सावरकर म्हणजे देशाचा आकांत ।सावरकर म्हणजे कवी मनाचे आर्त क्रंदन। सावरकर म्हणजे तेज।अंधाराला पुरून उरलेला।। सावरकर म्हणजे तप ।निष्ठेने केलेला ।सावरकर म्हणजे तत्परता ।संकटकाळी असलेला।। सावरकर म्हणजे तितिक्षा ।सदैव सोबत असणारी। सावरकर म्हणजे चळवळ्या ।इंग्रजांविरुद्ध संघटन करणारा ।।सावरकर म्हणजे विधीज्ञ ।निर्मिती असलेला ।सावरकर म्हणजे तिखट चवीचा ।सुपशास्त्रात आवश्यक असलेला ।।सावरकर म्हणजेच तत्व ।सत्व कधी न सोडलेला।सावरकर म्हणजे एक संग्रामशील माणूस ।संपूर्ण भारत भूमीच्या किनाऱ्यांवर गस्त घालणारा ।।

**- प्रा. माधव कुलकर्णी,** ९६२३७९१४१९
लिंबी चिंचोली (ता.दक्षिण सोलापूर)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# वळसंग मध्ये पावसाची जोरदार हजेरी

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २७ मे- :**

वळसंग (ता.दक्षिण सोलापूर) येथे ढगफुटीसदृष्य पद्धतीचा पाऊस झाला. त्यामुळे ग्रामदैवत श्री चौडेश्वरी यात्रेवर याचा परिणाम झाला.

कर्नाटक, महाराष्ट्र व इतर राज्यातून या यात्रेसाठी भाविकांची गर्दी होत असते. सोमवार सकाळी पासून पाहुण्यांची येणे चालू असताना पावसाने त्या अगोदर हजेरी लावून गावामध्ये पाणीच पाणी केले आहे. चार-पाच दिवसापासून ढगाळ वातावरण असून सूर्य देवाची दर्शन सुद्धा झाले नाही. परंतु सोमवारी पावसांनी जोरदार हजेरी लावली.



गावामध्ये कोणत्याही घरांची पडझड व कोणाची नुकसान झाली नाही. या पावसाने उन्हाळ्या मध्ये त्रस्त झालेल्या वन्यजीव व पक्ष्यांना मात्र सुख झाले आहे. काही शेतकऱ्यांना आंब्याचे तर काहींना फळबागेचे नुकसान सहन करावे लागले आहे.

### सरकारकडून मदत करण्याचा प्रयत्न करू

पावसाने शेतकऱ्यांची अवस्था बघता अनेकांनी सोलारसाठी शेत दिले गेले आहे. राहिलेल्या शेतकऱ्यांपैकी काहींचे शेत पेरणीसाठी तयार तर काहींच्या कामांचा अडथळा निर्माण झाला आहे. गट नं ३६१ मधील शेतकरी विनोद मल्लिकार्जुन कोडले यांचे शेतातील केळीच्या झाडांचे नुकसान झाल्याचा अहवाल सादर केला. शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याची पाहणी सुद्धा होत आहे. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरकारकडून मदत करण्याचा नक्की प्रयत्न करू.

**- नयना देशपांडे, तलाठी**

# जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी दर सहा महिन्याला आमसभा घेणार : आ. उत्तमराव जानकर

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि.२७ मे-**

माळशिरस तालुक्यातील जनतेचे अनेक प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी दर सहा महिन्याला आमसभा घेणार असून त्या आमसभेमध्ये गत आमसभेतील किती प्रश्न मार्गी लागले हे पाहणार आहे. तसेच तहसील कार्यालय व भूमी अभिलेख कार्यालयात प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्याच कार्यालयात पुढील आठवड्यात बैठक घेणार असून तक्रारदारांनी त्या ठिकाणी उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार उत्तमराव जानकर यांनी केले. या आमसभेला माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील, आमदार अभिजीत पाटील, माजी आमदार आर.जी. रूपनवर, तहसीलदार सुरेश शेजुळ, गटविकास अधिकारी आबासाहेब पवार यांच्यासह अनेक विभागाचे शासकीय अधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार जानकर म्हणाले, तालुक्याला पुढे नेण्यासाठी आपल्याला अनेक प्रश्न सोडवायचे आहेत. सर्व शासकीय कार्यालयात नागरिक



दहा-दहा वर्ष हेलपाटे मारत आहेत. मोजणी कार्यालयाचे प्रश्न व शेतकऱ्यांच्या शेतातील रस्त्याचे प्रश्न अनेक वर्ष प्रलंबित आहेत. तेही सोडवण्याचे प्रयत्न करणार असून माळशिरस येथे शंभर खाटांचे ट्रामा सेंटर उभारण्यात येणार आहे. तसेच तालुक्यातील शंभर शाळांना आमदार फंडातून प्रत्येकी दोन लाखाचे अनुदान शाळांची सुधारणा करण्यासाठी देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच संजय गांधी निराधार व अपंग योजनेतील लाभार्थींना मिळणारे अनुदान बंद झाले आहे. त्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांची केवायसीसह इतर कागदपत्रांची पूर्तता ३० जुन पर्यंत त्यांच्या घरापर्यंत जाऊन अधिकाऱ्यांनी करावी व या योजनेपासून

> तालुक्याची आमसभा सन २०१० नंतर पहिल्यांदाच झाल्याने या आम सभेला नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती यात शेतीच्या अंतर्गत रस्ते चा वाद भूमी अभिलेख कार्यालयातील मोजणी कृषि विभाग बांधकाम विभाग निरा व ऊजनी कालवा आदी बद्दल नागरिकांच्या तक्रारी जास्त होते

एकही नागरिक वंचित राहिला न पाहिजे. तालुक्यातील जे रोहित्र सातत्याने जळत आहेत त्या ठिकाणी बसवून त्या रोहित्रा वरील भार कमी करावा म्हणजे शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही असे त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले

यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी केळीच्या अनुदानाविषयी कृषी अधिकाऱ्यांना विचारले असता त्या अधिकाऱ्यांकडे कुठलीही माहिती नव्हती. तसेच अपघातात मयत शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे अनुदान शासनामार्फत देण्यात येते. त्या अपघाताची माहिती पुढील ३० तारखेपर्यंत घेऊन या अशी त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले आहे. दारूमुळे अनेक कुटुंब उध्वस्त होत आहेत परंतु याबाबत पोलीस प्रशासन व एक्साइज विभाग यांना त्याचे गांभीर्य नाही .या दोन्ही विभागाने संयुक्त कारवाई करून दारू बंद करावी. दारू सुरू दिसल्यास संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला यावेळी आमदार रणजीतसिंह मोहि-पाटील यांनी तालुक्यातील छत्तीस ग्रामपंचायतीना शेती महामंडळाची गावठाणासाठी जमीन मिळावी म्हणून प्रस्ताव दाखल केला असून त्याचा पाठपुरावा चालू असून हा प्रश्न लवकरच मार्गी लागेल असे सांगितले. या आमसभेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. गटविकास अधिकारी आबासाहेब पवार यांनी पंचायत समितीच्या योजनांचा व पंचायत समितीच्या सर्व विभागांचा आढावा घेऊन तालुक्यात सध्या सोळा गावात पाण्याची टँकर चालू असून आता समाधानकारक पाऊस झाल्याने टँकर बंद होतील असे सांगितले. तहसीलदार सुरेश शेजुळ यांनी अवकाळी पावसामुळे दीडशे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून नुकसानीचे पंचनामे चालू असून त्याचा अहवाल शासनाला सादर करणार आहे .संजय गांधी निराधार योजनेचे २०२४ पर्यंतच्या सर्व लाभार्थ्यांना लाभ मिळत असून एकूण १३ हजार ९१३ प्रकरणापैकी दोन हजार सातशे प्रकरणातील लाभार्थींना अद्याप लाभ मिळाला नाही. त्यांच्या कागदपत्राची पुर्तता करून लवकरच त्यांचाही प्रश्न मार्गी लागेल असे सांगितले.

# सीमा भागातील नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

## नदीपात्रात २६.५२५ हजार क्यूसेक पाण्याचा विसर्ग; चडचण तहसीलदारांनी दिली भेट

**तभा वृत्तसेवा,**
**विजयपूर, दि.२७ मे-**

महाराष्ट्रातील निरा खोरे व भीमा खोऱ्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून जोरदार पाऊस होत आहे. त्यामुळे निरा जलाशयातून २६.५२५ हजार क्यूसेक पाणी भीमा नदीच्या पात्रात सोडण्यात आल्याची माहिती चडचणचे तहसीलदार संजय इंगळे यांनी दिली. त्यांनी धुळखेड गावातील बॅरेजला भेट देऊन नदी पात्रातील पाण्याची पातळी तपासल्यानंतर ग्रामस्थांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. सोलापूर जिल्ह्यातील सीमेलगतच्या गावांनाही हा इशारा आहे.

### रस्ते संपर्क तुटला

भीमा नदीवर बांधलेले ८ बॅरेजेस पाण्याखाली गेले असून त्यावरून पाणी धोकादायक पातळीवरून वाहत आहे. त्यामुळे रस्ते संपर्क पूर्णतः तुटलेला आहे. या पाहणी दरम्यान निरीक्षक पी. जे. कोडहोन्नव, ग्रामलेखक विठ्ठल कोळी उपस्थित होते.

विजयपूर जिल्ह्यातील चडचण आणि इंडी तालुक्यांतील विविध गावांना पूराचा धोका संभवतो त्यामुळे ग्रामस्थांनी सावध राहावे असेही त्यांनी सांगितले. कर्नाटक - महाराष्ट्र सीमाभागात सातत्याने





पाऊस पडत असल्यामुळे पाण्याचे प्रमाण कधीही वाढू शकते अशी माहिती मिळाली आहे. त्यामुळे पूर परिस्थिती उद्भवण्याची शक्यता असून, नदीकाठच्या नागरिकांना याची पूर्वसूचना देण्यात आली आहे. लोकांनी साधनसामग्री सुरक्षित स्थळी हलवावी असे प्रशासनाने आवाहन केले आहे.

# मंगळवेढा परिसरात संततधार; भीमा नदीला पूर

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२७ मे-**

मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात मागील तीन दिवसापासून पावसाची रिपरीप सुरु असल्याने काळ्या शिवारात बऱ्यापैकी ओल झाली असून वापसा येताच खरीप पेरणीस प्रारंभ होणार आहे. दरम्यान भीमा नदीला इतिहासात प्रथमच मे महिन्यात महापूर आल्याने निसर्गाच्या या चमत्काराबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात रात्रीच्या वेळी पावसाची सतत संततधार कोसळत असल्याने काळा शिवार ओलाचिंब झाला आहे. तालुक्याच्या दक्षिण भागातही बर्यापैकी जमिनीत ओल



झाल्याने पाऊस थांबताच खरीप पेरणीला सुरुवात होणार असल्याने शेतकर्यांनी पेरणी पुर्व कामकाजाची तयारी सुरु केल्याचे चित्र आहे. दि.७ जून रोजी प्रतिवर्षी मृत नक्षत्र निघाल्यानंतर पावसाला प्रारंभ होतो. यंदा मात्र त्याच्या उलट निसर्गाचे चित्र पहावयास मिळत असल्याने भीमा नदी मे महिन्यातच काठोकाठ भरुन वाहत आहे. कायम कोरडी म्हणून ओळखली जाणारी माण नदीही उन्हाळ्यातच दुथडी भरुन वाहत आहे. अचानक भिमेला पाणी आल्यामळे अनेक शेतर्यांचे कृषी पंप पाण्याखाली गेल्याच्या तक्रारी आहेत. भीमेच्या पात्रात माण नदीतून तसेच निरा खोर्यातील व भीमा खोर्यातील पडलेल्या पावसामुळे भीमा नदीच्या पाण्यात वाढ झाली आहे. माचणूर येथील तिर्थक्षेत्र श्री जटाशंकर मंदिर,बठाण व माचणूर येथील को.प.बंधारा आदी ठिकाणे पाण्याखाली गेली आहेत. प्रतिवर्षी मे महिन्यात पाण्याची भिषणता जाणवत असते. यंदा मात्र भीमा नदीत मुबलक पाणी आल्यामुळे नदीकाठ गावचा पाणी प्रश्न मार्गी लागला आहे. दरवर्षी जून,जुलै महिन्यात भीमा नदी कोरडीच असते. कारहुणवीच्या वेळी जनावरांना धुण्यासही नदीत पाणी नसते. पडलेला असतो. यंदा मात्र मे महिन्यातच नदीत आलेल्या पाण्यामुळे हा प्रश्न मार्गी लागला आहे.

## सतत पडणाऱ्या पावसामुळे चाऱ्याच्या शोधातील मेंढपाळांचे हाल

### कुटूंबासह मेंढपाळ रात्रभर भिजून ओलेचिंब

कर्नाटक, कोल्हापूर या भागातून मंगळवेढ्याच्या काळ्या शिवारात अनेक मेंढपाळ चाऱ्याच्या शोधात येथे आले आहेत. गेले चार दिवस सतत रात्रंदिवस पाऊस पडत असल्याने काळ्या शिवारात आपल्या कुटूंबासह मेंढपाळ रात्रभर भिजून ओले चिंब झाल्याचे चित्र होते. कुटूंबासह लहान मुले असल्याने त्यांचे पुरे हाल होत आहेत. काळ्या शिवारात जिथे जागा मिळेल त्या ठिकाणी मुक्काम करीत आहेत. दिवसभर मेंढपाळ रस्त्याच्या कडेने पावसाने उटलेल्या हिरवा चारा मेंढ्या सोडून त्यांचा जीव जगवत आहेत.

# दामाजी कारखाना येथे गुरूवारी कीर्तनासह सत्कार

## स्व. किसनलाल मर्दा पुण्यतिथीनिमीत्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२७ मे-**

श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक-चेअरमन स्व.किसनलाल मर्दा उर्फ मारवाडी वकील यांच्या १७ व्या पुण्यतिथीनिमित्त गुरुवार दि.२९ मे रोजी कारखाना कार्यस्थळावर भजन, कीर्तनासह सेवानिवृत्तांचा सत्कार होणार असल्याची माहिती चेअरमन शिवानंद पाटील यांनी दिली.

सकाळी ९ वाजता स्व.मारवाडी वकिल यांचे प्रतिमेचे पुजन व कारखाना परिसरातील पुतळयांचे पूजन धनश्री परिवाराचे मार्गदर्शक प्रा.शिवाजीराव काळुंगे, उद्योजक रमेश किसनलाल मर्दा, रतनचंद शहा बँकेचे चेअरमन राहुल शहा, दामाजी कारखान्याचे माजी चेअरमन ॲड. नंदकुमार पवार, जिजामाता पतसंस्थेचे मार्गदर्शक रामकृष्ण नागणे, बळीराजा पतसंस्थेचे चेअरमन दामोदर देशमुख, कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन रामचंद्र वाकडे, माजी संचालक यादाप्पा माळी यांचे हस्ते होणार असल्याचे चेअरमन पाटील यांनी सांगीतले. सकाळी ८.३० वाजता गुरुदत्त भजनी मंडळ मारापुर व हनुमान भजनी मंडळ तरटगांव यांचा भजनाचा कार्यक्रम होईल. सकाळी १० वाजता तुर्कपिंपरीच्या बबनराव शिंदे शुगरचे ऊस पुरवठा अधिकारी हभप औदुंबर कदम महाराज (उपळाई खुर्द) यांचे किर्तन होणार आहे. तसेच दुपारी १२ वाजता पुष्पवृष्टी होवुन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात येईल. त्यानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार असल्याचे व्हाईस चेअरमन तानाजीभाऊ खरात यांनी सांगितले. पुण्यतिथी निमित्त होणाऱ्या कार्यक्रमाचे निमित्ताने दि. १ जून २०२४ ते ३१ मे २०२५ या कालावधीत सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करुन त्यांना निरोप देण्यात येणार आहे. तरी कार्यक्रमास मंगळवेढा तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सभासद, ऊस उत्पादक शेतकरी,ऊस तोडणी वाहतुक ठेकेदार व कारखान्याचे सर्व कर्मचाऱ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन चेअरमन पाटील यांनी केले आहे. यावळी सर्व संचालक सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख, कामगार संघटना व पदाधिकारी उपस्थित होते.`

## क्रीडा

# सोलापूर हुतात्मा सिटी इलेव्हन संघ कर्णधारपदी राजू रंगम

### मुंबईत ३०मे पासून रंगणार बालरंगभूमी क्रिकेट लीगचा थरार

**सोलापूर दि. २७ मे-**

ऐरोली नवी मुंबई येथील युरो इंटरनॅशनल स्कूलच्या मैदानावर रंगणाऱ्या ३०मे पासून रंगणाऱ्या बालरंगभूमी क्रिकेट लीग स्पर्धे साठी सोलापूर जिल्ह्याच्या सोलापूर हुतात्मा सिटी इलेव्हन संघाच्या कर्णधारपदी राजू रंगम यांची निवड करण्यात आली.

क्रिकेट हा खेळ संघभावना वाढविणारा खेळ आहे. बालरंगभूमी परिषद सातत्याने लहान बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करीत असते. मात्र हे उपक्रम राबविण्यासाठी सातत्याने कार्यरत असणाऱ्या बालरंगभूमी परिषदेच्या सभासदांकरिताही उपक्रम राबवावेत या उद्देशातून तसेच त्यांच्यातील संघटनकौशल्य वाढण्यासोबत त्यांच्या शारीरिक आरोग्यवाढीसाठ बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीच्या अध्यक्ष ॲड.निलम शिर्के सामंत यांच्या संकल्पनेतून ३० व ३१ मे रोजी बालरंगभूमी क्रिकेट लीगचे आयोजन केले आहे. या क्रिकेट लीगमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून रत्नागिरी, जळगाव, पुणे, नंदुरबार, सोलापूर, लातूर, पंढरपूर, परभणी, सांगली, इचलकरंजी, बृहन्मुंबई, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर, धुळे, कोल्हापूर, अहिल्यानगर येथील बालरंगभूमी परिषदेच्या सभासदांचे संघ सहभागी होणार आहेत. बालप्रेक्षक व त्यांच्या पालकांनी या सामन्यांचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन येथील बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा सीमा यलगुलवार आणि कार्याध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी केले आहे.

### संघातील अन्य खेळाडू असे:

किरण फडके, सुधीर मोरे, राकेश पुंजाल, मिलिंद ठोंबरे, किरण लोंढे, श्रीपाद कुडक्याल, रियाज मुल्ला, गोवर्धन कमटम, असलम मुलाणी, खंडू शिंदे, कासीम मुजावर, शंकर कोळी, नितीन धुळम, लालचंद धुळम

# सहाव्या फेरीअखेर मुलात पुण्याचे हेयान, गोरांक्ष तर मुलीत मुंबईची गिरीशा आघाडीवर

## चॅम्पियन चषक ९ वर्षाखालील राज्यस्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे -**

महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटना यांच्या मान्यतेने तसेच सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशन व द हेरिटेजच्या सहकार्याने सोलापुर चेस अकॅडम ीने आयोजित केलेल्या ''चॅम्पियन चषक'' ९ वर्षाखालील खुला व मुलींच्या राज्यस्तरीय निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धेत आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडू हेयान रेड्डी व गोरांक्ष खंडेलवाल सहाव्या फेरीअखेर साडेपाच गुणासह संयुक्तरीत्या आघाडी घेत सर्धेत चुरस निर्माण केली आहे. तसेच मुलीच्या गटात मुंबईची गिरीशा पै हिने सहा गुणांसह आघाडी घेत विजेतेपदाकडे वाटचाल सुरु ठेवलेली आहे. तर अनिश जवळकर, नोवा जुयल, इवान दुबे, युवेन झवेरी व लक्ष दिघे हे सर्वजण पाच गुणांसह संयुक्तरीत्या दुसऱ्या स्थानावर आहेत व मुलीत ऋत्वि हरपुडे, अन्वी हिंगे, डेलिया खैरनार संयुक्तपणे पाच गुणांसह द्वितीय स्थानावर तर सोलापूरचे पृथा ठोंबरे, संस्कृती व रीना जाधव हे साडेचार गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहेत.

गांधीनगर येथील द हेरिटेज येथे आजपासून सुरु झालेल्या सुरु असलेल्या या स्पर्धेत मुलांमध्ये पहिल्या पटावर पहिल्या पटावर पाचव्या फेरीअखेर पाच गुणांचा आघाडीवर असणाऱ्या युवेन झवेरी व गोरांक्ष खंडेलवाल यांच्यातील रंगतदार झालेल्या लढतीत मध्यपर्वात युवेनने केलेल्या चुकांचा गोरांक्षने अचूक फायदा घेत डावावर निर्णायक वर्चस्व राखले व शेवटी युवेनला डाव सोडण्यास भाग पाडले. पहिल्या पटावर गिरीशा पै व रीवा



**बुद्धिबळातील चाल रचताना मग्न खेळाडू ऋत्वी हरपुडे (पुणे) विरुद्ध गिरीशा पै (मुंबई) यांच्यातील रंगलेला डाव.**

### पाचव्या फेरीअखेरचे महत्वाचे निकाल:

**मुली:** पृथा ठोंबरे वि. वि. प्रियाल शिखरे, संस्कृती जाधव वि. वि. आभा फाळके

**मुले :** आदित्य सिद्धार्थ बरोबरी दर्श राऊत, अन्वित गायकवाड पराभूत वि. कथीत शेलार.

चरणकर (सातारा) यांच्यातील झालेल्या आकर्षक लढतीत गिरीशाने सुरुवातीपासूनच आक्रमक चाली खेळत डावावर वर्चस्व मिळवले व मध्यपर्वात वजीर, उंट व अश्वाच्या मदतीने रीवाच्या राजावर प्रखर हल्ला चढवत विजय संपादन केला.

स्पर्धेत प्रमुख पंच म्हणून प्रमुख पंच मुंबईचे आंतरराष्ट्रीय पंच संदेश नागरनाईक तर त्यांना सहायक वरिष्ठ राष्टीय पंच उदय वगरे, शशिकांत मक्तेदार, वरिष्ठ राष्टीय पंच रोहिणी तुम्मा, युवराज पोगुल, भरत वडीशेरला, विजय पंगुडवाले, यश इंगळे, नवीना वडीशेरला काम पाहत आहेत.

# सुयश गुरुकूलचे माजी विद्यार्थी प्रशांत वाघ भारतीय ॲथलेटिक्स संघाचे प्रशिक्षक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**



सुयश गुरुकूलचे माजी विद्यार्थी प्रशांत वाघ यांची पॅरिस २०२५ वर्ल्ड पॅरा ॲथलेटिक्स ग्रँड प्रिक्ससाठी भारतीय पॅरा ॲथलेटिक्स संघाच्या प्रशिक्षकपदी निवड करण्यात आली आहे.

पॅरालिम्पिक कमिटी ऑफ इंडियाने त्यांच्या अधिकृत पत्राद्वारे ही निवड जाहीर करत महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयास ही माहिती कळवली आहे. ही स्पर्धा २९ मे ते ५ जून २०२५ दरम्यान पॅरिसमध्ये पार पडणार आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून पॅरा ॲथलेट्सना नवी दिल्ली येथे होणाऱ्या २०२५ वर्ल्ड पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये सहभागासाठी म हत्त्वपूर्ण रँकिंग मिळणार आहे. श्री. वाघ यांची ही निवड केवळ त्यांचा व्यक्तिगत सन्मान नसून महाराष्ट्र आणि भारतासाठीही ही गौरवाची गोष्ट आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघ उत्तम कामगिरी करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## महत्वाचे...




### इको नेचर संस्थेतर्फे वृक्ष लावगड

**सोलापूर, दि. २७ मे-**

सोलापूर येथील जागतिक पर्यावरण दिन या अनुषंगाने वृक्ष लागवडी सुरुवात झालेली आहे सोलापूर मधील इको नेचर या संस्थेने एनसीसी महाराष्ट्रन बटालियन या जवानासमवेत सोलापुरात वृक्ष लागवड करण्यात आली आहे. कर्नल रणधीर सतीश व कॅप्टन समीर मणियार, पर्यावरण दूत म्हणून ओळखले जाणारे डॉ. मनोज देवकर कॅप्टन शिल्पा लब्बा व सर्व जवान व एनसीसी विद्यार्थी या समवेत सोलापूर शहरातील प्रत्येक शाळेमध्ये व परिसरात वृक्ष लागवड करण्यात येत आहे प्राथमिक सहस्त्र अर्जुन प्रशालेमध्ये व आजूबाजूच्या परिसरात शंभर वृक्षांची लागवड करण्यात आली. इको नेचर ही संस्था गेली पंधरा वर्षे वृक्ष लागवड संवर्धन यासाठी कार्यरत आहेत. पर्यावरण दूत डॉ मनोज देवकर यांनी उपस्थित जवान व ५०० विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धन व वृक्ष लागवड, प्रदूषण मुक्त वातावरण उपाय व योजना यासंदर्भात प्रबोधनही केले व देवकर हे प्रत्येकांना नेचर वॉरियर नेचर योद्धा तयार करण्यासाठी प्रयत्नशील आहे.



### पूनम व्यवहारेंना महाराष्ट्र रत्न पुरस्कार

**सोलापूर, दि. २७ मे-**

ए.डी. फाऊंडेशनच्यावतीने जाहीर करण्यात आलेला महाराष्ट्र रत्न पुरस्कार शरदचंद्र पवार बालम मंदीर येथील सहशिक्षिका पूनम व्यवहारे यांना माजी आ. प्रकाश शेंडगे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ए डी फाऊंडेशनच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या पुरस्कार सोहळ्यात महाराष्ट्ररत्न सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास जतचे माजी आ. प्रकाश शेंडगे, आयकर आयुक्त डॉ.नितीन वाघमोडे, डॉ सचिन मोटे, ॲड. चिमण डांगे, चेतन नरोटे, रूक्मिणी गलांडे, राम मांडूरके आदी उपस्थित होते.

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उद्या सोलापुरात

**सोलापूर, दि. २७ मे-**

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे गुरुवार, दि. २९ मे रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे- गुरूवार, दि.२९ मे रोजी सकाळी ७.४५ वाजता सांताक्रूझ विमानतळ येथून विमानाने सोलापूरकडे प्रयाण करतील. सकाळी ०८.३० वाजता सोलापूर विमानतळ येथे आगमन व सकाळी ०८.३५ वाजता मोटारीने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रयाण. सकाळी ०८.५५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे आगमन. सकाळी ०९.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे जिल्हाधिकारी यांची आढावा बैठक. सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे नोंदणी व मुद्रांक विभाग तसेच भूमी अभिलेख विभागाची आढावा बैठक.



दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे स्थानिक आमदार महोदय यांचे समवेत बैठक. दुपारी ०१.०० ते १.४५ वाजता राखीव. दुपारी २ वाजता ड्रीम पॅलेस, पोलीस कल्याण केंद्र, सेवासदन शाळेसमोर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी ४.वाजता एस.टी. स्टँडजवळ सोलापूर जिल्हा भाजप कोअर कमिटी बैठक, सायंकाळी ५ वाजता शिवस्मारक, एस.टी.स्टँडजवळ येथे राखीव, सायंकाळी ५.३० वाजता मोटारीने सोलापूर विमानतळाकडे प्रयाण करतील, सायंकाळी ५.४५ वाजता सोलापूर विमानतळ येथे आगमन व विमानाने सोलापूर येथून मुंबईकडे प्रयाण करतील.



### एल्ग्रीस सोलरतर्फे समर एंड सेलला शेवटचे मोजकेच दिवस

**सोलापूर, दि. २७ मे-**

शहरातील अग्रगण्य सौर ऊर्जा सेवा पुरवठादार एल्ग्रीस सोलर पॉवर सिस्टीमने उन्हाळ्याच्या शेवटी ग्राहकांसाठी विशेष सवलतीची योजना जाहीर केली आहे. या 'डीाशी एपव डरश्रश' अंतर्गत ग्राहकांना २० हजार पर्यंत सवलत आणि फक्त रुपये ९९९ पासून इएमआयमध्ये सोलर सिस्टिम बसवण्याची सुवर्णसंधी देण्यात आली आहे. एल्ग्रीस सोलरचे व्यवस्थापकीय संचालक संपत धूत म्हणाले, सोलापूरला 'सोलरपूर' बनवण्याचे आमचे ध्येय आहे. विजेच्या वाढत्या दरांपासून नागरिकांना स्वावलंबी बनवण्यासाठी ही खास ऑफर दिली जात आहे. विजेची २५ वर्षांची बचत आणि कमी दरातील सोलर सिस्टिम हे यामध्ये खास आहे. नागरिकांनी ही संधी त्वरित स्वीकारावी, असे आवाहन कंपनीने केले आहे. ही ऑफर मर्यादित कालावधीसाठी असून शेवटचे मोजकेच दिवस उरले आहेत. अधिक माहितीसाठी एश्रसीळी डेश्ररी झुशी डूींशाी झींीं. डींव. टोल फ्री क्रमांक: ०२० ७१५३ ००२७ वेबसाइट: www.elgrissolarpower.com यांच्याशी संपर्क साधावा. **या योजनेतील ठळक बाबी :** १. २० हजार पर्यंत सूट, २. EMI फक्त रुपये ९९९ पासून सुरू, ३. मोफत साईट सर्व्हे व तज्ज्ञ सल्ला, ४. १ हजार रुपयेमध्ये बुकिंगची सुविधा, ५. ७८ हजार पर्यंतची सबसिडी, ६. सौर ऊर्जेचा पर्यावरणपूरक वापर व दीर्घकाळ वीजबिल बचत

# महापालिका आयुक्तांनी केली 'त्या' अस्वच्छ ठिकाणांची पाहणी

- दैनिक तरुण भारतच्या वृत्ताची घेतली दखल
- तातडीने कार्यवाही करण्याचे दिले आदेश



तरुण भारत IMPACT

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ मे-**

शहरात कचऱ्यांचे वाढते ढिग, रोगराईला मिळते आमंत्रण'' या शीर्षकाखाली दैनिक तरुण भारतने प्रसिद्ध केलेल्या वृत्ताची दखल महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी घेतली. आज त्यांनी कचऱ्याचे ढीग असलेल्या त्या अस्वच्छ ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने स्वच्छता करण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले.

शहरात कचऱ्यांचे वाढते ढिग, रोगराईला मिळते आमंत्रण'' या शीर्षकाखाली दैनिक तरुण भारतने मंगळवारच्या अंकात ठळक छायाचित्रासह वृत्त प्रसिद्ध केले होते. शहरातील सिद्धार्थ हाउसिंग सोसायटी, शिक्षक सोसायटी, मौलाली चौक, पोटफाडी चौक, कुंभार गल्ली आदी परिसरात मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग साचले असल्याचे या बातमीमध्ये नमूद केले होते. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी या वृत्ताची तातडीने दखल घेतली. कचऱ्याचे ढग साचलेल्या त्या ठिकाणी म हापालिका आयुक्तांनी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली.

त्या परिसरातील नागरिकांशी संवाद साधून अडचणी जाणून घेतल्या. तातडीने त्या ठिकाणची स्वच्छतेची कामे करण्याचे आदेश घनकचरा विभागातील अधिकाऱ्यांना दिले. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी पोटफाडी चौक, सिद्धार्थ सोसायटी चौक, कुंभार गल्ली, मौलाली चौक या परिसरात पाहणी केली. त्या परिसरातील तातडीने कचरा उचलण्यासंदर्भात अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार ,सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, मुख्य आरोग्य निरीक्षक नागनाथ मेंडगुळे आदींसह अधिकारी उपस्थित होते.

## विविध ठिकाणी आयुक्तांच्या 'ऑन द स्पॉट' भेटी

- स्मशानभूमी, रस्ता आणि शुभराय आर्ट गॅलरी बांधकामाची केली पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ मे-**

महापालिका आयुक्त डॉ सचिन ओम्बासे यांनी आज विविध ठिकाणी जाऊन ''ऑन द स्पॉट'' पाहणी केली. शहरातील श्री सिद्धेश्वर सहकारी कारखाना जवळील स्मशानभूमी, सम्राट चौकातील रस्ता आणि शुभराय आर्ट गॅलरी बांधकामाची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाहीच्या सूचना दिल्या.

महापालिका आयुक्त डॉ सचिन ओम्बासे यांनी आज शहरात विविध ठिकाणी सकाळी ११ वाजल्यापासूनच भेटी देण्यास सुरुवात केली. सुरुवातीला त्यांनी श्री सिद्धेश्वर सहकारी कारखाना जवळील स्मशानभूमी येथे भेट देऊन पाहणी केली. याठिकाणी स्मशानभूमी दुरुस्ती, विद्युत दाहीनी, कंपाउंड वॉल आदी कामे करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी आयुक्त यांनी अधिकाऱ्यांना समशानभूमी येथील दुरुस्ती व निविदा प्रक्रिया राबवण्यासंदर्भात सांगितले.

त्यानंतर त्यांनी पोटफाडी चौक, सिद्धार्थ सोसायटी चौक, कुंभार गल्ली, मौलाली चौक या परिसरातील कचरा उचलण्यासंदर्भात व परिसर स्वच्छ ठेवण्यासंदर्भात अधिकाऱ्यांना आदेश दिले. शुभराय आर्ट गॅलरी येथील बांधकामाची पाहणी केली. त्याचबरोबर भोगावती सोसायटी सम्राट चौक रोडची पाहणी केली. सम्राट चौक ते कारंबा नाका येथील रस्त्याची दुरावस्था झाली असून तो रस्ता तातडीने दुरुस्त करण्यात यावा व रस्त्यासंदर्भात निविदा प्रक्रिया राबवावी अशी सूचना दिली. आयुक्तांनी नागरिकांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या. माजी गटनेते आनंद चंदनशिवे, माजी नगरसेवक गणेश पुजारी उपस्थित होते. आयुक्तांनी सलगर वस्ती येथील कबड्डी मैदानाचीही पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, नगर अभियंता सारिका अकुलवार, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार,विभागीय अधिकारी नंदकुमार जगधने, विभागीय अधिकारी महेश क्षीरसागर आदी उपस्थित होते.

## पनाश टॉवर प्रकरण

## महापालिकेच्या आजी-माजी १२ अधिकाऱ्यांना बजावली नोटीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

विजापूर रोडवरील बहुचर्चित १७ मजली पनाश टॉवर प्रकरणाची चौकशी पूर्ण होऊन त्याचा अहवाल महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना सादर करण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणी अखेर मंगळवारी महापालिकेच्या संबंधित १२ आजी- माजी अधिकारी - कर्मचाऱ्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी नोटीसा बजावल्या आहेत.

**या अधिकाऱ्यांना बजावली नोटीस**

याप्रकरणी सोलापूर महापालिकेचे विद्यमान अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, तत्कालीन अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे. तत्कालीन नगर अभियंता (निवृत्त) सुभाष सावस्कर, लक्ष्मण चलवादी (निवृत्त), सध्याचे सहायक अभियंता रामचंद्र पेंटर, नागनाथ बाबर, मोहन कांबळे (निवृत्त), एस. व्ही. जाधव, श्रीकांत खानापुरे, भादुले, अब्दुल चंडरकी, झाकीरहुसेन नाईकवाडी आदी आजी-माजी अधिकारी - कर्मचाऱ्यांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत, असे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी सांगितले.

**१० दिवसात खुलासा द्यावा लागणार**

आयुक्त डॉ. सचिन ओम्बासेंच्या आदेशानुसार १२ आजी व माजी अधिकारी-कर्मचाऱ्यांना मंगळवारी नोटीसा बजावण्यात आल्या. दहा दिवसांमध्ये संबंधितांना खुलासा द्यावा लागणार आहे. चौकशी अहवालाच्या अनुषंगाने या नोटीसा दिल्या आहेत, अशी माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी दिली.

## जुळे सोलापुरातील अनेक नगरात अंधाराचे साम्राज्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ मे-**

जुळे सोलापूर परिसरातील रूबीनगर, ज्ञानेश्वर नगर, अमोल नगर, बँक कॉलनी परिसरात पथदिवे बंद असल्याने रात्री अंधाराचे साम्राज्य असते.

सध्या चार दिवसापासून सततच्या पावसाने रस्ते चिखलमय झाले आहेत. तर रस्त्यावरील खड्ड्यातून पाणी साचल्याने वाहनधारकांना त्रास होत आहे. अशातच पथदिवे बंद असल्याने अधिकच त्रास सहन करावा लागत आहे. अनेकजण रात्री उशीरा कंपनी कामावरून रात्री बाराच्या पुढे घरी येतात. त्यांना रस्त्यावर पथदिवे नसल्याने खड्ड्यांचा तसेच कुत्र्यांचा असा दुहेरी त्रास सहन करावा लागत आहे. डीमार्ट चौकातून रूबीनगर, बॉम्बे पार्क कडे जाणाऱ्या रस्त्यावर मोकाट कुत्र्यांची संख्या मोठी आहे. त्यांचाही त्रास वाहनधारकांना तसेच पादचाऱ्यांना होत आहे.

## सोलापुरातील पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या

- अनेक अधिकारी नवे आले तर अनेकांची झाली बदली



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ मे -**

राज्याच्या गृहविभागाने मंगळवारी राज्य पोलिस दलातील पोलिस निरीक्षक, सहायक पोलिस निरीक्षक आणि पोलिस उपनिरीक्षक पदाच्या अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय कारणास्तव तसेच विनंतीवरून बदल्या केल्या आहेत. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातून अनेकांची बदली झाली आहे तर अनेकजण बदली होवून सोलापूरला आले आहेत.

**पोलिस निरीक्षक**

प्रदीप कसबे (पीटीएस, सोलापूर ते पुणे शहर), निवृत्ती मोरे (सोलापूर ग्रामीण ते पीटीएस, नानवीज), संतोष तासगांवकर (पीटीएस, सोलापूर ते पुणे ग्रामीण), सुरेश निंबाळकर (सोलापूर ग्रामीण ते पीटीएस, सोलापूर), सुशांत वराळे (पीटीएस, सोलापूर ते सोलापूर शहर), गजानन बनसोडे (पीटीएस, सोलापूर ते मुंबई शहर), संदीप मोदे (पीटीएस, सोलापूर ते हिंगोली), दत्तात्रय कोळेकर (पीटीएस, सोलापूर ते मुंबई शहर), अमोल मिसाळ (गुन्हे अन्वेषण विभाग ते सोलापूर शहर), प्रज्ञा खोद्रे (पीटीएस, लातूर ते पीटीएस, सोलापूर), पुष्पा किर्दत (नागरी हक्क संरक्षण ते पीटीएस, सोलापूर), गोविंद पांढरे (दहशतवाद विरोधी पथक ते पीटीएस, सोलापूर), नामदेव बंडगर (रायगड ते सोलापूर शहर), बाजीराव पोवार (नाशिक ग्रामीण ते सोलापूर ग्रामीण).

**सहायक पोलिस निरीक्षक**

विशाल जगताप (मुंबई शहर ते सोलापूर शहर), ज्ञानेश्वर पाटील (पीटीएस, तुरची ते सोलापूर शहर), विजयकुमार शिंदे (पुणे शहर ते पीटीएस, सोलापूर), सूरजकुमार राजगुरू (पुणे शहर ते पीटीएस, सोलापूर), अब्दुल मजिद शेख (बीड ते पीटीएस, सोलापूर), नकुल न्यामणे (पिंपरी चिंचवड ते सोलापूर शहर), प्रदीप शिंदे (सांगली ते पीटीएस, सोलापूर), सोमनाथ पडसळकर (सोलापूर शहर ते मसुप), सोम नाथ हंडाळ (सोलापूर शहर ते पुणे शहर), आशा मांगुरे (मुंबई शहर ते पीटीएस, सोलापूर).

**पोलिस उपनिरीक्षक**

विकास घुगे (सोलापूर शहर ते रागुवि), नजीब इनामदार (पीटीएस, सोलापूर ते लोहमार्ग, छत्रपती संभाजी नगर), शुभांगी जगताप-कोल्हाळ (पीटीएस, सोलापूर ते पुणे शहर), सुरेश गुडा (पीटीएस, सोलापूर ते पीटीएस, नानवीज), दिपक धांडे (पीटीएस, सोलापूर ते नागपूर ग्रामीण), सुशिल कदम (पीटीएस, सोलापूर ते सातारा), हनुमंत दोंड (पीटीएस, सोलापूर ते पीटीएस, नानवीज), व्यंकटेश मुंगीवार (पीटीएस, सोलापूर ते गडचिरोली), सचिन चिवंडे (पीटीएस, सोलापूर ते जळगाव).

## डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरण

## माने-मुसळेच्या जामीन अर्जावर ९ जूनला सुनावणी

- पोलिसांनी अर्धवट कागदपत्रे दिल्याने सरकारी पक्षाने म्हणणे सादर केले नाही



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ मे -**

एस. पी. इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरो सायन्सेसचे संस्थापक तथा प्रसिध्द मेंदू विकारतज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या मनिषा माने-मुसळे हिच्या जामीन अर्जावर मंगळवारी अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश कटारीया यांच्यासमोर सुनावणी झाली.

पोलिसांनी अर्धवट कागदपत्रे सादर केल्याने सरकारी पक्षाने म्हणणे सादर केले नाही. त्यामुळे आता याची सुनावणी ९ जून रोजी होणार आहे.

मेंदू विकार तज्ञ डॉ. शिरीष पद्माकर वळसंगकर (वय ७०, रा. १५८ सी, रेल्वे लाईन, सोलापूर) यांनी १८ एप्रिल २०२५ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास त्यांच्या राहत्या घरातील स्वतःच्या बेडरूम ला अटॅच असलेल्या बाथरूमम ध्ये स्वतःच्या परवाना असलेल्या पिस्टलमधून कानशिलामध्ये गोळी घालून घेऊन आत्महत्या केली आहे. डॉ. वळसंगकर यांनी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीनुसार, ज्या माणसाला मी शिकवून आज ए ओ केले आहे आणि चांगला पगार देतो आहे, त्याने खोटारडे आणि घाणेरडे आरोप करून मला धमकावले आहे, त्याचे मला आतीव दुःख आणि म्हणून मी माझे जीवन संपवत आहे, असे लिहून आत्महत्या केली.

त्यामुळे याप्रकरणी डॉ. अश्विन शिरीष वळसंगकर (वय ४५, रा. एस पी इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोसायन्सेस, वळसंगकर हॉस्पीटल, मोदी रेल्वे क्रॉसींग, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मनिषा महेश माने उर्फ मुसळे (वय ४५, रा. ८०, बसवराज नेले नगर, जुळे सोलापूर) हिच्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी मनिषा मानेला अटक केली आहे. सध्या ती न्यायालयीन कोठडीत असून तिने जामीनासाठी अर्ज दाखल केला आहे.

या अर्जावर सुनावणी सुरु असून न्यायालयाने सरकारी पक्षाला म्हणणे सादर करण्याचा आदेश दिला आहे. मंगळवारी याची सुनावणी होती, परंतु पोलिसांनी अर्धवट कागदपत्रे सादर केल्यामुळे सरकारी पक्षाला म्हणणे सादर करता आले नाही, त्यामुळे म्हणणे सादर करण्यासाठी पुढील तारीख मागण्यात आली. आता याची सुनावणी ९ जून रोजी होणार आहे. या गुन्ह्याचा तपास पोलिस निरीक्षक अजित लकडे करीत आहेत.

याप्रकरणात सरकारच्यावतीने ॲड. प्रदीपसिंग राजपूत यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड. प्रशांत नवगिरे काम पाहात आहेत.




## सैनिकांच्या सन्मानार्थ 'मसिहा'ने दिली देशभक्ती गीतातून सलामी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ मे-**

भारत सरकारने 'ऑपरेशन सिंदूर' या लष्करी कारवाईद्वारे पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर हल्ले करून प्रत्युत्तर दिले. या कारवाईत भारतीय लष्कराने दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले. त्यांच्या धैर्याच्या आणि शौर्याच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी देशभक्ती गीतातून सलामी देण्यात आल्याची माहिती मसिहा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अमित मंचले यांनी दिली.

यावेळी डॉ. नॉवेल अनम ेल, डेव्हिड मंचले, इमॅन्युएल भंडारे, मार्क जगले, हेबेल जगले, जेम्स तीपलदिनी, अतिश मेट्रे. आनंदराज भंडारे, आनंद जंगेकर, भास्कर भंडारे आदींची उपस्थिती होती. दरम्यान, मसिहा सामाजिक संस्थेच्या वतीने आपरेशन सिंदुरचा विजयोत्सव या कार्यक्रम ाचे आयोजन मसिहा चौक मोदी सोलापूर येथे करण्यात आले होते. पावसाची रिमझिम सुरूवात झाली व संध्याकाळी पावसाची तीव्रता वाढली, पावसाचा जोर वाढला तरीही आयोजकांचे व नागरिकांच्या उत्साहातील तीव्रता कमी होऊ दिली नाही. सीमेवर जवान अहोरात्र डोळ्यात तेल घालून प्राणाची पर्वा न करता देशसेवा करतात. त्यांच्या विजयोत्सवासाठी ही सलामी कणभर नाही असे म्हणत भर पावसात देशभक्ती गीतांच्या कार्यक्रमाला प्रतिसाद दिले.

देशभक्तीमय वातावरण निर्माण करण्यासाठी गायक सन्नी भंडारे, मेगाताई साळुंखे, जिहान सर, गायत्री पेदींटी, जोसोफिया जब्बार, सुंदरराज यकले, महेश यांची साथ लाभली. कार्यक्रम ाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. सूत्रसंचालन अध्यापिका रूथ भंडारे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सनी भंडारे, मोजेस कमलापुरे,अजय भंडारी, सिमोन पोगुल, विकास कमलापुरे, गौतम जगले, सिद्राम साखरे, रवी भंडारे, मोजेस तीपलदीनी, सुरेश फरड, केनीथ लोकेकर, प्रमोद कुरकल्ली, सॅमसन सोमन,अमित रणदिवे,सूरज यांकले, विजयकुम ार भंडारे, जोसेफ भंडारे, अजित मंचले, नाथन बुरले, जॉन्सन रामजिते, किटू लोकेकर, एलिजर सातालोलू आदींनी परिश्रम घेतले.

## चारधाम यात्रा न घडविता साडे अकरा लाखांची फसवणूक

### शौर्य यात्रा कंपनीच्या मालक, कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ मे -**

चारधाम यात्रा न घडवून आणत ११ लाख ५८ हजार २२५ रुपयांची फसवणुक करणाऱ्या शौर्य यात्रा कंपनीच्या मालक व कर्मचाऱ्यांवर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत किरण सुरेश शेळगे (वय ३४, रा. महेश थोबडे नगर, शेळगी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मयुरेश नामदेव वाघ, अश्विनी स्वामी, शामकुमार मराठे, काजल निमसे यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लक्ष्मी मार्केट येथे शौर्य यात्रा कंपनीचे कार्यालय आहे. मयुरेश वाघ हा शौर्य यात्रा कंपनीचा मालक असून उर्वरीत आरोपी हे कर्मचारी आहेत. शौर्य यात्रा कंपनीकडून नागरीकांकडून पैसे आकारून विविध धार्मिक पर्यटन सहली काढण्यात येतात. त्यामुळे किरण शेळगे यांच्यासह अनेकांनी जानेवारी २०२५ मध्ये चारधाम यात्रा व उत्तर भारत यात्रा करण्याकरिता नियोजन करण्यात आले होते. त्यासाठीचे पैसेदेखील शेळगे यांनी शौर्य यात्रा कंपनीकडे भरलेले होते. शौर्य कंपनीकडे पैसे भरूनदेखील कंपनीकडून खोटे आश्वासन देऊन यात्रा रद्द करण्यात आली. शेळगे यांच्यासह अनेकांनी शौर्य यात्रा कंपनीकडे ११ लाख ५८ हजार २२५ रुपये भरले होते. कंपनीने यात्रा रद्द केल्यानंतर शेळगे यांच्यासह अनेकांचे पैसे न देता त्यांची फसवणुक केली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक जाधव पुढील तपास करीत आहेत.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पैशाच्या कारणातून भिंतीवर आपटून केली मारहाण

### दक्षिण सोलापूर तालुक्यातील बरुरु येथील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ मे -**

पैशाच्या कारणातून बरुर शिवारातील पीके धाब्याजवळ तरुणाला भिंतीवर आपटले. यात डोक्याला जखम झाल्याने त्याला शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. ही मारहाण मंगळवारी रात्री १०.३० च्या सुमारास झाली. सुरेश विठ्ठल इटकर (वय ३४, रा. बरुरु ता. द. सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. सोमवारी रात्री दहाच्या सुमारास सुरेश बरुर गावाजवळील पीके धाब्याजवळ असताना, त्याला लालसाब भोई याने पैशाच्या कारणातून तेथील भिंतीवर आपटल्याने त्याच्या डोक्याला जखम झाली. त्यानंतर लाथाबुक्यांनी म




ारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागला. मंगळवारी रात्री १.४० वाजता तो स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

**▶▶ महत्वाचे...**

### छताचा तुकडा पडून महिला जखमी

**सोलापूर, दि.२७ मे-**

पावसाच्या पाण्याने छताचा तुकडा डोक्यात पडल्याने महिला जखमी झाली. ही घटना सोमवारी मध्यरात्री १२.३० वाजता बापूजी नगरात घडली. कविता हनुमंत बुगले (वय २३) असे महिलेचे नाव आहे. मंगळवारी दिवसभर आणि रात्री पावसाची श्हर परिसरात रिपरिप सुरुच होती. दरम्यान यातील जखमी कविता या त्यांच्या बापूजी नगरातील घ्ररात असताना, पावसाने अचानक त्यांच्या घराच्या छताचा तुकडा डोक्यात पडला. यात डोक्यात जखम झाल्याने पती हनुमंत याने रात्री एकच्या सुमारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### शिवसेना विडी घरकुलात एकाला सर्पदंश

**सोलापूर, दि.२७ मे-**

कुंभारी परिसरातील शिवसेना विडी घरकुल येथे सोमवारी रात्री १० च्या सुमारास एकाला सर्पदंश झाला. त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. राजेश नागनाथ चिप्पा (वय २९) असे सापाने दंश केलेल्याचे नाव आहे. सोमवारी रात्री राजेश हा त्याच्या राहत्या घराजवळ थांबला होता. तेव्हा अचानक त्याच्या उजव्या पायाला सापाने दंश केला. रात्री ११.४५ वाजता भाऊ गणेश याने उपचाराकरीता शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### महिलेला सापाने केला दंश

**सोलापूर, दि. २७ मे-**

लोकसेवा हायस्कूलजवळील सत्य साई नगरात घरात झोपलेल्या महिलेला सापाने दंश केला. हा प्रकार सोमवारी रात्री ११ च्या सुमारास घडला. शांताबाई विठ्ठल विटकर (वय ४०, रा. सत्य साई नगर) असे दंश झालेल्य महिलेचे नाव आहे. शांताबाई या सोमवारी रात्री नेहमीप्रमाणे त्याच्या घरात झोपी गेल्या. रात्री अकराच्या सुमारास त्यांच्या उजव्या हाताला सापाने दंश केला. ही बाब लक्षात येताच मुलगा राजाराम याने उपचारास शासकीय रग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### घरगुती कारणातून तरुणाने प्राशन केले औषध

**सोलापूर, दि.२७ मे-**

घरगुती कारणातून कोणतेतरी औषध प्राशन केल्याने तरुण अत्यवस्थ झाला. हा प्रकार सांगोला येथील भीमनगरात घडला असून तरुणावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. अविनाश राजू कसबे (वय २७, रा. भिम नगर, सांगोला) असे तरुणाचे नाव आहे. सोमवात्री १०.३० च्या सुमारास अविनाश हा त्याच्या सांगोला येथील भीमनगरातील घरात होता. त्यावेळी त्याने घरगुती वादातून कोणतेतरी औषध प्राशन केले. यानंतर त्याला त्रास होऊ लागल्याने पहाटे पाचच्या सुमारास भाऊ अजय याने शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### मलिकवाडी भोयरेत एकाने प्राशन केले औषध

**सोलापूर, दि. २७ मे-**

मोहोळ तालुक्यातील मलिकवाडी भोयरे गावात एकाने अज्ञात कारणातून कोणतेतरी औषध प्राशन केले. हा प्रकार मंगळवारी सकाळी सातच्या सुमारास घडला. रामदास नामदेव शिरसट (वय ४५) असे औषध प्राशन केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. मंगळवारी त्याने अचानक अज्ञात कारणातून कोणतेरी औषध प्राशन केले. यात त्याला त्रास होऊ लागल्याने सकाळी ९ च्या सुमारास भाऊ शाहू याने उपचारास दाखल केले.

### उलट्या होऊन पाथरीतील व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि.२७ मे-**

उलट्या होऊन त्यानंतर चक्कर आल्याने उपचारास दाखल केलेल्या व्यक्तीचा उपचारादरम्यान मंगळवारी सकाळी ७.३० वाजता मृत्यू झाला. उत्तर सोलापूर तालुक्यातील पाथरी येथील ही व्यक्ती आहे. हरिबा लक्ष्मण बंडगर (वय ६०) असे मृत पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. रविवारी रात्री ८ च्या सुमारास हरिबा यांना राहत्या घरात उलट्यांचा त्रास होऊ लागला. त्यानंतर त्यांना चक्कर आल्याने सोमवारी दुपारी चारच्या सुमारास उपचारास दाखल केले होते. त्यावेळी त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले होते. त्यांची शुध्द हरपली होती, उपचारादरम्यान मंगळवारी सकाळी ७.३० च्या सुमारास त्यांचा मृत्यू झाल्याची घोषणा डॉक्टरांनी केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# महिला आयोगाकडे हुंडाबळीच्या राज्यातून शून्य तक्रारी

- **वैवाहिक समस्या, सामाजिक, लैंगिक छळाच्या तक्रारी जास्त**
- **13 हजार ७3८ तक्रारी दाखल**
- **सर्वाधिक तक्रारी वैवाहिक समस्येच्या**
- **हुंडाबळीच्या तक्रारी नोंद करण्याबाबत पालकांची उदासिनता**






**तभा वृत्तसेवा । अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि. २७ मे -**

वैष्णवी हगवणे आत्महत्या आहे. राज्य महिला आयोगाकडे गेल्या वर्षभरात प्राप्त झालेल्या १३ हजार ७३८ विविध प्रकरणांमध्ये राज्यभरातून हुंडाबळीची एकही तक्रार नाही. सर्वाधिक तक्रारी वैवाहिक समस्यांच्या आहेत. हुंडाबळीच्या तक्रारींची नोंद करण्याबाबत असलेली उदासीनता या निमित्ताने समोर आली आहे. सोलापूर जिल्ह्यात जानेवारी २०२४ पासून एप्रिल २०२५ या कालावधीत सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात १२ हुंडाबळीचे गुन्हे घडलेले असून पोलिस दलातील महिला तक्रार निवारण केंद्राकडे सुमारे २६०० तक्रारी दाखल झालेल्या आहेत. हुंडाबळीचा प्रकार होवूनदेखील पालक महिला आयोगाकडे तक्रार दाखल करत नसल्याचे आश्चर्य व्यक्त होत आहे.

राज्यात महिलांविरोधातील हिंसाचार, शोषण, छेड, अत्याचारांशी संबंधित घटना आयोगाच्या निदर्शनास येताच, योग्य तपास आणि गुन्हेगारांवर कारवाईसाठी संबंधित सरकारी तसेच पोलिस अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपाने त्वरित पावले उचलली जातात. यामध्ये वैवाहिक संबंध, मालमत्तेच्या बाबी, हुंड्यासाठी छळ, हुंडाबळी, बलात्कार, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ इत्यादींच्या तक्रारी आयोगाच्या कार्यालयात नोंदविण्यात येतात. राज्य महिला आयोगाकडे, १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या काळात १३ हजार ७३८ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. शिवाय, मागील वर्षीच्या एक हजार ७०१ तक्रारी प्रलंबित आहेत. त्यामुळे आयोगाकडे एकूण १५ हजार ४३९ तक्रारी आहेत.

महिला आयोगाच्या या प्राप्त तक्रारींवर नजर टाकली असता गेल्या वर्षभरात किंवा मागील प्रलंबित तक्रारीमध्ये हुंडाबळीची एकही तक्रार आयोगाकडे नोंदविण्यात आलेली नाही. त्याशिवाय न्यायालयीन प्रलंबित दाव्याचीही एकही तक्रार आयोगाकडे नोंदविण्यात आलेली नाही. यंदाही ही प्रथा तशीच कायम असून हुंडाबळी आणि न्यायालयीन प्रलंबित दावा यासंदर्भात आयोगाकडे यंदाही शून्य तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. दरम्यान, यंदाच्या वर्षभरात आयोगाकडे एकूण १३ हजार ७३८ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यात ३९०० वैवाहिक समस्या, ३५७१ सामाजिक समस्या, बलात्कार इत्यादी तक्रारींचा समावेश आहे. तर मालमत्तेविषयक १ हजार ३४ तक्रारी आणि कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळाबाबत ७८ तक्रारी वर्षभरात प्राप्त झाल्या आहेत. त्याशिवाय कामाच्या ठिकाणी होणारा छळ संदर्भात ९१६ आणि इतर ४ हजार २३९ तक्रारी वर्षभरात प्राप्त झाल्या असल्याची माहिती समोर आली आहे. या १३ हजार ७३८ तक्रारीशिवाय मागील प्रलंबित अशा १७०१ तक्रारीही आयोगाकडे आहेत. त्यामुळे १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत आयोगाकडे एकूण १५ हजार ४३९ तक्रारी आयोगापुढे आल्या आहेत. त्यापैकी १३ हजार २६८ तक्रारी निकाली काढण्यात आल्या असून २ हजार १७१ तक्रारींवर अद्याप कार्यवाही सुरु असल्याची माहिती आयोगाने आकडेवारीत स्पष्ट केले आहे. महिला आयोगाकडे प्राप्त तक्रारींवर नजर टाकली असता, यात हुंडाबळीच्या एकाही तक्रारीचा समावेश नाही. ग्रामीण भागासह राज्याच्या अनेक शहरी भागांतही हुंड्याची मागणी केल्याच्या अनेक तक्रारी वारंवार समोर येतात. अशावेळी केवळ तांत्रिक कारणांमुळे त्यांची नोंद होत नसल्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे. यावरून, येत्या काळात वाद पेटण्याची शक्यता असून, राज्य सरकार याबाबत काय भूमिका घेते, याकडे लक्ष लागले आहे.

### सोलापुरात हुंडाबळीच्या १२ गुन्हे तर महिलांच्या सुमारे २६०० तक्रारी

सोलापूर जिल्ह्यात जानेवारी २०२४ ते एप्रिल २०२५ या कालावधीत हुंडाबळीचे १२ गुन्हे नोंद झाले आहेत. तर महिलासंबंधीचे २५७४ तक्रारी अर्ज दाखल झालेले आहेत. यामध्ये सोलापूर शहर आयुक्तालयामध्ये १९७७ तक्रारी तर सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलिसांकडे ५९७ तक्रारी दाखल आहेत. शहर आणि ग्रामीण पोलिस दलाकडे दाखल असलेल्या एकूण तक्रारींमध्ये १००५ प्रकरणांमध्ये समझोता होऊन महिला नांदण्यास गेलेल्या आहेत. ५१४ प्रकरणांमध्ये पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आलेले असून ७४० प्रकरणे कौटुंबिक न्यायालयात पाठविण्यात आली आहेत.

### महिला आयोगाकडील आकडेवारी

| तक्रारीचे प्रकार | एकूण तक्रारी | निकाली तक्रारी | कार्यवाहीच्या तक्रारी |
|---|---|---|---|
| वैवाहिक समस्या | ४,७३६ | ३,७३५ | १,००१ |
| न्यायालयीन प्रलंबित | ०० | ०० | ०० |
| हुंडाबळी | ०० | ०० | ०० |
| सामाजिक समस्या, बलात्कार | ३,८०० | ३,४२२ | ४५८ |
| मालमत्तेविषयक समस्या | १,१८९ | ९९३ | १९६ |
| कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ | १०३ | ६४ | ३९ |
| कामाच्या ठिकाणी होणारा छळ | १,०१४ | ८५७ | १५७ |
| इतर | ४,५१७ | ४,१९७ | ३२० |
| **एकूण** | **१५,४३९** | **१३,२६८** | **२,१७१** |

### राज्य महिला आयोगाबाबत महिलांमध्ये अनभिज्ञता

आपल्यावर झालेल्या अत्याचाराबाबत तक्रार देण्यासाठी पोलिस यंत्रणा असून त्याशिवाय राज्य महिला आयोग ही एक यंत्रणा असल्याबाबत महिलांमध्ये अनभिज्ञता असल्याचे दिसून येते. राज्य महिला आयोगाचा पत्ता, त्याचा संपर्क नंबर याबाबत अनेक कार्यालयामध्ये कुठेही नोंद किंवा तो सामान्यांच्या नजरेस पडेल अशाप्रकारे डिसप्ले करण्यात आलेला नाही.

## लोकमंगलच्यावतीने शुक्रवारी गुणवंत विद्यार्थ्यांसह सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

प्रतिवर्षाप्रमाणे लोकमंगल फाउंडेशनच्या वतीने फेब्रुवारी/मार्च २०२५ मध्ये झालेल्या शालांत प्रमाणपत्र परिक्षेत शहरातील प्रत्येक प्रशालेत गुणानुक्रमे सर्व प्रथम आलेल्या विद्यार्थी व विद्याथीनींचा कौतुक सोहळा व सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांचा सत्कार शुक्रवार, ३० मे रोजी दुपारी ३ वाजता शिवस्मारक सभागृह, शिंदे चौक, सोलापूर येथे आयोजित केला आहे. शहरातील प्रत्येक शाळेतील प्रथम आलेल्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी आपली गुणपत्रिका सोबत घेऊन लोकमंगल फाउंडेशनशी संपर्क साधावा. कार्यक्रमाच्या दिवशी आलेल्या पात्र विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात येईल असे लोकमंगल फाउंडेशनच्या वतीने सांगण्यात आले आहे. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी या सत्कार सोहळ्यात सहभागी व्हावे. अधिक माहितीसाठी ०२१७-२६०६०७० येथे संपर्क साधावा.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पूर्णकृती मूर्तींचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ मे-**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त ३० मंडळांना पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पूर्णाकृती मूर्तीचे वितरण गुरुवारी (दि.२९) दुपारी १२.३० वाजता सेवासदन प्रशालेजवळील ड्रीम पॅलेस येथे होणार असल्याची माहिती भाजपाचे माजी शहर अध्यक्ष आणि संयोजक नरेंद्र काळे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.



महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते आणि आमदार गोपीचंद पडळकर, पद्मश्री डॉ. खा. विकास महात्मे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती देशभर मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे. त्यानिमित्त सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील विविध पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव मंडळांनाही मोठ्या थाटामाटात जयंती साजरी करता यावी याकरिता पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पूर्णाकृती मूर्तीचे वाटप करण्यात येणार असल्याचे संयोजक नरेंद्र काळे यांनी सांगितले. त्याचबरोबर ३०० व्या जयंतीनिमित्त वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचेही ते म्हणाले. या पत्रकार परिषदेस प्रा. देवेंद्र मदने, प्रा. सिद्धेश्वर बेडगनूर, राजकुमार पाटील, संजय कणके, राम वाकसे, सुनील खटके, विनोद मोटे, राज बंडगर, अमर दुधाळ, सुरेश सुलतानपुरे, अभिषेक भाईकट्टी, संदीप कुलकर्णी उपस्थित होते.

मूर्तीसाठी नाव नोंदणी केलेल्या शहर जिल्ह्यातील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव मंडळांनी वाजत गाजत, ढोल ताशांच्या गजरात मूर्ती वाटप कार्यक्रमास उपस्थित रहावे. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव मंडळांना मूर्तीसोबत बेलभंडार हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे चरित्रही भेट देण्यात येणार आहे, असेही नरेंद्र काळे यांनी सांगितले.

# शाळेच्या पहिल्या दिवशी पाठ्यपुस्तकांचे वितरण

### ४ लाख 31 हजार ५९१ पाठ्यपुस्तके प्राप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ मे-**

नवीन शैक्षणिक वर्षासाठी बालभारती पोर्टलवर सोलापूर शहरातील खाजगी अनुदानित आणि सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी महापालिकेच्या वतीने एकूण ४,३१,५९१ पाठ्यपुस्तकांची मागणी करण्यात आली होती. सदरची पुस्तके प्राप्त झाली आहेत. महापालिका प्रशासनाच्या मनपा शाळा क्रमांक सहा येथे सदरची पुस्तके उतरवण्यात आली आहेत. मात्र यंदाच्या वर्षी इयत्ता पहिलीपासून नवीन अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने पहिलीच्या नव्या अभ्यासक्रमानुसार ४७,०४९ पुस्तकांचा पुरवठा लवकरच केला जाणार आहे. अशा पद्धतीने इयत्ता पहिली पासून ते आठवीपर्यंतची मोफत पाठ्यपुस्तके जूनच्या पहिल्या आठवड्यात संबंधित शाळेच्या शिक्षकांना वितरित करण्यात येणार आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेचे पहिल्या दिवशीच हे पुस्तके वाटप होतील असे नियोजन करण्यात आले आहे

दरम्यान, दरवर्षी प्रशासनाच्या वतीने शहरातील खाजगी अनुदानित तसेच महापालिका व झेडपी अशा सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तकांची योजना राबवली जाते. सदरच्या योजनेमध्ये मराठी, उर्दू, कन्नड, तेलगू, हिंदी, इंग्रजी अशा माध्यमांची पुस्तके मागविली जातात. इयत्ता पहिलीपासून ते इयत्ता आठवी पर्यंतची पुस्तके शासनाकडून प्राप्त होत असतात. मे महिन्यामध्ये सदरचा अहवाल बालभारतीकडे पाठवण्यात आला होता. यासंबंधी बालभारतीने बैठक आयोजित केली होती. या बैठकीनंतर सदरची पाठ्यपुस्तके वितरीत करण्यात आली आहेत. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन अभ्यासक्रम चालू शैक्षणिक वर्षात राबवण्यात येणार आहे. राज्यातील विद्यार्थ्यांसाठी (सी.बी.एस.सी) केंद्रीय अभ्यासक्रम पद्धती या शैक्षणिक वर्षात लागू करण्यात येणार आहे. त्यासंबंधी देखील पाठ्यपुस्तकांचे कामकाज सुरू आहे. असे देखील यावेळी सांगण्यात आले आहे.



**सोलापूर : महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक सहा येथे शासनाची मोफत पाठ्यपुस्तके उतरवण्यात आली आहेत. लवकरच शाळेच्या शिक्षकांकडे ही पुस्तके वितरित केली जाणार आहेत.**

### नव्या अभ्यासक्रमानुसार पहिलीच्या ४७ हजार ४९ पुस्तकांचा होणार पुरवठा

सोलापूर शहरातील मनपा अखत्यारीत येणाऱ्या खाजगी अनुदानित व सरकारी शाळेतील विविध माध्यमांच्या एकूण ७२,६७० इतक्या विद्यार्थ्यांसाठी ४,३१,५९१ पुस्तकांच्याप्रती प्राप्त झालेल्या आहेत. उर्वरित ४७,०४९ पाठ्यपुस्तके जूनच्या आठवड्यात प्राप्त होणार आहेत. सदरची पुस्तके जून मध्ये संबंधित शाळेच्या शिक्षकांना वितरित केली जातील. शिक्षक पहिल्या दिवशी शाळेतील विद्यार्थ्यांना हे पुस्तके वाटप करतील. राज्यात नवीन अभ्यासक्रमानुसार इयत्ता पहिलीचा अभ्यासक्रम बदलण्यात आल्याने, पहिलीची पाठ्यपुस्तके वितरणासंबंधी पुढील माहिती प्राप्त होणार आहे.

**- रियाज आत्तार, समन्वयक बालभारती**

| | |
|---|---|
| पाठ्यपुस्तक मागणी | ४,३१,५९१ |
| प्राप्त पाठ्यपुस्तक | ३,८४,५४२ |
| अप्राप्त पाठ्यपुस्तक | ४७,०४९ |

### पाठ्यपुस्तक पुरवठा ८९.१०%

मनपा सोलापूर सन २०२५-२६ शैक्षणिक वर्षासाठी शासनाकडून मनपा स्तरावर इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतची मोफत प्राप्त झालेली आहे. पैकी ८९.१० टक्के पाठ्यपुस्तकांची पुरवठा झाला आहे.

## इलेक्ट्रिक मोटारसायकली न देता ३ लाखांची फसवणूक

### क्रॉस मार्क एसऍपलिंग कंपनीविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ मे -**

इलेक्ट्रिक मोटारसायकली न देता ३ लाखांची फसवणूक करणाऱ्या पुण्याच्या क्रॉस मार्क एसऍपलिंग कंपनीच्या मालकाविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत क्षितीज भगवान नाईक (वय ३५, रा. दमाणी नगर, रूक्मिणी बंगला, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन क्रॉस मार्क एसऍपलिंग कंपनीचा मालक सत्यनारायण सत्यपत्री (रा. पुणे) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सन २०१९ मध्ये क्षितीज नाईक याने क्रॉस मार्क एसऍपलिंग कंपनी ची वेबसाईट पाहिली होती. या वेबसाईटवर कंपनीमार्फत इलेक्ट्रिक मोटारसायकलचे फोटो ठेऊन होलसेल विक्रि करीत असल्याबाबत सांगण्यात आले होते. त्यामुळे नाईक याने त्यास न्युऑन मॉडेलच्या ४ इलेक्ट्रिक मोटारसायकल आणि २ स्पेक्ट्रा इलेक्ट्रिक मोटारसायकल विक्रि करीता मागणी केली होती. त्यावेळी कंपनीचा मालक सत्यनारायण सत्यपत्री याने ाईकयास मोटारसायकल देतो असे सांगून त्या मोबदल्यात त्याच्या स्टेट बँक ऑफ इंडिया, सदाशिव पेठ, पुणे या बँकेतील अकौंटमध्ये पैसे पाठविण्यास सांगितले.




त्यानुसार नाईक यांनी त्यांच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया च्या खात्यातून आरटीजीएसद्वारे ३ लाख १७ हजार ३६ रुपये रक्कम पाठविले. पैसे देऊन अनेक वर्षे झाली तरी सत्यपत्री याच्याकडून इलेक्ट्रिक मोटारसायकली पाठविण्यात आल्या नाहीत. त्यामुळे आपली फसवणुक झाल्याबाबतची तक्रार नाईक याने विजापूर नाका पोलिस ठाण्यात दाखल केली आहे. पोलिस हवालदार साळुंखे पुढील तपास करीत आहेत.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११२९

**कोणाही जीवाचा न घडावा मत्सर । वर्म सर्वेश्वर-पुजनाचें ।।**

माणूस जेव्हा दुसऱ्या जिवाचा मत्सर करतो तेव्हा अतिप्रसंग घडू शकतात. कोणी कोणाचा मत्सरच करीत नसेल तर आत्महत्या, हुंडाबळी, खून, बलात्कार असे प्रकार घडणारच नाहीत. पण असे प्रकार आपणाला पहायला, ऐकायला मिळतात. याचाच अर्थ असा आहे की, माणूस माणसाचा मत्सर करीत आहे. मुखात भगवंताचे नाम घेणारे, पूजा-पाठ करणारेही काही लोक मत्सरापासून दूर असत नाहीत. कांही लोक सोडले तर मत्सर करणाऱ्यांची स्पर्धाच लागल्याचे आपल्या निदर्शनास येते. मत्सर हा समाजाच्या आणि व्यक्तीच्या अधोगतीचे मूळ कारण आहे, याची जाण जवळपास सर्वांना असते. तरीपण स्वार्थ, अहंकारापोटी आणि स्वत:च निर्माण केलेल्या मी ला जोपासण्यासाठी माणूस मत्सराची ही मालिका चालूच ठेवतो. मत्सर हा ज्याचा केला जातो त्याच्यासाठीच वाईट आहे असे नाही तर जो मत्सर करतो त्याच्यासाठीही तो वाईटच आहे. मानवतेला कलंकित करणाऱ्या या मत्सराला वैष्णवांकडे मुळीच स्थान नसते. वैष्णवांप्रमाणे इतरांनीही मत्सराला नष्ट केले पाहिजे. आपल्याकडून कोणत्याही जिवाचा मत्सर न घडणे हेच सर्वेश्वर पूजनाचे खरे वर्म आहे. हे स्पष्ट करताना महाराज म्हणतात, कोणाही जीवाचा न घडावा मत्सर ।वर्म सर्वेश्वर-पुजनाचे ।।



ईश्वरभक्ती म्हणजे दुसरे-तिसरे कांही नसून प्राणीम त्रांबदलचा जिव्हाळा, आपुलकी, प्रेम हेच होय. प्राणीमात्रांची सेवा करणाऱ्याला ईश्वरभक्तीसाठी वेगळे कांही करावे लागत नाही. मत्सराची भावना मनात ठेवून भक्ती करणाऱ्याला कांहीही साध्य होत नाही. कितीही मोठा दान-धर्म घडवून आणला आणि मत्सराची भावना जोपासली तरी हे सर्व व्यर्थ जाते. मत्सर आहे तेथे भगवंत असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मूळात भगवंत ही प्रेमाची, वात्सल्याची मूर्ती असल्याने मत्सराला तिथे स्थानच नाही. लोकांचे लुबाडून किंवा लोकांची फसवणूक करुन मिळविलेले धन-धान्य ईश्वरभक्तीत अर्थहीन आहे. असा धन-धान्यापेक्षा केवळ चांगली भावना जोपासली तरी पुरेसे आहे. संत-महात्म्यांचा इतिहास डोळ्यासमोर आणला तर आपल्या लक्षात येते की, त्यांनी सर्व प्राणीमात्रांवर प्रेम केले आहे. नाथ महाराजांनी तहानलेल्या गाढवाला पाणी पाजले, नामदेवांनी भगवंतासाठी तयार केलेला प्रसाद भुकेल्या कुत्र्याला खावू घातला. आपल्या कृतीतून जवळपास सर्वच संतांनी सर्व जिवात भगवंताला पाहून त्यांच्यावर प्रेम केले. आपणालाही संतांप्रमाणे प्राणीमात्रांवर प्रेम करावे लागणार आहे. प्रेम हाच मानवतेच्या जीवनाचा आधारस्तंभ असल्याने हा आधारस्तंभ आपणाला मजबूत करावा लागणार आहे. पती-पत्नीतील मत्सर, सासू-सुनेतील मत्सर, आई-मुलांतील मत्सर, कुटुंबातील सदस्यांचा एकमेकांबदलचा मत्सर, शेजाऱ्यांचा मत्सर हे सर्व नष्ट करावे लागणार आहे. मनात थोडासाही मत्सर बाळगुन वागणे म्हणजे पंचपकान्नात विष कालवल्यासारखे आहे. थोडेसे विषही मारकच असते. त्याप्रमाणे थोडा मत्सरही दु:खदायी आहे. ज्ञानोबा-तुकोबा आदी संतांच्या भक्तांकडे मत्सर नसतोच आणि तो किंचितही तो मत्सर नसलाच पाहीजे, याचा विसर पडू नये. मत्सर नसणे म्हणजे आनंदलहरी वाढण्याचा मार्ग मोकळा करणे होय.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. २८ मे २०२५ | स्वा. सावरकर जयंती |
| विक्रम संवत् २०८१ | चंद्रदर्शन |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - ज्येष्ठ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. द्वितीया (२५.५४) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - मृग (२४.२९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - धृति (१९.०८) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (१५.२५) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा म ध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**वृषभ** : मुलांनी केलेल्या कामांम ळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक काम ासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**मिथुन**: व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मि ळण्याची शक्यता.

**कर्क**: अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरुवात कराल.

**सिंह** : व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धाम ळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद होईल.

**कन्या** : कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. काम काजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

**तुळ** : आवश्यक कामांसाठी पुरे वेळ द्याल. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.

**वृश्चिक** : अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु** : योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहाराम ळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर** : फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मि ळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ** : मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन**: कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. आपल्या बोलण्यावर

# अंगणवाड्यांसाठी फायबर शौचालयाची सुविधा

## जिल्ह्यातील २७२ अंगणवाडीतील चिमुकल्यांची होणार सोय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत जिल्ह्यातील २७२ अंगणवाड्यांना फायबरची रेडीमेड शौचालये मंजूर झाली आहेत. ही शौचालये बांधकाम करण्यासाठी जागा नसलेल्या अंगणवाड्यांना दिली जाणार आहेत. त्यामुळे आता जागा नसलेल्या अंगणवाड्यांनाही शौचालये मिळणार आहेत. त्यामुळे चिमुकल्यांची सोय होणार आहे.

जिल्ह्यात ४ हजार १२२ अंगणवाड्या आहेत. त्यातील बऱ्याच अंगणवाड्यांना शौचालये बांधकाम करण्यासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने शौचालये बांधकाम करण्यास अडचणी येत आहेत. त्यामुळे एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत कमी जागेत बसणारे रेडिमेड शौचालये अंगणवाड्यांना देण्यात येते आहेत. जिल्ह्यातील अंगणवाडीतील विद्यार्थी हे उघड्यावर शौचालयास जात असल्याने प्रत्येक अंगणवाड्यांना शौचालये देण्यासाठी शासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. येत्या काही महिन्यात जिल्ह्यातील अंगणवाड्यांना आणखी शौचालये मिळणार आहेत.माळशिरस तालुक्याला सर्वाधिक ५७ शौचालये मिळणार आहेत.



अक्कलकोट - १२, बार्शी १४, वैराग ६, करमाळा - १८, माढा -१५, टेंभुर्णी - ४, माळशिरस ५७, अकलूज ११, मोहोळ - १९, मंगळवेढा - १५, उत्तर सोलापूर-११, पंढरपूर - १८, सांगोला - २५, कोळा - १८, दक्षिण सोलापूर २९, एकूण - २७२

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत जिल्ह्यातील २७२ अंगणवाड्यांना फायबरची रेडिमेड शौचालये मंजूर झाली आहेत. त्याचे वाटप जुलै अखेरपर्यंत करण्यात येणार आहे. शौचालयासाठी जागा नसल्याने रेडिमेड शौचालयांची व्यवस्था केली आहे. **- प्रसाद मिरकले,** जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बालकल्याण विभाग

### जागेअभावी शौचालय सुविधा

अनेक अंगणवाड्यांना जागा उपलब्ध नसल्याने इमारत बाधकाम प्रलंबित आहेत. बांधकाम पूर्ण झालेल्या अंगणवाड्यांना शौचालय नसल्याने चिमुकले उघड्यावर शौचास जात होते. त्यामुळे अनेक वेळा रस्ता अपघात झाले आहेत. त्यामुळे कमी जागेत फायबर शौचालय सुविधामुळे स्वच्छता राखणार आहे. **- श्रीकांत भरले,** पालक, हत्तूर



## जवाहरलाल नेहरू व रमाबाई आंबेडकर यांच्या स्मृतिदिनी अभिवादन

**सोलापूर, दि. २७ मे-**

सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने, स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी नेते, देशाचे पहिले पंतप्रधान, आधुनिक भारताचे शिल्पकार भारतरत्न पंडित जवाहरलाल नेहरू व त्यागमूर्ती माता रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त काँग्रेस भवन येथे त्यांच्या प्रतिमेस शहर अध्यक्ष चेतन नरोटे, महिला अध्यक्षा प्रमि ला तुपलवंडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी नगरसेवक विनोद भोसले, गणेश डोंगरे, भीमाशंकर टेकाळे, तिरुपती परकीपंडला, लखन गायकवाड, बसवराज म्हेत्रे, हारूण शेख, रामसिंग आंबेवाले, श्रीशैल रणधीरे, सुमन जाधव, ज्योती गायकवाड, मेघश्याम गौडा, रफिक चकोले, विवेक कन्ना, भीमराव शिंदे, शिवाजी साळुंखे, जितू वाडेकर, मुमताज तांबोळी, शुभांगी लिंगराज, हाजी मेहमूद शेख, अभिलाष अच्युगटला, चंद्रकला निजमल्लू, मार्ता रावडे उपस्थित होते.

### काम करताना मजूर जखमी

**सोलापूर -** चिंचोळी एमआयडीसी येथील एका कंपनीत काम करताना सोमवारी रात्री ११.३० च्या सुमारास उजव्या हाताला जखम झाल्याने त्याला शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. नितीन मोहन माने (वय ३७, रा. संतोष नगर, बाळे) असे जखमी कामगाराचे नाव आहे. नितीन हा सोमवारी रात्री एमआयडीसीतील एका कंपनीत काम करत होता. काम करताना अचानक तो हाताला मार लागून जखमी झाला. यात त्याला त्रास होऊ लागल्याने रात्री १.१० वाजता विलास सावंत याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## एसटी महामंडळाकडे इलेक्ट्रिक बससाठी प्रस्ताव

### प्रवाशांना आरामदायक व जलदगतीच्या प्रवासासाठी राहणार प्राधान्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

सोलापूर येथील आगारासाठी १५० लेक्ट्रिक बसेस मिळाव्यात असा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला आहे. सध्या येथील आगारात दोन टप्यात आलेल्या २३ बसेस या विविध रस्त्यांवरून धावत असल्याची माहिती विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांनी दिली.

दरम्यान, आगारातील प्रवाशी वाहतूक व्यवस्थेचा विचार करून एसटीच्या कार्यालयाला वाढीव इलेक्ट्रिक बसेसच्या मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. सोलापूर आगारावरून तुळजापूर, अक्कलकोट, गाणगापूर व पंढरपूर या धार्मिक तीर्थक्षेत्रांसह कर्नाटकातील विजयपूरचे गोलघुम ट सारख्या पुरातन ऐतिहासीक वास्तूला भेट देणाऱ्या प्रवाशांची संख्याही लक्षणीय आहे. शिवाय, येथून मराठवाडा व विदर्भातही जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. तसेच विदर्भ, मराठवाड्यातून तळकोकणात जाणारेही प्रवाशी आहेत. आगामी काळात परिवहन महामंडळाच्या ताफ्यात नवीन इलेक्ट्रिक बसेस येऊ घातल्या आहेत. म्हणूनच १५० बसेसचा प्रस्ताव महामंडळाकडे सादर केल्याचेही त्यांनी सांगितले.

### जुन्या बसेस चिंचोली एमआयडीसी येथील एसटी महामंडळाच्या जागेत स्थलांतरित करणार

सध्या सोलापूर विभागातील अनेक एसटी बसेस भंगार अवस्थेत आहेत. यामध्ये शिवशाही बसेसचा देखील समावेश आहे. अत्यंत मोडकळीस अवस्थेत आलेल्या बसेस या पूर्णतः स्क्रॅप करून त्या एसटी महामंडळाच्या चिंचोली एमआयडीसी येथील जागेत स्थलांतरित करण्यात येणार आहेत. तर काही शिवशाही बसेसचे रूपांतर साध्या एसटी मध्ये करण्यात येणार आहे. त्यामध्ये आरामदायक सीट लावण्याने प्रवाशांना लांबचा प्रवास आरामदायक करता येणार आहे.

## मंगरुळकरांनी आपली सेवा निष्ठेने केली

### मेट्रन डॉ. राजश्री कोरके; सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ मे-**

इन्चार्ज सिस्टर सुधा मंगरुळकर यांनी आपली ड्युटी संपूर्ण सेवा निष्ठेने यशस्वीपणे पार पाडली, असे मत मेट्रन डॉ. राजश्री कोरके यांनी मांडले. श्री छ. शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयातील इन्चार्ज सिस्टर व कवयित्री सुधा विनायकराव मंगरुळकर यांच्या छत्तीस वर्षाच्या प्रदिर्घ सेवेनंतरच्या सेवानिवृत्ती समारंभाच्या अध्यक्ष पदावरुन त्यांनी मार्गदर्शन करताना आपले मत व्यक्त केले.

प्रमुख अतिथी म्हणून कवियत्री देवेंद्र औटी, नर्सिंग कॉलेजच्या प्रिन्सिपॉल डॉ. मनिषा शिंदे, बालरोगतज्ज्ञ डॉ. सचिन बंदिछोडे, बालरोगतज्ज्ञ डॉ. सुदर्शन चक्रे,



जिल्हाप्रेत शल्यचिकीत्सक अधिकारी डॉ. नवीन जीवने, माजी मेट्रन सुनंदा शेळके,प्रा.माधव कुलकर्णी उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व सद्‌गुरू प्रतिमा पुजन करण्यात आले. अतिथींचे स्वागत रोप देऊन मयुरी मंगरुळकर, माधुरी मंगरुळकर यांनी केले. प्रमुख अतिथींसह माजी मेट्रन सुनंदा शेळके, निवृत्त मंगरुळे सिस्टर, मैंदर्गीकर, संध्या गावडे, आशा वाघमोडे, सतीश कोळेकर, स्वाती सोनार, कुमुदिनी वेदपाठक,प्रमोद वेदपाठक, माधव मैंदर्गीकर,विकास लिंगराज यांनी मनोगतातून शुभेच्छा दिल्या. मंगरुळकर सिस्टर यांच्या काव्यसंग्रहास प्रस्तावना दिलेल्या ज्येष्ठ कवियत्री देवेंद्र औटी यांनी केलेल्या सूत्रसंचालनाने उपस्थितांचे डोळे पाणावले होते. आभार मयुरी मंगरुळकर यांनी मानले.

## दयानंद शिक्षण संस्था, रोटरी क्लबतर्फे ४ जून रोजी मुलाखत कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

दयानंद शिक्षण संस्थाअंतर्गत असलेल्या डी. पी. बी दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय व रोटरी क्लब ऑफ सोलापूर प्राईड यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. ४ जून २०२५ रोजी मुलाखतीबाबत कार्यशाळा आयोजित केली आहे, अशी माहिती डी. पी. बी. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बुधवार दि. ४ जून रोजी दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय येथे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेमध्ये मुलाखतीची तयारी या विषयावर कार्यशाळा आयोजित केली आहे. कार्यशाळेमध्ये जाहिरातीनंतर अर्ज कसा करायचा, बायोडेटा कसा तयार करायचा, मुलाखतीच्या अगोदर काय काय तयारी करायची, मुलाखतीच्या आदल्या दिवशी काय काय तयारी करायची, मुलाखतीच्या दिवशी कोण कोणती तयारी करायची, उत्तम मुलाखतीची लक्षणे कोणती, मुलाखतीमध्ये विविध कोण कोणत्या प्रकारचे प्रश्न विचारले जातात व त्यांची उत्तरे कशी अपेक्षित असतात. नोकरीत रुजू झाल्यानंतर कोणकोणत्या बाबींची व दक्षता कशी घ्यायची यावर मार्गदर्शन केले जाणार आहे. मुलाखत कशी घ्यायची आणि मुलाखत कशी द्यायची याची तयारीही करून घेतली जाणार आहे.

ही कार्यशाळा ही शैक्षणिक संस्था व इतर विविध ठिकाणी व विविध पदावर मुलाखत देणाऱ्या व मुलाखत घेऊ इच्छिणाऱ्या सर्वांसाठी उपयुक्त असणार आहे. या कार्यशाळेमध्ये मॉक इंटरव्यू (अभिरूप मुलाखत) घेण्याचे प्रयोजन केलेले आहे. ही कार्यशाळा सशुल्क असून अधिक माहितीसाठी एम. एम. कणसे (मो.९८२२८०२६७२) गायत्री लिगाडे (मो.९९२३२४००२४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेला प्रभारी प्राचार्य डॉ. बी. एच. दामजी, अतुल चव्हाण, उदय शिंदे, राहुल चंडक उपस्थित होते.

### ९ जून रोजी जॉब फेअर कॅम्पस इंटरव्ह्यू

या उपक्रमांतर्गत सोमवार दि. ९ जून रोजी डी.पी.बी. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय येथे सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत जॉब फेअर कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शहरातील विविध शाळा व संस्था सहभागी होणार आहेत. विविध पदे भरण्यासाठी या उपक्रमाच्या माध्यमातून मोठी संधी उपलब्ध होणार आहे, अशी माहितीही प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर यांनी दिली.

## कामगार संघटना महासंघाचे गुरुवारी रास्ता रोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

बांधकाम कामगारांना अनुदान मिळाले पाहिजे यासह विविध प्रलंबित मागण्यांची पूर्तता केली जात नाही. यामुळे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी राजीनामा द्यावा. या मागणीसाठी कामगार संघटना महासंघाच्या वतीने गुरुवार दि. २९ मे रोजी सोलापूर जिल्हा परिषद चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे, असा इशारा अध्यक्ष साथी बशीर अहमद यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच, सेफ्टी किटचे वाटप सप्टेंबर २०२४ पासून बंद आहे. ते वाटप सुरू करावे या मागणीसाठी गेल्या आठ महिन्यापासून कामगार संघटना महासंघाच्या वतीने कामगार मंत्री, प्रधान सचिव, आयुक्त, सचिव यांच्याकडे पाठपुरावा सुरू आहे मात्र तरीही दखल घेतली जात नाही. सोलापूर शहरात दोन ठिकाणी साहित्याचे वाटप करण्यात येत आहे याची माहिती कामगार आयुक्तांना नाही. ठेकेदार बदलण्याची माहिती आयुक्तांना नाही. ही गंभीर बाब आहे, असा आरोप बशीर अहमद यांनी यावेळी केला. या पत्रकार परिषदेस सिद्धार्थ बोराडे, अश्फाक शेख, शिवाजी कांबळे, एजाज शेख, रफिक हणगी, रियाज शेख उपस्थित होते.



## ढोर समाजाने संघटीत होवून विकास साधला पाहिजे : ज्ञानराज चौगुले

### समाजाअंतर्गत जनगणना करण्यासाठी समिती स्थापन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

गेल्या अनेकवर्षापासून ढोर समाज कातडी कमावणे हा पारंपारिक व्यवसाय करत असताना सवर्णांकडून समाजाला अस्पृश्य केले होते. अनेक अन्याय अत्याचार सहन करणारा ढोर समाज एकत्र येवून संघटीत झाला पाहिजे आणि बदलत्या काळानुसार आपली प्रगती साधली पाहिजे, असे प्रतिपादन उमरगा तालुक्याचे माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी केले.

हॉटेल सूर्या इंटरनॅशलमध्ये महाराष्ट्र राज्य ढोर समाज कृतीशील कार्यकर्ता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वीज मंडळाचे निवृत्त मुख्यअभियंता लक्ष्मीदास सोनकवडे होते. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे सोलापूर शहर अध्यक्ष सुधीर खरटमल यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच कक्र्या महासंघाचे उपाध्यक्ष ॲड. जांबुवंतराव सोनकवडे, डॉ. पीपी पोळ,डॉ. दिनेश कदम, डॉ. रायप्पा कटके, पुंडलिक खरटमोल,लक्ष्मण होटकर, अनिल पोळ, मुकुंद सोनटक्के, किशोर कवडे, गणेश नारायणकर, सुरेश व्हटकर, राहुल सोनवणे, प्रकाश व्हटकर तसेच राज्यातील विविध जिल्ह्यातून समाज बांधवांनी सहभाग घेतला होता. यावेळी सुधीर खरटमल यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषण लक्ष्मीदास सोनकवडे यांनी केले.आगामी काळातील जात वर्गीकरणामध्ये ढोर समाजाची काय भुमिका असावी याबाबत मुंबईहून आलेले तज्ञ रविंद्र शिंदे यांनी माहिती दिली.

वर्ग एक, वर्ग दोन पासून न्यायाधीश या पदावर आजही एससीएसटीच्या जागेवर खुल्या वर्गातील लोकांना स्थान दिले जाते. असे मत जांबुवंतराव सोनकवडे यांनी मांडले. तर पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य ठरवलेल्या जातीत जंगम ासारखे स्पृश्य जातीला अनुसुचित जातीत स्थान देवून अस्पृश्य सम ाजाचे नैसर्गिक न्याय हक्क डावलून अन्यायाने आरक्षणाचे फायदे लाटले जात आहेत. यासाठी सर्वांनी एकत्र येवून संघर्ष केला पाहिजे असे पी.पी. पोळ यांनी सांगितले. ढोर समाजाचे अखिल भारतीय स्तरावर सर्व्हे क्षण होवून जनगणना कशी करावी याबाबत माहिती तंत्रज्ञान अभियंता ओंकार व्हटकर यांनी सांगितले. प्रारंभी सच्चिदानंद व्हटकर आणि ॲड. विद्या कटकधोंड यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन अशोक सदाफुले यांनी केले.तर आभार राजेश कटकधोंड यांनी व्यक्त केले. कार्यशाळेत साहित्यिक बाबुराव इंगळे, विनायक होटकर, सुनिल व्हटकर, तिप्पण्णा इंगळे, मुन्ना कटके, विनोद होटकर, जितेंद्र होटकर, सागर नारायणकर, सुरेश कावळे, श्रीगणेश शिंदे यांनी चर्चेच्या माध्यमातून सहभाग नोंदवला.


## धनगर समाजातील सर्वांनी एकसंघ व्हावे

### प्रा.डॉ.यशपाल भिंगे यांचे वधू-वर मेळाव्यात आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे-**

धनगर समाजात शाखा-उपशाखा आहेत. त्या सोडून देऊन आपण सगळे एकच आहोत ही भावना बाळगा. धनगर म्हणून आपण सर्वजण एकसंघ आहोत हीच आपली ओळख असायला हवी, अशी अपेक्षा प्रा. डॉ.यशपाल भिंगे यांनी व्यक्त करून समाजातील शाखा- उपशाखांनी एकसंघ होण्याचे आवाहन केले.

विजापूर रोड येथील सुंदर मल्टीपर्पज हॉल सभागृहात राजमाता सामाजिक प्रतिष्ठान तर्फे रविवार (दि.२५) नववा वधू-वर पालक परिचय मेळावा झाला. या मेळाव्यास डॉ. भिंगे हे मार्गदर्शन करत होते. यावेळी मंचावर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र नागणकेरी, शिवसेना सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख मा.अनिल कोकीळ, शिवसेना सोलापूर जिल्हा प्रमुख मा.प्रा.डॉ. अजय दासरी, दिव्यांग मंत्रालय चे आयुक्त विजय म्हस्के, कार्याध्यक्ष डॉ.रामचंद्र धर्मसाले, उपाध्यक्ष चंद्रकांत धालपे आदी उपस्थित होते. वधू-वर मेळाव्यामध्ये सुमारे १२०० ही पेक्षा पालक व विवाहेच्छुक वधू व वरांची उपस्थिती होती. कार्यक्रमात पालकांनी आपल्या मुला-मुलींचा बायोडाटा वाचून दाखवून परिचय करुन दिला. कार्यक्रम सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत सुरु होता. मेळाव्यास सोलापूर जिल्ह्यासह शेजारच्या जिल्ह्यातील कर्नाटक येथूनही पालकांनी हजेरी लावली. यावेळी प्रा. डॉ. वासंती पांढरे, श्रीकांत मिरगाळे,सुहास गडदे, भाऊसाहेब चोरमले, अशोक नरोटे, पांडुरंग गोफणे, निरंजन कागे, सदाशिव व्हनमाने, सचिन लांडगे, संजय बनसोडे,दिलावर शेख, स्वामी, गुरव उपस्थित होते.



## महत्वाचे...



## दहावीतील यशाबद्दल अक्षरा श्रीश्रीमाळ हिचा सत्कार

**बार्शी, दि.२७ मे-**

अक्षरा श्रीश्रीमाळ हिने दहावीच्या परीक्षेत ९७ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवल्यामुळे सोलापूर सिध्देश्वर बँकेचे संचालक बाळासाहेब आडके तसेच शिवप्रभा सहकारी पतसंस्थेचे मार्गदर्शक यांच्या मुख्य उपस्थितीत तिचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिवप्रभा पतसंस्थेचे सर्व नूतन संचालक, अध्यक्ष दिनेश स्वामी, उपाध्यक्ष डॉ.भुजबळ, संचालक रवींद्र मेनकुदळे, राजाभाऊ झाडबुके, अनिरुद्ध चाटी, ड. सचिन शेटे, सुरेखा कोरे गाडवे, सौ प्रभावती बेणे, ॲड. मोहन ठोकळे, नागनाथ लामतुरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सर्वांनी अक्षरा श्रीश्रीमाळ हिचे कौतुक करत पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

## बणजगोळमध्ये संभाजी महाराजांची जयंती साजरी



**अक्कलकोट, दि. २७ मे-**

अक्कलकोट तालुक्यातील बणजगोळमध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. बणजगोळ या गावी सालाबादप्रमाणे यावर्षी देखील रामभाऊ मातोळे यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी व्याख्यान भारूड, कीर्तन, पोवाडा स्पर्धा व जयंती मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक दरम्यान मंडळाचे संस्थापक अध्यक्ष दत्ता मातोळे, सरपंच गडेप्पा व्हसुरे, अध्यक्ष प्रताप घाटगे, उपाध्यक्ष सुदर्शन शिंदे, मार्गदर्शक नाना चव्हाण, तंटामुक्ती अध्यक्ष मल्लिनाथ पाटील, सचिन मचाले, महादेव मुळे, श्रीशैल पाटील, विठ्ठल पाटील, मुतप्पा गुरव, पापा मोरे, सुरेश तळवार, श्रीशैल पेडसंगे, श्रीकांत शिंदे, माणिक चव्हाण, सुहास मातोळे, दादा शिंदे, प्रसाद मातोळे, राहुल मातोळे, सागर मातोळे, नियोजन समिती तानाजी मोरे, विकास मातोळे, मंगेश चव्हाण, तुषार शिंदे, अतुल शिंदे, दादा मोरे, अरुण कुंभार, महेश जगताप, अमोल शिंदे, प्रवीण गड्डे, विनायक राघोजी, रोहित मातोळे, विशाल मातोळे, नंदकिशोर चव्हाण, किरण कुंभार, उमेश कुंभार, महादेव चव्हाण, बंडू शिंदे उपस्थित होते. मंडळाचे आयोजक स्वप्नील पाटील यांनी आभार व्यक्त केले.



## माढ्यात शेतीचे पावसाने नुकसान; पंचनाम्याची भाजपाची मागणी

**मोडनिंब, दि.२७ मे-**

मागील दहा ते बारा दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे माढा तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसानाचे त्वरित पंचनामे करून त्यांना भरपाई देण्यात यावी अशी मागणी भारतीय जनता पार्टी माढा तालुक्याच्या वतीने तहसीलदार शिल्पा ठोकडे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या द्राक्ष, डाळिंब, केळी, पेरू, उन्हाळी कांदा यासह विविध फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. फळबागा, पालेभाज्या, घरांची पडझड तसेच जनावरांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे जगणे कठीण झाले आहे. तसेच काही ठिकाणी घरांची पडझड झाली असून पशुधनाचेही मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी तालुकाध्यक्ष योगेश पाटील यांनी केली.यावेळी ज्येष्ठ नेते प्रकाश कुलकर्णी, माया माने, शंकर मुळूक, किसान मोर्चाचे नंदकुमार मोरे, विवेक कुंभेजकर, संध्या कुंभेजकर, पांडुरंग राऊत, बिरुदेव शेळके, बालाजी माळी, प्रमोद रोटे, लाला झाडे, मेजर लेंडवे, सोमनाथ वाघमारे, नावजी अनवुले, अर्जुन माने, लखन पवार, अमोल देशमुख आदी पदाधिकारी उपस्थित होते.



## माध्यमिक पतसंस्थेच्या वतीने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान

**अक्कलकोट, दि. २७ मे-**

सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था बाळे सोलापूर वतीने बाळे पतसंस्थेचे सभासद असलेले जिल्ह्यातील सेवानिवृत्त ७० सभासदांना पतसंस्थेचे मार्गदर्शक पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. बाळे पतसंस्थेचे अध्यक्ष राजेंद्र माळी यांच्या अध्यक्षतेखाली श्री स्वामी समर्थ मंदिर, भक्तनिवास हॉल, अक्कलकोट येथे हा सत्कार सोहळा संपन्न झाला. व्यासपीठावर उपाध्यक्षा विद्या पाटील, समाधान घाडगे, सुरेश गुंड, नामदेव आलदर, संभाजी चव्हाण, शिवाजी थिटे, कैलास देशमुख, दत्तात्रय कदम, सुप्रिया पांगळ, सुभाष भिमनवरु, शंकर वडने, परमेश्वर व्हसुरे, गुरुनाथ वांगीकर, राजेंद आसबे, राजशेखर चौधरी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंडित मोरे, श्रीशैल म्हमाणे, रामलिंग मंजुळकर, वाहिद पटेल, खादिरबाषा शेख, सिद्धाराम कुरे, गुरुप्रसाद पाटील, राजेंद्र मोरे, श्रीशैल निंबाळकर, श्यामकांत शिंदे, सुनील शिंदे, दिलीपकुमार बंदीछोडे बाळासाहेब बनसोडे वरदेटने सचिव चंद्रकांत भोसले, पतसंस्थेचे कर्मचारी तालुका कृती समितीचे पदाधिकारी व सदस्य यांनी परिश्रम घेतले.

# खरीप पेरणीसाठी आता बळीराजाची द्विधा अवस्था

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २७ मे-**

बार्शी तालुक्यामध्ये सर्वत्र आठवड्यापासून मध्यम व हलक्या पावसाच्या सरी पडत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये खरीप हंगामासाठी शेती म शागतीची लगभग सुरू झाली आहे. पाऊस लवकर आल्यामुळे मशागतीची नांगरट फणणे, उन्हाळी खरडा मारणे ही कामे राहिली होती. पण अचानक आणि चांगल्या प्रकारे पाऊस पडल्याने शेतकऱ्यांमध्ये उघडीप दिल्यानंतर मशागतीची कामे करण्यासाठी चढाओढ लागणार आहे. पिकांची पेरणी लवकर सुरू करावी का, याबाबत संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे.

पाऊस लवकर आला म्हणजे आपोआप शेतीची कामेही लवकर करायची असा समज असतो, पण हे नेहमी बरोबर ठरत नाही. लवकर आलेल्या पावसावर लगेच पेरणी केल्यास नंतर उघडीप आल्यास बियाणे सडण्याची किंवा उगवलेली रोपे वाळून जाण्याची शक्यता असते. त्यामुळे कृषी तज्ज्ञ आणि कृषी विभाग यांनी शेतकऱ्यांना योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात पावसाचे आगमन झाल्यावरच पेरणी करण्याचा सल्ला दिला आहे. शेतकरी बांधवांनी पेरणी करण्यापूर्वी काही गोष्टींचा नीट विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. लवकर पाऊस सुरू झाला तरी तो सातत्याने आणि पुरेसा प्रम णात पडेल याची खात्री असावी लागते. केवळ पहिल्या एक-दोन सरींवर विसंबून

### शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करु नये

शेतकऱ्यांनी कोणतीही घाई न करता, हवामान खात्याकडून मिळणाऱ्या स्थानिक पातळीवरील अंदाजावर विश्वास ठेवून आणि जमिनीतील ओल, पावसाचे प्रमाण याचा नीट विचार करूनच पेरणी करावी. तसेच, कृषी विभागाचे सल्लागार, कृषी सहाय्यक, तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करून स्थानिक हवामान व शेतातील स्थिती याच्या आधारे मार्गदर्शन घेणे फायद्याचे ठरेल. त्यामुळे मान्सूनचे आगमन लवकर झाले असले तरी त्यावर लगेच पेरणी करण्याचा निर्णय घेणे योग्य नाही. शेतकऱ्यांनी संयम ठेवून, सुसंगत विचार करून, हवामानाची सखोल माहिती घेत निर्णय घेतल्यास पीक उत्पादनात वाढ होईल आणि आर्थिक नफा मिळवणं शक्य होईल. योग्य नियोजन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने शेती अधिक फायदेशीर कशी बनवता येईल याकडे शेतकऱ्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे.



पेरणी केल्यास शेतीत आर्थिक तोटा होऊ शकतो. त्यामुळे खरीप पेरणी करण्यासाठी जमीन पुरेशी ओलसर असणे आणि सतत ७५ ते १०० मिमी इतका पाऊस पडलेला असणे गरजेचे आहे. शिवाय, जमिनीत पाणी साठून राहील इतकी आर्द्रता टिकून राहणेही आवश्यक आहे. जमिनीतील ओल नसेल, तर बियाणे उगम पावण्यात अडथळा निर्माण होतो, ज्यामुळे उगवण क्षमता कमी होते आणि पीक उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो. पेरणीपूर्वी शेतकऱ्यांनी आपली शेती मशागत करून ठेवावी. शेतात कुठले पीक घ्यायचे याचे नियोजन करून योग्य जातीची निवड करावी. उदा : लवकर पेरणी करायची असल्यास सोयाबीन, मूग, उडीद यासारख्या लवकर परिपक्व होणाऱ्या जातींचा विचार करावा. तसेच, लागवडीसाठी लागणारे बियाणे, खते, कीटकनाशके व इतर साधनसामुग्रीची तयारी आधीच करून ठेवावी. जर पावसाची सततची आणि सशक्त सुरुवात झाली तर लगेच लागवड करता येईल. पेरणी वेळेत झाल्यास पिकाला आवश्यक असलेले नत्र, स्फुरद, पालाश यांसारखी अन्नद्रव्येही योग्य प्रमाणात मिळतात आणि पिकाची वाढ चांगली होते. दुसरीकडे, जर लवकर पेरणी केल्यावर पुन्हा उघडीप आली तर त्या उगवलेल्या पिकाचे नुकसान होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे पिकांचे नुकसान टाळण्यासाठी पेरणी करण्याचा निर्णय हवामानाच्या स्थितीवर विचार करूनच घ्यावा.

## सोजर फार्मसीच्या ३० विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राइव्हमध्ये निवड

**बार्शी, दि. २७ मे-**

सोजर कॉलेज ऑफ फार्मसी, खांडवी येथील ३० विद्यार्थ्यांची बाराम ती, सांगोला आणि पंढरपूर येथील कॅम्पस ड्राइव्हमध्ये निवड झाली आहे. दि. ८ मे रोजी बारामती येथे आयोजित इफेडोरा सर्व्हिसेस प्रायव्हेट लि.च्या कॅम्पस ड्राइव्हमध्ये सोजरमधील १४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, त्यातील आदेश पांढरे व हर्षदा जगताप या विद्यार्थ्यांची अंतिम मुलाखतीसाठी निवड झाली.

१० मे रोजी सांगोला येथील फॅब्टेक कॉलेज ऑफ फार्मसीत टेक केअर मेडिकल सर्व्हिसेस प्रा. लि. (टीसीएमएस) या कंपनीच्या कॅम्पस ड्राइव्हसाठी सोजरमधून २१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामधून विश्वजीत मोरे, वरुण विचकुले, शुभम जाधव, मयुरी नागटिळक, प्रणिता कुंभार, आविष्कार कैंचे, साक्षी कांबळे, स्वप्नाली झालटे व अपूर्वा बारस्कर या नऊ जणांची अंतिम फेरीमध्ये निवड झाली. २३ मे रोजी स्वेरीज इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, पंढरपूर येथे आयोजित टीसीएमएस कंपनीच्या कॅम्पस ड्राइव्हची सुरवात कंपनीचे एच आर कमल कुमार यांच्या सादरीकरणाने झाली. या कार्यक्रमात ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी विविध कॉलेजमधून सहभाग नोंदवला होता. या ठिकाणी सोजर कॉलेजकडून ३७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. हे महाविद्यालयासाठी अभिमानास्पद ठरले. या ड्राइव्हमध्ये ३५ विद्यार्थ्यांनी पहिली फेरी यशस्वीरित्या पार केली आणि २१ विद्यार्थ्यांची दुसरी फेरी (ग्रुप डिस्कशन) मधून अंतिम तांत्रिक फेरीसाठी निवड झाली. ही अंतिम फेरी पुण्यातील टी.सी.एम.एस. मुख्य कार्यालयात होणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२४- २५ मध्ये डिप्लोमा फार्मसीचे सिद्धी घुगे, कानीफनाथ जाधव, अमृता मते, साक्षी पवार, तमन्ना शेख, श्वेता ननवरे, संजना जाधवर, भार्गव आपटे, सार्थक बनसोडे, मल्हारी चव्हाण तसेच बी.फार्मसी अंतिम वर्षात शिकत असलेले रतिक ननवरे, प्रदीप कविटके, वैभव हिरे, सायली यावलकर, पूजा जमाले, ज्योती कदम, पल्लवी बारंगुळे, साक्षी कापरे, अनुराधा लोखंडे, वैष्णवी मुंढे, अनुप्रिया राऊत यांची वरील कॅम्पस प्लेसमेंटद्वारे निवड करण्यात आली. या यशामागे ट्रेनिंग व प्लेसमेंट ऑफिसर शुभम मगर यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे अध्यक्ष अरुण बारबोले व सचिवा कल्पना बारबोले यांनी अभिनंदन केले.

## शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी दोन लाखांची भरपाई द्या

### आमदार नारायण पाटील यांची मागणी; करमाळ्यातील नुकसानग्रस्त भागात दौरा

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२७ मे-**

आमदार नारायण आबा पाटील यांनी नुकसानग्रस्त भागात बांधावर जाऊन प्रत्यक्षात पीक पाहणी केली. शेतकऱ्यांना प्रति हेक्टर दोन लाख रुपये नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी त्यांनी शासनाकडे केली आहे.

करमाळा मतदार संघात सर्वत्र अवकाळी पावसाने थैमान घातले आहे. गेले दोन आठवडे झाले पाऊस थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. यामुळे आज करमाळा मतदार संघाचे विद्यमान आमदार नारायण आबा पाटील यांनी दिवसभर नुकसानग्रस्त भागात गावभेट दौरा केला. यावेळी त्यांच्यासमवेत तालुका कृषी अधिकारी देवराव चव्हाण, मंडळ कृषी अधिकारी मधुकर मारकड, कृषी सहायक बाबुराव बेरे, कृषी सहायक नितीन रांजून, कृषी सहायक सुप्रिया शेलार, कृषी सहायक राहुल गव्हाणे, कृषी सहायक सचीन सरडे, सभापती अतुल भाऊ पाटील, उपसभापती दत्तात्रय सरडे,आदिनाथ माजी संचालक धुळाभाऊ कोकरे, पाटील गटाचे प्रवक्ते सुनील तळेकर, चिखलठाणचे सरपंच विकास गलांडे, आदिनाथ संचालक हनुमंत



सरडे, विजयराव कोकरे, अजित नवरे, कैलास बोंदरे आदि उपस्थित होते.

या दौऱ्यात शेटफळ येथील शेतकरी रंगनाथ पोळ, मुकुंद पोळ, विजय रामचंद्र लबडे, अनिल प्रल्हाद पोळ तर चिखलठाण येथील शिवाजी नारायण जगताप, कुगाव येथील बळीराम जनार्दन सरडे, प्रशांत लक्ष्मण कामटे आदि शेतकऱ्यांच्या नुकसान झालेल्या केळी, डाळींब, उडीद, कांदा आदि पिकांची प्रत्यक्षात पाहणी आमदार पाटील यांनी केली. तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधुन दिलासा दिला. यावेळी पावसामुळे अनेक ठिकाणी प्रत्यक्ष शेतात जाण्यासाठी रस्ते नसताना आमदार पाटील यांनी वेळप्रसंगी ट्रॅक्टर मध्ये बसून तर काही ठिकाणी चिखल तुडवत चालत जाऊन बांधावर हजेरी लावली व शेतकऱ्यांच्या नुकसान झालेल्या पिकांची पाहणी केली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर नुकसानीचे अहवाल तयार करून वरीष्ठ कार्यालयात ते सादर करावेत अशा सुचना दिल्या. तसेच करमाळा तालुक्यातील गावांसह या मतदार संघास जोडलेल्या माढा तालुक्यातील ३६ गावातही अनेक शेतकऱ्यांची उभी पिके अवकाळी मुळे हातातून गेली असून काही ठिकाणी काढणी केलेला कांदा रानात ढिग करुन ठेवले असल्याने तेही हाती लागले नसल्याचे सांगत जिथे मी जाऊ शकत नाही अशा मतदार संघातील सर्वच नुकसानग्रस्त भागात कृषी व महसुल विभागाचे अधिकारी जाऊन अहवाल तयार करतील, शेतकऱ्यांनी सहकार्य करावे असे आवाहन केले. आमदार पाटील यांनी केलेल्या या भेट व पाहणी दौऱ्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

## वळसंगच्या चौडेश्वरी यात्रेत भक्तांचा महापूर

### बाळबट्टल मिरवणूक पाहण्यासाठी परराज्यातील भाविकांची हजेरी

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २७ मे-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग येथील श्री रामलिंग-चौडेश्वरी यात्रेला ऐतिहासिक परंपरा आहे. या यात्रेतील मुख्य आकर्षण असलेले बाळबट्टल पाहण्यासाठी राज्यासह परराज्यातील भाविकांचा महापूर लोटला होता. रात्री १२ वाजता सुरु झालेली मिरवणूक सकाळी साडेआठपर्यंत चालली. श्री मद्विरशैव देवसाली हटगार कोष्टी समाजाचे श्री रामलिंग चौडेश्वरी देवस्थान ट्रस्टच्या संपूर्ण जबाबदारीखाली यात्रेतील सर्व मानकिऱ्यांना मान देण्यात आले. सर्व जातीधर्माना यात्रेमध्ये सहभागी करून घेऊन वैभवशाली यात्रा करण्याची परंपरा कायम राखण्यात आली.

बाळबट्टलच्या सुरुवातीला वळसंग पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि अनिल सनगल्ले यांना यात्रेची सुरक्षा देण्यासाठी तिसऱ्यांदा विडा देण्यात आला. त्यानंतर देवस्थानचे पदाधिकारी, ग्रामस्थ व मानकऱ्यांनी मशाल लावून वाजत-गाजत मंदिराकडे



देण्यात आले. मंदिरात ते पोहचल्यानंतर त्यांचे स्वागत करण्यात आले. सगळे विधी पार पडल्यानंतर बाळबट्टल मि रवणुकीला सुरुवात झाली. या यात्रेत वळसंग पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना मान असून, तो मान पूर्वीपासूनच आहे. याला पण इतिहास आहे. हा मान यंदा प्रभारी अधिकारी अनिल सनगल्ले यांनी तिसऱ्यांदा मिळविले.

३०० वर्षापूर्वी कर्नाटकातील माशाळ येथील चांदीची वाटी पळवून आणलेल्या इरण्णा यांच्या समाधीला नैवेद्य देऊन बाळबट्टलचा प्रारंभ करण्यात आला. वामनायक, नरसिंह, बाळबट्टल कुंभ, पालखी मिरवणूक, रथपूजा तसेच बाळबट्टल सांभाळण्यासाठी सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेण्याची प्रथा आहे. या बाळबट्टल सुरक्षाकारिता वळसंग पोलीस ठाण्याचा मोठा बंदोबस्त होता. सर्व समाजाचे प्रतिनिधी मानकरी वळसंगच्या रामलिंग चौडेश्वरी यात्रेला ऐतिहासिक परंपरा आहे. यात भक्तीची भर पडली असून, ब्रिटिश काळापासून ही यात्रा चालते. यात्रेत वळसंगम ध्ये अस्तित्वात असलेल्या सर्व समाजाला मान आहे. त्या-त्या समाजाचे प्रतिनिधी आणि कुटुंब प्रमुख यात्रेत सहभागी होऊन यात्रेतील विधी पार पाडतात. यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांना मान देण्यात आला. यात्रा यशस्वी होण्यासाठी देवी भक्ताकडून व स्थानिक नागरिकांकडून सहकार्य मिळाल्याची माहिती ट्रस्टी अध्यक्ष चनबसप्पा खैराटे यांनी सांगितले.

## पिलीवच्या भाग्योदय क्लासेसचे दहावीच्या परीक्षेत यश





**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २७ मे-**

पिलीव (ता.माळशिरस) येथील भाग्योदय क्लासेसमधील विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन केले.

यामध्ये अल्वीया असिम तांबोळी ९४ टक्के, ऋतुजा दिलीप गायकवाड ९२.८० टक्के, आशितोष अप्पासो पाटील ८९ टक्के, प्रणोती चंद्रकांत देवकुळे ८८.४० टक्के, स्नेहल रणजित रजपूत ८६.८० टक्के, सिमा प्रितम गांधी ८६.२० टक्के यांनी यश मिळवले. क्लासेसमधून ९० ते १०० टक्केत दोन विद्यार्थी, ८० ते ९० टक्केत १० विदयार्थी, ७० ते ८० टक्केत १७ विदयार्थी आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षक अमोल खलीपे, नवगण व शिक्षकांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले.

## ढोकरी येथे विद्युत उपकेंद्र उभारणी लवकरच

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २७ मे-**

ढोकरी (ता. करमाळा) येथे प्रस्तावित केलेल्या ३३/११ के व्ही विद्युत उपकेंद्रा च्या उभारणीस वनविभागाने आज नाहरकत दाखला दिल्याने आता ढोकरी येथे विद्युत उपकेंद्र उभारणी लवकरच सुरु होणार असल्याची माहिती बाजार समिती चे माजी सभापती प्रा.शिवाजी बंडगर यांनी दिली.

वांगी नं १ येथील विध्युत उपकेंद्रातून वांगी नं १,३, ४, ढोकरी, भिवरवाडी, बिटरगाव वां, नरसोबावाडी आदी गावांना, शेतीला विद्युत पुरवठा केला जातो. त्यामुळे वांगी नं १ येथील उपकेंद्रावर मोठा लोड असतो . त्यामुळे सतत लोडशेडिंग, आठ आठ तासाच्या भारनियमनास या गावांना तोंड द्यावे लागते. यावर उपाय म्हणून ढोकरी ग्रामस्थांनी त्यांच्या गावात असलेली खुली जागा सूचविली. तसा ठराव करून महावितरण ला दिला. परंतु उपकेंद्राच्या उभारणी कामी शासनाच्या महसूल, वन, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा अशा अनेक विभागाच्या नाहरकती लागतात. यापैकी वनविभागाच्या जाचक नियमामुळे गेल्या दोन वर्षापासून नाहरकत मिळण अवघड झाले होते. वनविभागाच्या उपकेंद्राची उपयोगिता, गरज, उजनी धरणग्रस्तांच्या त्यागाची कल्पना देवून नाहरकत कशी आणि किती गरजेची आहे पटवून दिले. पालकमंत्री गोरे यानाही लेखी पत्र दिले.

### अखेर.. वनविभागाने नाहरकत पत्र दिले

या वर बोलताना प्रा.बंडगर म्हणाले की, ढोकरी येथे सबस्टेशन कार्यान्वित झाल्यास याचा फायदा ढोकरी, भिवरवाडी ,बिटरगाव वां ,वागी ४ आदी गावांना होणार असून वनविभागाची मुख्य अडचण दुर करण्यासाठी खूप पाठपुरावा लागला. नाहरकत मिळाल्याने आनंद असून लवकरच सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, यांच्या नाहरकती मिळवून भूमिअभिलेख कार्यालय मोजणी करून देईल आणि उभारणी लवकरच होईल.

# नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करून अहवाल सादर करा

### कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे; पंढरपुरात नुकसान झालेल्या पिकांची केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ मे-**

सोलापूर जिल्ह्यासह पंढरपूर तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सतत मान्सूनपूर्व पाऊस पडत असल्याने फळबागांचे व शेत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, या नुकसानग्रस्त पिकांचे तात्काळ पंचनामे करून अहवाल शासनास सादर करावा अशा सूचना कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिल्या.

मान्सूनपूर्व पावसामुळे नुकसान झालेल्या पखालूर बागल, कोर्टी (ता. पंढरपूर) यांच्या कलिंगड पिकाची पाहणी कृषिमंत्री श्री कोकाटे यांनी पाहणी केली. यावेळी मान्सूनपूर्व पावसामुळे नुकसानग्रस्त झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करावेत. तसेच कोणताही नुकसानग्रस्त शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी सूचना त्यांनी यावेळी दिल्या



यावेळी बागल यांच्या कलिंगड प्लॉट संबंधी लागवडीपासून ते आतापर्यंत झालेल्या खर्चाची माहिती घेतली. तसेच उपस्थित शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्यरा.

यावेळी पंढरपूर तालुक्यात मे म हिन्यातील सरासरी पाऊस २० मि.मी एवढा आहे परंतु आज अखेर १३८ मिलिम टिर एवढा पाऊस झाल्याने तालुक्यातील ११५ शेतकऱ्याची ६५.९९ हेक्टर क्षेत्र वरील नुकसानाचे पंचनामे करून अहवाल सादर केल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी सूर्यकांत मोरे यांनी दिली. तसेच श्री. बागल यांनी कृषिमंत्री श्री कोकाटे शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत आल्याचे समाधान व्यक्त करून सदर कलिंगड प्लॉट पाऊस चालू होण्यापूर्वी १३ रुपये प्रति किलो प्रमाणे व्यापाऱ्याकडून मागणी झाल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले परंतु सततच्या अवकाळी पावसामुळे सदर प्लॉट सध्या परिस्थितीमध्ये २ रुपये प्रति किलो एवढ्या कमी दराने मागण्यात येत असल्याचे सांगितले. तरी शासनाने त्वरित नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी यावेळी केली. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, उपविभागीय कृषी अधिकारी बाळासाहेब लांडगे, माजी जिल्हा परिषद सदस्य श्रीकांत बागल, चंद्रभागा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे, चंद्रकांत बागल, दत्तात्रय बागल, सुभाष बागल, अण्णा फाटे, अतुल फाटे उपस्थित होते.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वाशिंबेच्या सागर मगरला 'केळी रत्न' पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२७ मे-**

वाशिंबे (ता.करमाळा) येथील केळी निर्यातदार, प्रयोगशील युवा शेतकरी सागर अंकुश मगर यांनी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य केळी उत्पादक संघाच्यावतीने त्यांना महाराष्ट्र केळी रत्न कार्य गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



माढा येथील कार्यक्रमात खासदार धैर्यशील मोहीते-पाटील, आमदार अभिजित पाटील यांच्या उपस्थितीत पुरस्काराचे वितरण झाले. प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. सागर मगर यांनी शेतात जी नाईन केळी, येलंकी केळी, ऊस, कांदा, कलिंगड, खरबूज असे नवनवीन प्रयोग करत भरघोस उत्पन्न घेतले आहे. योग्य व्यवस्थापन व कमी कालावधीत भरघोस उत्पादन यामुळे मगर यांची शेती परिसरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शनपर ठरत आहे. आपल्या शेतात माहितीसाठी आलेल्या शेतकऱ्यांना ते आवर्जून पिकातील बारकावे सांगतात. या सन्मानाबद्दल मगर यांचे सर्व स्तरातुन कौतूक होत आहे.



### महत्वाचे...



## अक्कलकोटमध्ये स्विमिंग ग्रुपतर्फे दहावीतील गुणवंतांचा सत्कार

**अक्कलकोट दि २७ मे-**

दहावीच्या परिक्षेत दैदिप्यमान यश मिळविलेल्या येथील विद्यार्थ्यांचा स्विमींग ग्रुपच्या वतीने संस्थापक अध्यक्ष व श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दहावीत तालुक्यातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली स्वामिनी प्रशांत शिंपी, द्वितीय क्रमांक प्राप्त शेजल संतोष जाधव उर्फ फुटाणे व अन्य गुणवंत विद्यार्थी अनुष्का अंभोरे, लक्ष्मी देसाई, आर्यन माळगे, गिरीश नारंगकर, अथर्व शिंदे या विद्यार्थ्यांचा कॉलेज बॅग, वही, पेन व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी अप्पू पराणे, प्रथमेश इंगळे, अंकुश केत, प्रा. शिवशरण अचलेर, बाबा सुरवसे, बाळासाहेब एकबोटे, प्रसाद पाटील, सुनील पवार, प्रसाद पाटील , प्रशांत शिंपी, संतोष जाधव उर्फ फुटाणे, शिवाजी धडके, मनोज जगताप, रमेश शिंदे, सचिन किरनळ्ळी, मल्लिनाथ माळी, अशोक कलशेट्टी, राजू एकबोटे, दर्शन घाटगे, शैलेश राठोड, ज्ञानेश्वर भोसले, सोमनाथ सुतार, अरविंद पाटील, संतोष जवळगे, विश्वनाथ देवरमणी, स्वामी गवळी, आदित्य गवंडी, समर्थ भोसले, विकास पवार, अमित नंदीकोल्हे इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकांत झिपरे व मनोज जगताप यांनी केले तर आभार प्रथमेश इंगळे यांनी मानले.





## माध्यमिक शिक्षण विभागाला मिळाले पाच नवे शिक्षक

**सोलापूर, दि २७ मे-**

दुसऱ्या टप्प्याच्या शिक्षक पदभरतीमध्ये सोलापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील कन्नड, उर्दू आणि मराठी माध्यमांच्या शाळेमध्ये एकही शिक्षक मिळाले नाही. तर माध्यमिक शिक्षण विभागाला पाच शिक्षक मिळाले आहेत. प्राथमिक शिक्षण विभागाने रिक्त जागांवर शिक्षकांचे समायोजन करुन जागा भरल्याने दुसऱ्या टप्प्यात शिक्षक मिळाले नाही. रिक्त जागांची संख्या जास्त असल्याने आणखी शिक्षक मिळण्याची गरज असल्याची मागणी विविध शाळांकडून होत आहे. पहिल्या टप्प्यातील शिक्षक भरती प्रक्रियेद्वारे प्राथमिक शिक्षण विभागाला जवळपास ३५० पेक्षा जास्त शिक्षक मिळाले होते. उर्वरित १० टक्के आणि रिक्त अपात्र, गैरहजरच्या जागामुळे किमान २० ते २५ शिक्षक भरले जातील, अशी आशा होती. परंतु, ती आशा फोल ठरली आहे. त्यामुळे अनेक शाळा शिक्षकाच्या प्रतिक्षेत दिसून येत आहेत.



## विदेशी दारूसह साडेपाच लाखाचा मुद्देमाल जप्त; एकजण ताब्यात

**करमाळा, दि २७ मे-**

करमाळा पोलिसांनी पुन्हा एकदा जबरदस्त कारवाई करत देशी विदेशी दारूची अवैध वाहतूक करणाऱ्यावर कारवाई करून करमाळा पोलिसांनी अवैध देशी-विदेशी दारु वाहतुक करणारे इसमावर कारवाई करुन एकाला जेरबंद केले आहे. सदाशिव अजय मराठे (वय २८) रा. निमगाव (टें), ता. माढा, जि. सोलापूर असे ताब्यात घेतलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून ४७ हजार रुपयांची दारु व एक महिंद्रा बोलेरो गाडी असा ५ लाख ४७ हजार १४ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबतची हकीकत अशी ही करमाळ्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजीत माने यांना खबर्यामार्फत अवैध रित्या देशी-विदेशी दारूची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. या मिळालेल्या माहितीच्या आधारे करमाळा पोलिसांनी केम ते वडशिवणे रोडवर सापळा रचला. हवालदार अलिम मलिक शेख, अमोल घुगे व प्रविण चव्हाण हे मौजे केम गावचे हद्दीतील वेताळबाबा मंदीराजवळ सापळा लावला. यावेळी त्यांना त्या दिशेने येत असलेली एक चारचाकी महिंद्रा बोलेरो गाडी तीचा त्यांना संशय आल्याने अडवली .त्या गाडीची तपासणी केली असता त्यात अवैध देशी-विदेशी दारूचे बॉक्स असल्याचे लक्षात आले. त्या सर्वांची एकूण तपासणी केली असता एकुण ४७ हजार १४ रु. किंमतीचे देशी-विदेशी दारुचे बॉक्स व त्यामध्ये देशी-विदेशी दारुच्या बाटल्या मिळुन आल्या. यावेळी सदर गाडीचे चालक सदाशिव मराठे (वय २८) यास ताब्यात घेतले. तसेच त्याच्याकडून अंदाजे ५ लाख रु. किंमतीची एक महिंद्रा बोलेरो गाडी क्र. एम.एच.-४५/ए.क्यु.-४७५९ असा एकुण ५ लाख ४७ हजार १४ रु. किंमतीचा मुद्देमाल कारवाईसाठी ताब्यात घेवुन त्याचेवर कायदेशीर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कामगिरी उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक रणजीत माने, हवालदार अलिम मलिक शेख, पो.शि.अमोल घुगे , पो. शि.प्रविण चव्हाण आदीच्या पथकाने केली आहे.याचा तपास हवालदार अलीम शेख हे करीत आहेत.

# उजनी धरण मे महिन्यातच 'प्लस' मध्ये



- १४ दिवसात १२ टीएमसी पाणी जमा
- चंद्रभागेच्या पाणी पातळीत घट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ मे-**

मान्सूनपूर्व पावसाने जोरदार बॅटिंग केल्याने यंदा प्रथमच मे महिन्यात उजनी धरणाने मृत साठ्याची पातळी ओलांडत मंगळवारी (ता.२७) सकाळी आठ वाजता जिवंत साठ्यात प्रवेश केला आहे.

गेल्या वर्षीही धरण एकशे दहा टक्के भरल्यानंतर जिवंत साठा संपून वजा २३ टक्केपर्यंत धरणाची पातळी खालावली होती. उजनी धरणाच्या इतिहासात यंदा प्रथमच मे महिन्यातच धरण जिवंत साठ्यात आले आहे. ऐवढचे नाही तर गेल्या चौदा दिवसात धरणात तब्बल १२ टीएमसी पाणी जमा झाले आहे. मात्र अजूनही उजनी धरणात २६ हजार क्युसेक विसर्गने पाणी जमा होत आहे. दरम्यान येथील चंद्रभागा नदीच्या पाणी पातळीत देखील घट देण्यास सुरुवात झाली आहे.

### १४ दिवसात उजनीत वाढलं १२ टीएमसी पाणी

महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या धरणांपैकी उजनी हे एक आहे. या धरणाची पाणी क्षमता ही ११७ टीएमसी आहे. मागील वर्षी देखील चांगला पाऊस झाला होता. त्यामुळं धरण पूर्ण क्षमतेनं भरलं होतं. या धरण क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर बागायती शेती अवलंबून आहे. विशेषत ऊस शेती मोठ्या प्रमाणावर आहे. त्याचबरोबर केळी, डाळिंब, द्राक्षांच्या बागांचं क्षेत्र देखील मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळं उजनी धरणात होणारी पाण्याची वाढ ही शेतकऱ्यांना दिलासा देणारी ठरत आहे.

### दौंडयेथून धरणात सध्या २६ हजार क्युसेक्सने विसर्ग

पुणे, सोलापूर आणि नगरकरांसाठी जीवनदायनी ठरलेलं उजनी धरण आता मायनस मधून प्लस मध्ये आलं आहे. पुणे जिल्ह्याच्या घाटामध्यावर आणि उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या आठवडा भरापासून पाऊस कोसळतोय. सध्या दौंड येथून उजनी धरणात २६ हजार १०६ क्युसेकने पाणी येतंय त्यामुळे उजनी धरणाची पाणी पातळी झपाट्याने वाढत आहे.

### जिल्ह्यावर पूर परिस्थितीचे संकट ओढविणार?

उजनीच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे केवळ १४ दिवसात उजनीने वजा २३ टक्क्यापासून शून्य पातळी ओलांडत जिवंत साठ्यात प्रवेश केलाय. यंदा १३ मे पासून उजनी धरणात हळूहळू पाणी जमा होण्यास सुरुवात झाली होती. गेल्या आठ दिवसात तब्बल १२ टीएमसी पाणी धरणात जमा झाले आहे. यावर्षी याच दिवशी धरणात मृत साठा भरून जिवंत साठ्यात पाणी जमा होण्यास सुरुवात झाली आहे. अजून देखील मान्सून या भागात पोहोचायचा असून असाच पाऊस सुरू राहिला तर सोलापूर जिल्ह्यावर पूर परिस्थितीचे संकट ओढावू शकते.

### मोजक्या दिवसातच यंदा उजनी पुर्ण क्षमतेने भरणार

उजनी धरणाची एकूण पाणी साठवण क्षमता १२३ टीएमसी इतकी असून जेव्हा धरण ११७ टीएमसी इतकं भरलं जातं तेव्हा ते शंभर टक्के क्षमतेने भरतं. आता उजनीत ६३ टीएमसी हून अधिक पाणी साठा आहे. जर पावसाचा वेग असाच राहिल्यास अगदी मोजक्या दिवसात उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरले जाईल असा विश्वास देखील धरण प्रशासनाकडून व्यक्त केला जात आहे.

### चंद्रभागेची पाणी पातळी कमी होण्यास सुरुवात

निरा नदीच्या खोऱ्यात झालेल्या दमदार पावसामुळे भीमा नदी मध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी आले होते. त्यामुळे येथील चंद्रभागेच्या पाणी पातळीत मोठी वाढ झालेली होती. अगदी मे महिन्यातच चंद्रभागा नदी दुथडी भरुन वाहू लागली. दरम्यान चंद्रभागानदीवर असणाऱ्या ब्रिटीशकालीन जुना दगडीपूलासह पंढरपूर तालुक्यातील आव्हे -जांभुड बंधारा, करोळे -मिरे बंधारा, पिराचीकुरोली-पटवर्धनकुरोली बंधारा आणि मुंडेवाडी-अजनसोड बंधारा हे पाण्याखाली गेलेले आहेत. मात्र मंगळवारी येथील चंद्रभागा नदीची पाणी पातळी कमी होण्यास सुरुवात झाली आहे.

### सोलापूरसह अनेक गावांचा पाणी पुरवठा उजनीवरच अवलंबून

पावसाळ्यात एकदा उजनी धरण भरले की सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतीच्या पाण्याची आणि जिल्ह्यातील नागरिकांना पिण्याची चिंता नसते. कारण याच उजनी धरणावर सोलापूर शहरासह जिल्ह्यातील बार्शी, कुर्डुवाडी, पंढरपूर, सांगोला आणि मंगळवेढा आदी तालुक्यांचा पाणी पुरवठा अवलंबुन आहे.

## अन्नछत्र मंडळाचे काम धार्मिक क्षेत्रात उत्कृष्ट

- राज्यस्तरीय वारकरी संत संमेलनात जगद्गुरु शंकराचार्यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ मे-**

अक्कलकोट येथील अन्नछत्र मंडळाचे धार्मिक क्षेत्रात उत्कृष्ट काम असून त्यांची कार्यप्रणाली वाखाणण्याजोगी असल्याचे प्रतिपादन करवीर पीठाचे शंकराचार्य श्री विद्या नरसिंह भारती यांनी बावी येथे केले.



बावी येथे राज्यस्तरीय वारकरी संत संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अक्कलकोटच्या स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत त्याचे उद्घाटन शंकराचार्य यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. संमेलनास प्रकाशमहाराज बोधले, देवगडचे श्री स्वामी महाराज प्रकाशनंद, प्रकाश महाराज साठे, कृष्णा महाराज चवरे, ज्ञानेश्वर महाराज पाटील, गुरुवर्य दत्तात्रय महाराज, अनिल महाराज पाटील, अमृतदास महाराज जोशी, समाधान महाराज शर्मा, अक्षय महाराज भोसले, नारायण महाराज साखरवाडीकर, सुधीरशेठ पाटील, ज्ञानेश्वर माऊली कदम यांचे याप्रसंगी मार्गदर्शन लाभले. यावेळी जन्मेजयराजे भोसले यांचा बावी ग्रामस्थांच्यावतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख अमोल शिंदे, भाजपा प्रदेश संघटक शहाजी पवार, हिम्मतराव आसबे, अशोक महाराज कोल्हे यांच्यासह श्री क्षेत्र अक्कलकोट अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, संतोष भोसले, लाला राठोड, बाबा संगीत महाराज शिंदे, रोहन शिर्के, रोहित खोबरे, अश्पाक काझी, शिवराज स्वामी, दत्ता माने, प्रशांत शिंदे, स्वामिनाथ गुरव, स्वामिनाथ बाबर, रमेश हळसंगी, संतोष माने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आंबऋषी पाटील, सचिन लोंढे, शंकरराव डोईफोडे, प्रवीण करडे, खंडू आगलावे, पप्पू काळे, संतोष करडे, आबा करडे, पिंटू आगलावे, समाधान लोढे, गणेश गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

## सांगोल्यात आज सावरकर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२७ मे-**

येथील महादेव गल्लीतील दत्त मंदिरात बुधवार दि.२८ मे रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्याची माहिती सावरकर विचार मंचाचे डॉ.मानस कमलापुरकर यांनी दिली.

यावेळी ॲड. सारंग वांगीकर, श्रीकांत हसबनीस, कुमार कुलकर्णी, ॲड. विशाल बेले, निलेश ताकभाते, मंगेश कुलकर्णी, कौस्तुभ भोसेकर, ज्ञानेश्वर कुलकर्णी, संजय हसबनीस, अनिल कुलकर्णी, सचिन बेले, तेजस कुलकर्णी, अनिता बेले, श्रद्धा देशपांडे, वैष्णवी लऊळकर, सानिका जोशी, सुमेधा वांगीकर, आशु कुलकर्णी उपस्थित होते. सायंकाळी साडेपाच वाजता सावरकरांच्या प्रतिमेचे पूजन, व्याख्यान, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला सावरकरांच्या साहित्याच्या अभ्यासिका प्रा. मेधाताई दाते, पोलीस निरीक्षक विनोद घुगे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सावरकर प्रेमींनी उपस्थित रहावे असे आवाहन सावरकर विचार मंचाच्यावतीने करण्यात आले आहे.

## अवकाळी पावसामुळे करमाळ्यातील फळबागांचे नुकसान

### पंचनामे व भरपाईची शेतकऱ्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २७ मे-**

वादळी वारा व पावसाने करमाळा तालुक्यातील केळी पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक केळी बागांमध्ये पाणी साचल्याने केळीच्या उत्पन्नावर त्याचा परिणाम होणार असून झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करून तातडीने भरपाई मिळावी. केळी पिकाच्या भरपाई रकमेमध्ये वाढ करण्यात यावी, आशी मागणी शेतकऱ्यांमधून केली जात आहे.



मागील आठवड्यात झालेल्या वादळी वाऱ्यामुळे व गेल्या आठवडाभर होत असलेल्या पावसाने उमरड, चिखलठाण शेटफळ वांगी कंदर वाशिंबे यासह गावातील केळी, कलिंगड, कांदा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी केळीची झाडे उन्मळून पडले असून सततच्या पावसाने या बागेत मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने हातचे पीक वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. झालेल्या नुकसानीचे पंचनामे होऊन नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून भरपाई मिळावी. केळी पिकासाठी खर्च ज्यादा होत असल्याने भरपाईची रक्कम वाढवण्याची मागणी शेतकऱ्यांमधून केली जात आहे. वरिष्ठ पातळीवरून या संदर्भात पंचनामे करण्याची घोषणा करण्यात आली असली तरी सध्या कृषी सहायकांचा संप सुरू आहे. पंचनामे करण्यासाठी शेतकऱ्याकडे कोणी येताना दिसत नसल्याने शेतकरी वर्गामधून याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

सततचा पाऊस व वादळी वाऱ्यामुळे केळी व कलिंगड पिकांचे पूर्णपणे नुकसान झाले आहे.शेताला पाणी लागले आहे.वादळी वाऱ्याने अनेक शेतकऱ्यांची केळी उन्मळून पडली आहे. शासनाने तात्काळ पंचनामे करून एकरी दोन लाख मदत घ्यावी.

**- संदिप मारकड, उमरड ता. करमाळा**

उन्हाळी कांदा पीक जादा उत्पन्न मिळेल या आशेने केले होते. परंतु मे महिन्यातच पाऊस पडल्याने कांदा भिजला व उत्पादन खर्च सुद्धा निघाला नाही.कांदा सडून गेला. सरकारने पंचनामा करून मदत करावी.

**- विशाल वलटे, उमरड**

वादळी वारा व पावसाने नुकसान झालेल्या केळी पिकांची माहिती घेण्याचे काम सुरू आहे. सर्व झालेल्या नुकसानीचे पंचनामे केले जाणार आहेत, कृषी सहाय्यकांच्या आंदोलनाचा पंचनामे करण्याच्या कामावर कसलाही परिणाम होणार नाही सध्या पावसाने थोडीफार उघडीप दिल्यानंतर सर्व पंचनामे केले जातील.

**- मधुकर मारकड (मंडल कृषी अधिकारी जेऊर)**

## सांगोला तालुक्यात घरांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२७ मे-**


सोमवार दि.२६ मे रोजी रात्री झालेल्या पावसात सांगोला तालुक्यातील हंगिरगे व आलेगाव येथे घरांचे नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. दि.२६ मे रोजी रात्री सांगोल्यातील काळेवाडी, हंगिरगे गावठाण मधील बाळु गणपती गावडे यांचे राहते घराचे वादळ वारे व पावसाने पत्रे उडून गेले. तसेच आलेगाव येथील गट नं.९६ मधील सिद्धेश्वर गणपत बाबर यांचे पावसामुळे राहते माळवद घर पडून नुकसान झाले. तसेच गट नं.११०८ मधील सुखदेव ज्ञानू बाबर यांचे पावसामुळे राहते माळवद घराची भिंत पडून नुकसान झाले आहे.

# पालखी मार्गावरील रस्ता दुरूस्तीसाठी पावणेचार कोटी

### सीईओ कुलदीप जंगम यांनी दिले आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २७ मे-**

जुलै महिन्यात आषाढी वारी असून यावेळी विविध मार्गावरुन नऊ ते दहा प्रमुख पालख्या पंढरपुरात दाखल होतात. त्या मार्गावरील रस्ते देखभाल, दुरुस्ती आणि नवीन रस्ते करण्यासाठी तीन कोटी ८० लाख रुपयांचा निधी जिल्हा परिषदेने मंजूर केला आहे. ही कामे दर्जेदार करावीत, असे आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिले आहेत.




सीईओ जंगम यांनी ग्रामीण मार्ग, जिल्हा मार्गावरील १५ रस्त्यांच्या देखभाल, दुरुस्तीसाठी तीन कोटी ८० लाख रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. तसेच पालख्या दाखल होण्याच्या अगोदर सर्व रस्त्यांची देखभाल, दुरुस्ती करण्याच्या सूचना ठेकेदारांना दिली आहे. त्यामुळे वीस ते पंचवीस दिवसांत रस्त्यांची कामे पूर्ण करावी लागणार आहेत. दरम्यान, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी पालखी मार्गावरील रस्त्यांची पाहणी करून गरज असलेल्या रस्त्यांना मंजुरी दिली आहे. तसेच अनेक ठिकाणच्या रस्त्यांची दुरुस्ती करण्याचेही आदेश दिले आहे. आषाढी वारीच्यानिमित्ताने जिल्ह्यात वेगवेगळ्या मार्गावरुन पालख्यांचे व दिड्यांचे आगमन होत असते. पंढपूरला येणाऱ्या भाविकांना चालताना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, याची काळजी जिल्हा प्रशासनाकडून घेण्यात येत आहे. ज्या मार्गावरुन दिंड्या येणार आहेत, ते मार्ग दुरुस्त करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने दर्जेदार रस्ता करण्याचे आदेश ठेकेदारांना दिले आहेत.

### या रस्त्यांची होणार कामे

करमाळा तालुक्यातील रावगाव झोपडपट्टी ते कर्जत रस्ता, माळशिरस तालुज्यातील पवारवाडी, गुरसाळे, मुंजवडी स्स्ता ते माळशिरस, तोंडले ते माळशिरस रस्ता. बोरगाव ते पाटीलवस्ती, मांडवे ते नातेपुते, वेळापूर निमगाव ते म्हेत्रे मळा, निमगाव ते निमगाव बनकरमाळा रस्ता, सदाशिवनगर ते मांडवे, पंढरपूर तालुक्यातील शेगाव दुमाला ते पंढरपूर रस्ता, विष्णुपद उस्ता ते पंढरपूर रस्ता पिराची कुरोली ते तळवाट घाट रस्ता, करकंब ते तुळशी रस्ता, ६५ एकर ते विसावा रस्ता, वाखरी येथील रस्ता, भटुंबरे, पखालपूर, मेंढापूर ते पंढरपूर रस्त्यांचा समावेश आहे.

"जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी वारी मार्गावरील रस्त्यांच्या देखभाल, दुरुस्तीसाठी तीन कोटी ८० लाखांचा निधी मंजूर केला आहे. सीईओ जंगम यांनी कामे दर्जेदार करण्याच्या सूचना ठेकेदाराना दिल्या आहेत. त्यानुसार रस्त्यांची कामे होणार आहेत.

**- संदीप कोहिणकर,**
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सोलापूर